लोकलेखा समिती

(२०१५-२०१६)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००८-२००९ च्या महसुली जमा अहवालामधील वित्त विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. २.५, २.६.९), महसूल व वन (महसूल) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.३.१, ३.३.३, ३.३.५, ४.४), गृह (परिवहन) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ५.३.१, ५.३.२), गृह (राज्य उत्पादन शुल्क) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ५.३.३),

दुसरा अहवाल

सत्यमेव जयते

(हा अहवाल विधानसभा / विधानपरिषद सभागृहास दिनांक , २०१५ रोजी सादर करण्यात आला)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई/नागपूर.
२०१५

लोकलेखा समिती

(२०१५-२०१६)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००८-२००९ च्या महसुली जमा अहवालामधील वित्त विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. २.५, २.६.९), महसूल व वन (महसूल) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.३.१, ३.३.३, ३.३.५, ४.४), गृह (परिवहन) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ५.३.१, ५.३.२), गृह (राज्य उत्पादन शुल्क) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ५.३.३),

दुसरा अहवाल

एचबी १०५०—१

लोकलेखा समिती

(सन २०१५-२०१६)

समिती प्रमुख :

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

सदस्य :

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.

(३) श्री. संजय सावकारे, वि.स.स.

(४) श्री. नानाजी शामकुळे, वि.स.स.

(५) श्री. हरिभाऊ जावळे, वि.स.स.

(६) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.

(७) श्रीमती माधुरी मिसाळ, वि.स.स.

(८) श्री. योगेश सागर, वि.स.स.

(९) डॉ. अनिल बोंडे, वि.स.स.

(१०) श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स.

(११) श्री. संजय केळकर, वि.स.स.

(१२) श्री. शंभुराज देसाई, वि.स.स.

(१३) श्री. सत्यजीत पाटील-सरुडकर, वि.स.स.

(१४) श्री. वैभव नाईक, वि.स.स.

(१५) श्री. सुरेश गोरे, वि.स.स.

(१६) श्री. कालिदास कोळंबकर, वि.स.स.

(१७) श्री. वसंतराव चव्हाण, वि.स.स.

(१८) श्री. जयंत पाटील, वि.स.स.

(१९) श्री. राजेश टोपे, वि.स.स.

(२०) श्री. भास्कर जाधव, वि.स.स.

(२१) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

(२२) श्री. सुनिल तटकरे, वि.प.स.

(२३) श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स.

(२४) श्री. माणिकराव ठाकरे, वि.प.स.

(२५) श्री. संजय दत्त, वि.प.स.

सदरहू समिती दिनांक १ मे २०१५ रोजी विधानसभा व दिनांक २१ मे २०१५ रोजी विधानपरिषद सदस्यांच्या नामनिर्देशनाद्वारे गठीत करण्यात आली.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव.

(२) श्री. उत्तमसिंग चव्हाण, सचिव.

(३) श्री. सु. सा. गायकवाड, वित्तीय सल्लागार.

(४) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव.

(५) श्री. ऋतुराज कुडतरकर, उप सचिव.

(६) श्री. सो. न. सानप, अवर सचिव.

(७) श्री. कैलास पाझारे, कक्ष अधिकारी.

(८) श्रीमती सुषमा पाठक, कक्ष अधिकारी.

लोकलेखा समिती
(सन २०१२-२०१३)

समिती प्रमुख :

(१) श्री. गिरीश बापट, वि.स.स.

सदस्य :

(२) श्री. मधुकर ऊर्फ अण्णा चव्हाण, वि.स.स.

(३) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

(४) श्री. सुनिल केदार, वि.स.स.

(५) श्री. बसवराज पाटील, वि.स.स.

(६) श्री. विनायक निम्हण, वि.स.स.

क-(७) श्री. निलेश देशमुख-पारवेकर, वि.स.स. (दिनांक २७ जानेवारी २०१३ रोजीपर्यंत)

(७अ) श्री. राहुल बोंद्रे, वि.स.स. (दिनांक ११ जुलै २०१३ रोजीपासून)

(८) श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स.

ख-(९) श्री. संजय सावकारे, वि.स.स. (दिनांक १० जून २०१३ रोजीपर्यंत)

ग-(१०) श्री. दिलीप सोपल, वि.स.स. (दिनांक १० जून २०१३ रोजीपर्यंत)

घ-(११) श्री. ए. टी. पवार, वि.स.स. (दिनांक ५ जानेवारी २०१३ रोजीपर्यंत)

(११अ) श्री. लक्ष्मण जगताप, वि.स.स. (दिनांक ७ जानेवारी २०१३ रोजीपासून ते दिनांक २२ मार्च २०१४ पर्यंत)

(१२) श्री. विक्रमसिंह पाटणकर, वि.स.स.

(१३) श्री. बदामराव पंडित, वि.स.स.

(१४) प्रा. राम शिंदे, वि.स.स.

(१५) श्री. गिरीष महाजन, वि.स.स.

च-(१६) श्री. नानाभाऊ पटोले, वि.स.स. (दिनांक २३ मे २०१४ रोजीपर्यंत)

(१७) श्री. आर. एम. वाणी, वि.स.स.

(१८) श्री. चंद्रकांत मोकाटे, वि.स.स.

(१९) श्री. विवेक (भाऊ) पंडित, वि.स.स.

(२०) श्री. नितीन सरदेसाई, वि.स.स.

छ-(२१) श्री. जयप्रकाश छाजेड, वि.प.स. (दिनांक २४ एप्रिल २०१४ रोजीपर्यंत)

(२१अ) श्री. संजय दत्त, वि.प.स. (दिनांक १४ जुलै २०१४ रोजीपासून)

ज-(२२) प्रा. सुरेश नवले, वि.प.स. (दिनांक १२ मार्च २०१४ रोजीपर्यंत)

(२२अ) प्रा. जनार्दन चांदूरकर, वि.प.स. (दिनांक १४ जुलै २०१४ रोजीपासून)

(२३) श्री. विनायक मेटे, वि.प.स.

झ-(२४) श्री. विजयसिंह मोहिते-पाटील, वि.प.स. (दिनांक ६ फेब्रुवारी २०१४ रोजीपर्यंत)

(२४अ) श्री. राजेंद्र जैन, वि.प.स. (दिनांक ७ फेब्रुवारी २०१४ रोजीपासून)

ट-(२५) श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स. (दिनांक २४ एप्रिल २०१४ रोजीपर्यंत)

निमंत्रित :

ठ-(२६) श्री. दिवाकर रावते, वि.प.स.(दिनांक ३१ ऑक्टोबर २०१२ रोजीपर्यंत)

(२६अ) श्री. विनायक राऊत, वि.प.स. (दिनांक १ नोव्हेंबर २०१२ रोजीपासून ते २७ मे २०१४ रोजीपर्यंत)

ड-(२७) श्री. मनिष जैन, वि.प.स. (दिनांक २८ फेब्रुवारी २०१४ रोजीपर्यंत)

(२७अ) श्री. शरद रणपिसे, वि.प.स. (दिनांक १४ जुलै २०१४ रोजीपासून)

सदरहू समिती दिनांक ३१ मे २०१२ रोजी विधानसभा व दिनांक १ जून २०१२ रोजी विधानपरिषद सदस्यांच्या नामनिर्देशनाद्वारे गठित करण्यात आली.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव.

(२) श्री. उ. की. चव्हाण, अतिरिक्त सचिव.

(३) श्री. सु. सा. गायकवाड, वित्तीय सल्लागार.

(४) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव.

(५) श्री. ऋतुराज ज. कुडतरकर, अवर सचिव.

(६) श्री. दिलीप येवला, अवर सचिव (समिती).

(७) श्री. सोमनाथ न. सानप, कक्ष अधिकारी.

(८) श्री. कैलास पाझारे, कक्ष अधिकारी.

(क) श्री. निलेश देशमुख-पारवेकर, वि.स.स. यांचे दिनांक २७ जानेवारी २०१३ रोजी निधनामुळे रिक्त झालेल्या जागेवर श्री. राहुल बोंद्रे , वि.स.स. यांची मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी दिनांक ११ जुलै २०१३ रोजी नामनियुक्ती केली आहे.

(ख) श्री. संजय सावकारे, वि.स.स. यांचा दिनांक ११ जून २०१३ रोजी राज्यमंत्री म्हणून मंत्रिमंडळात समावेश झाल्याने सदर जागा रिक्त आहे.

(ग) श्री. दिलीप सोपल, वि.स.स. यांचा दिनांक ११ जून २०१३ रोजी मंत्री म्हणून मंत्रिमंडळात समावेश झाल्याने सदर जागा रिक्त आहे.

(घ) श्री. ए. टी. पवार, वि.स.स. यांचे जागी मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी श्री. लक्ष्मण जगताप, वि.स.स. यांची समिती सदस्य म्हणून दिनांक ७ जानेवारी २०१३ रोजी नामनियुक्ती केली व दिनांक २२ मार्च, २०१४ रोजी आपल्या विधानसभा सदस्यत्वाचा राजीनामा दिल्याने सदर जागा रिक्त आहे.

(च) श्री. नानाभाऊ पटोले, वि.स.स. हे लोकसभा सदस्य म्हणून निवडून आल्याने त्यांनी दिनांक २३ मे २०१४ रोजी आपल्या विधानसभा सदस्यत्वाचा राजीनामा दिल्याने सदर जागा रिक्त आहे.

(छ) श्री. जयप्रकाश छाजेड, वि.प.स. यांची दिनांक २४ एप्रिल २०१४ रोजीपासून सदस्यत्वाची मुदत संपल्याने सदर जागा रिक्त आहे.

(ज) श्री. सुरेश नवले, वि.प.स. यांची दिनांक १२ मार्च २०१४ रोजीपासून सदस्यत्वाची मुदत संपल्याने सदर जागा रिक्त आहे.

(झ) श्री. विजयसिंह मोहिते-पाटील, वि.प.स. यांचे जागी मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी श्री. राजेंद्र जैन, वि.प.स. यांची समिती सदस्य म्हणून दिनांक ६ फेब्रुवारी २०१४ रोजी नामनियुक्ती केली.

(ट) श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स. यांची दिनांक २४ एप्रिल २०१४ रोजी सदस्यत्वाची मुदत संपल्याने सदर जागा रिक्त आहे.

(ठ) श्री. दिवाकर रावते, वि.प.स. यांचे जागी मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी श्री. विनायक राऊत, वि.प.स. यांची निमंत्रित म्हणून दिनांक १ नोव्हेंबर २०१२ नामनियुक्ती केली व श्री. विनायक राऊत, वि.प.स. हे लोकसभा सदस्य म्हणून निवडून आल्याने त्यांनी दिनांक २७ मे २०१४ रोजी आपल्या विधानपरिषद सदस्यत्वाचा राजीनामा दिल्यामुळे सदर जागा रिक्त आहे.

(ड) श्री. मनिष जैन, वि.प.स. यांनी दिनांक २८ फेब्रुवारी २०१४ रोजी विधानपरिषद सदस्यत्वाचा राजीनामा दिल्याने सदर जागा रिक्त आहे.

प्रस्तावना

मी, लोकलेखा समितीचा समिती प्रमुख, समितीने अहवाल सादर करण्याचा अधिकार दिल्यावरुन भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००८-२००९ च्या महसुली जमा अहवालामधील वित्त विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र.२.५, २.६.९), महसूल व वन (महसूल) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.३.१, ३.३.३, ३.३.५, ४.४), गृह (परिवहन) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र.५.३.१, ५.३.२), गृह (राज्य उत्पादन शुल्क) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र.५.३.३), यावर विचार करून लोकलेखा समितीचा दुसरा अहवाल सादर करीत आहे.

समितीने दिनांक ७, ८ व १६ जानेवारी २०१४ रोजी अपर मुख्य सचिव, महसूल व वन (महसूल) विभाग, प्रधान सचिव, वित्त, गृह (परिवहन) व गृह (राज्य उत्पादन शुल्क) विभागाच्या सचिवांची साक्ष घेण्यात आली.

प्रधान महालेखाकार, लेखापरीक्षा-एक महाराष्ट्र, मुंबई तसेच महालेखाकार, लेखापरीक्षा-दोन महाराष्ट्र नागपूर हे समितीच्या निमंत्रणावरुन बैठकींना उपस्थित होते. त्यांनी समितीला केलेल्या बहुमोल मार्गदर्शनाबद्दल समिती त्यांची अत्यंत आभारी आहे.

तसेच सचिव, वित्त विभाग (लेखा व कोषागारे) यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीला दिलेल्या सहकार्याबद्दल आणि संबंधित विभागाच्या सचिवांनी समितीसमोर साक्ष देऊन समितीला सहकार्य केले त्याबद्दल समिती त्यांची देखील आभारी आहे.

समितीच्या बैठकीच्या कामकाजाचे कार्यवृत्त स्वतंत्ररित्या ठेवण्यात आले असून तो अहवालाचा भाग आहे. समितीच्या झालेल्या बैठकांचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्ट " अ " मध्ये देण्यात आलेले आहे.

समितीने दिनांक ३० जून, २०१५ रोजीच्या बैठकीत प्रारूप अहवाल विचारात घेतला व त्यातील शिफारशींवर सुधारणा सुचविल्या व दिनांक २१ जुलै २०१५ रोजीच्या बैठकीत प्रारूप अहवालाला मान्यता दिली.

विधान भवन :
मुंबई/नागपूर,
दिनांक २१ जुलै २०१५.

गोपालदास अग्रवाल,
समिती प्रमुख,
लोकलेखा समिती.

अनुक्रमणिका

अ. क्र. (१)	विभाग व तपशील (२)	पृष्ठ क्रमांक (३)
	प्रस्तावना :	
१.	**वित्त विभाग** . . . . (परिच्छेद क्र.२.५, २.६.९)	१
२.	**महसूल व वन (महसूल) विभाग** . . . . (परिच्छेद क्र.३.३.१, ३.३.३, ३.३.५, ४.४)	९
३.	**गृह (परिवहन) विभाग** . . . . . . (परिच्छेद क्र. ५.३.१, ५.३.२)	२१
४.	**गृह (राज्य उत्पादन शुल्क) विभाग** . . . . . . (परिच्छेद क्र. ५.३.३)	३३

वित्त विभाग

१.१. भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांनी त्यांच्या सन २००८-०९ या वर्षाच्या महसुली जमा अहवालामधील **परिच्छेद क्र.२.५ " महाराष्ट्रात लागू केलेल्या मूल्यवर्धित करामुळे झालेल्या महसूल हानीच्या भरपाईचा जास्तीचा दावा " व परिच्छेद क्र.२.६.९ " सामूहिक प्रोत्साहन योजनेखाली कराचे चुकीचे विलंबन "** या संदर्भात खालील अभिप्राय दिले आहेत.

१.२. महाराष्ट्रात लागू केलेल्या मुल्यवर्धित करामुळे झालेल्या महसूल हानीच्या भरपाईचा जास्तीचा दावा :

महाराष्ट्रात १ एप्रिल २००५ मध्ये मुल्यवर्धित करपद्धती अंमलात आली. मुल्यवर्धित कराच्या अंमलबजावणीमुळे होणाऱ्या महसुलाच्या हानीची भरपाई राज्य सरकारला देण्याचे भारत सरकारने (भा.स.) मान्य केले होते आणि जून २००६ मध्ये हानीच्या भरपाईची मोजदाद करण्यासाठी मार्गदर्शक तत्तवे जारी करण्यात आली. या मार्गदर्शक तत्त्वांनुसार मुल्यवर्धित कराची जमा रक्कम व मुल्यवर्धित कर लागू होण्यापूर्वी जमा रक्कम यांची तुलना करावी. अशी तुलना मागील पाच वर्षांच्या योग्य अंदाजावर आधारीत महसूल वाढीच्या सरासरी दरानुसार असावी. तसेच जमेची संगणना करताना मोटार स्पिरीट कर (मोस्पिक) जमा, मद्यावरील कर आणि केंद्रीय विक्रीकरात (केंविक) समायोजित केलेल्या प्राप्त कराच्या रकमा (प्राप्त कराच्या जमा रकमा) वगळण्यात याव्यात. येणाऱ्या निव्वळ महसुलाची २००६-०७ च्या अपेक्षित कर महसुलाशी तुलना करून मुल्यवर्धित कर लागू केल्याने होणारा तोटा काढावा. २००६-०७ या वर्षात, अशा तोट्यावर ७५ टक्के दराने भरपाईला मान्यता दिली होती. राज्य सरकारने २००६-०७ करिता रु.३०६१.२३ कोटी कराच्या अंतिम नुकसान भरपाईचा दावा दाखल केला (जानेवारी २००८). त्यापैकी रु.२०३७.८३ कोटी भारत सरकारने डिसेंबर २००८ पर्यंत मंजूर केले.

मुंबई पुणे विभागांच्या एप्रिल २००६ ते मार्च २००७ या कालावधीतील विवरणपत्रांनुसार मंजूर केलेला परतावा व मान्य केलेला मो.स्पि.क. (मुल्यवर्धित करेत महसूल) मद्यावरील कर आणि केंद्रीय विक्रीकरात समायोजित केलेल्या प्राप्त कराच्या जमा रकमा यांची नोव्हेंबर २००८ ते फेब्रुवारी २००९ मध्ये लेखा परीक्षणात छाननी केली. २००६-०७ या काळाकरिता निवडक विभागांमध्ये चाचणी तपासणी केलेल्या, मुल्यवर्धित करांतर्गत भरपाईच्या दाव्यात अंतर्भूत असलेल्या परताव्याची एकूण रक्कम, मोस्पिक, मद्यावरील कर व प्राप्त कराच्या जमा रकमा या खालील प्रमाणे आहेत :—

३१ मार्च २००९ रोजी संपलेल्या वर्षाचा अहवाल (महसुली जमा)

(रुपये कोटीत)

तपशील	भरपाईच्या दाव्यात अंतर्भूत असलेली एकूण रक्कम	मुंबई विभागात	पुणे विभागात
परतावा	२०३२.३८	५८२.३५	४८६.२५
मोस्पिक	६४९६.९८	६४९६.९८	निरंक
मद्यावरील कर	९५४.२४	३६२.९५	१३४.८१
प्राप्त कराच्या जमा रकमा	१०५८.८७	३७५.४५	४२८.६४

मुंबई व पुणे शाखांच्या अभिलेख्यांची चाचणी तपासणी असे दर्शविते की खालील परिच्छेदांमध्ये नमूद केल्याप्रमाणे एकूण रु.२७७.९९ कोटी एवढ्या जादा रकमेच्या भरपाईचा दावा करण्यात आला आहे.

अग्राह्य परताव्यांचा दाव्यामध्ये समावेश.

केंद्र शासनाने विहित केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, विभागाने मान्यता दिलेल्या फक्त मुल्यवर्धित कराच्या बाबींच्या संदर्भातील परताव्यांचाच भरपाईच्या दाव्यासाठी विचार करण्यात येतो.

महाराष्ट्र शासनाने २००६-०७ या वर्षात भरपाईपोटी एकूण रु.२०३२.३८ कोटींचे परतावे ग्राह्य धरले. यापैकी रु.५८२.३५ कोटी मुंबई विभागाशी व रु.४८६.२५ कोटी पुणे विभागाशी संबंधित होते. तथापि, विक्रीकर विभागाने लेखापरीक्षणास सादर केलेल्या माहितीनुसार मुल्यवर्धित कराच्या परताव्यातील रु.३०४.९६ कोटींचे परतावे मुंबई विभागातील होते व रु. ४३४.३७ कोटींचे परतावे पुणे विभागातील होते. परिणामी, रु.२४६.९५ कोटी इतक्या अतिरिक्त रकमेचा भरपाई दावा केला गेला आहे.

ही बाब निदर्शनास आणून दिल्यानंतर (फेब्रुवारी २००९) विभागाने रु.३२९.२७ कोटी इतक्या रकमेचे मुंबई व पुणे विभागातील जुन्या कायद्याच्या संदर्भातील परतावे समाविष्ट केल्यामुळे रु.२४६.९५ कोटी इतक्या अतिरिक्त भरपाईचा दावा केला गेल्याचे मान्य केले (मे व जुलै २००९).

१.३. ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात वित्त विभागाने पुरविलेल्या लेखी स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात असे नमूद करण्यात आले आहे की,

महालेखापालांनी रु.३२९.२७ कोटी इतक्या रकमेचे मुंबई व पुणे विभागातील जुन्या कायद्याच्या संदर्भातील परताचे समाविष्ट केल्यामुळे रु.२४६.९५ कोटी इतक्या अतिरिक्त भरपाईचा दावा केला गेल्याचे मान्य केले असे नमूद केले आहे.

दिनांक १४ मे २००९ रोजीच्या ज्येष्ठ उप महालेखापालांना अग्रेषित केलेल्या अर्ध शासकीय पत्रामध्ये स्पष्टपणे म्हटले आहे की, परताव्याच्या रकमा ह्या महालेखापालांनी प्रमाणित केलेल्या आहेत, विभागाने नव्हे. तसेच हे पण स्पष्ट केले होते की, केंद्र शासनाकडे भरपाईचा दावा करताना मुल्यवर्धितकराबरोबर जुन्या कायद्यातील परताव्यांचा पण अंतर्भाव करावयाचा होता. ह्या मुद्यावर त्यावेळेसच निर्णय झाला होता. भरपाईच्या दाव्यामध्ये जुन्या कायद्याखालील परताव्यांचा समावेश केल्याचा आक्षेप महालेखापालांनी वर्ष २००५-०६ मध्ये उपस्थित केला होता. त्यानंतर या मुद्यावर शासनाच्या वित्त विभागाशी दिनांक ८ मार्च २००७ च्या पत्रानुसार चर्चा झाली होती. तसेच मुल्यवर्धित कर व मुंविका कराचा जमा महसूल व त्या त्या कायद्यातील परताव्यांची विभागणी करण्याची आवश्यकता नाही. याबाबतही निर्णय झाला होता. तसेच हा मुद्या केंद्र शासनाच्या शक्ति प्रदत्त समिती (Empowered committee) च्या स्तरावर सुद्धा स्पष्ट झाला आहे. महालेखापालांनी हा आक्षेप मुं.वि.का. कायद्याच्या निव्वळ महसुलावर काढला आहे. मुं.वि.का.चा महसुल हा ढोबळ (Gross) तसेच निव्वळ (Net) महसुलाचाच भाग आहे. केंद्र शासनाने वर्ष २००५-०६ करीता जुन्या कायद्यातील परतावे सुद्धा विचारात घेऊन त्याप्रमाणे भरपाईचा दावा मंजूर केला आहे.

सबब, महालेखापालांनी उपस्थित केलेला हा मुद्या विभागाला मान्य नाही. शासनाने केंद्र शासनाकडे उर्वरीत भरपाईच्या दाव्यासाठी विनंती केली आहे.

महालेखाकारांचे अभिप्राय :

विक्रीकर आयुक्त यांनी प्रधान सचिव, वित्त विभाग महाराष्ट्र शासन यांना जानेवारी २००८ मध्ये पाठवलेल्या पत्रानुसार परतावा, लेखा परिक्षण विभागाने दर्शविलेला रु. १.०७ कोटी इतका अतिरिक्त परतावा विचारात घऊन, विभागाने २००६-०७ या वर्षाच्या अंतिम भरपाई दाव्यामध्ये निव्वळ महसुलीची रक्कम रु. १.०७ कोटीने वाढविली होती. अभिलेख्यांची तपासणी असे दर्शविते की, मुंबई व पुणे येथील परतावा लेखापरीक्षण विभागाने अनुक्रमे रु. ९६.७९ लाख व रु. ४५.६९ लाख इतक्या रकमेचे परतावे (एकूण रु. १.४२ कोटी) प्रत्यक्षात नामंजुर केले होते. अशा रितीने निव्वळ महसुलाची रक्कम रु. १.०७ कोटी ऐवजी रु. १.९९ कोटीने वाढविणे आवश्यक होते. म्हणजेच रु. ६९ लाख इतक्या रकमेचा अतिरिक्त भरपाई दावा करण्यात आला. (१.९९-१.०७) कोटी = ९२ लाख × ७५ टक्के.

या प्रकरणाचा अहवाल विभागात व शासनाला मार्च २००९ मध्ये सादर करण्यात आला असून त्यांच्याकडील उत्तर प्रलंबित आहे (नोव्हेंबर २००९).

१.४. ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात वित्त विभागाने पुरविलेल्या लेखी स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात असे नमूद करण्यात आले आहे की,

हा आक्षेप विभागाला मान्य आहे. परतावा शाखा, मुंबई व परतावा शाखा पुणे, विभागाने अनुक्रमे रु. ९६.७९ लाख व रु. ४५.६९ लाख इतक्या रकमेचे परतावे नामंजूर केले त्यामुळे ९२ लाखाच्या ७५% इतके रुपये ६९ लाखाचा भरपाईचा अतिरिक्त दावा करण्यात आला.

मद्यावरील करापोटी जमा झालेल्या जादा रकमेचा समावेश.

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वांनुसार, भरपाई दाव्याच्या रकमेची संगणना करताना, मद्यावरील करापोटी जमा झालेल्या रकमा वगळण्यात याव्यात. महाराष्ट्र शासनाने २००६-०७ या वर्षासाठी दाखल केलेल्या दाव्यातून रु. ९५४.२४ कोटी इतकी रक्कम मद्यावरील करापोटी जमा रक्कम म्हणून वजा केली. त्यापैकी रु. ३९२.९५ कोटी मुंबई विभागाशी संबंधित आहेत.

मुंबई विभागाच्या अभिलेख्यांच्या चाचणी तपासणी दरम्यान असे दिसून आले की २० प्रकरणांमध्ये मद्यावरील करापोटी जमा झालेली रक्कम ही रु. ६९.५० कोटी इतकी धरण्यात आली होती. या प्रकरणात, सनदी लेखापालांनी नमुना ७०४ मध्ये सादर केलेल्या लेखापरीक्षण अहवालाच्या तपासणीत असे दिसून आले की, मद्यावरील करापोटी प्रत्यक्ष जमा झालेली रक्कम ही रु.३०.१५ कोटी इतकीच होती. अतिरिक्त रक्कम रु. ३९.३५ कोटी (६९.५०-३०.१५) ही खाद्यान्न विक्रीवरील कराचा समावेश व स्थानिक विक्रीवरील प्राप्त कराची जमा रक्कम न वगळणे यामुळे आलेली होती. यामुळे रु. ३९.३५ कोटी इतक्या अतिरिक्त रकमेची वजात व अतिरिक्त भरपाई दावा रु.२९.५१ कोटी (रु. ३९.३५ कोटीच्या ७५ टक्के) झालेली आहे.

ही प्रकरणे निदर्शनास आणल्यावर (मार्च २००९) विभागाने रु.२७.८२ कोटी इतक्या रकमेच्या १९ प्रकरणात निष्कर्ष मान्य केले (जून २००९) उरलेल्या प्रकरणी उत्तर प्रलंबित आहे.

या प्रकरणाचा अहवाल शासनाला मार्च २००९ मध्ये सादर केला असून त्यांच्याकडून अद्याप उत्तर प्राप्त झालेले नाही. (नोव्हेंबर २००९).

पुनर्विचारणा : पत्र क्र.ब-६५०, दिनांक ९ जून २००९ नुसार रु.२७.८२ करोड मद्यविक्रीवरील कराच्या मूळ भरपाईच्या दाव्यात जास्त केल्याचे मान्य केले आहे. जे विवरण शाखे तर्फे मूळ दाव्यातून कमी करावयास हवे आहे.

१.५. ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात वित्त विभागाने पुरविलेल्या लेखी स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात असे नमूद करण्यात आले आहे की,

मद्यावरील करापोटी जमा झालेल्या जादा कराच्या समावेशामुळे रु.२९.५१ कोटी (३९.३५ कोटीचे ७५%) इतक्या भरपाईचा अतिरिक्त दावा केंद्र शासनाकडे केल्याचा आक्षेप महालेखापालांनी घेतला आहे व तो विभागाने रु.२७.८२ कोटी पर्यंत मान्य केला असे नमूद केले आहे.

विभागाने वरील मुद्या प्रित्यर्थ पडताळणी केली असता असे आढळून आले की, वर्ष २००६-०७ मध्ये भरपाईचा दावा करताना २० व्यापाऱ्यांच्या मद्यावरील जमा कराची रक्कम रु.२००.९३ कोटी इतकी दर्शविली होती. महालेखापालांनी वरील प्रकरणात घेतलेल्या रकमेमध्ये खाद्य पदार्थावरील विक्रीचा पण समावेश होता. त्यामुळे महालेखापालांनी सदर मुद्या उपस्थित केला होता. परंतु पडताळणीनंतर असे दिसून आले की, मूळ भरपाईचा दावा करताना मद्यावरील जमा कराची रक्कम रु.२०४.६७ कोटी इतकी दर्शविली होती. सबब, रु. ३.७४ कोटीचा (२०४.६७-२००.९३ कोटी) कमी दावा करण्यात आला. मेळजुळणी नंतर (Reconcilation) ६.४१ कोटीच्या फरकामुळे रु.२.७० कोटीवर जादा भरपाईचा दावा २.०२ कोटी (२.७० च्या ७५ %) इतका करण्यात आला.

पुनर्विचारणेस उत्तर.—या कायार्लयाचे पत्र क्र.ब-५१५७, दिनांक २१ एप्रिल २०११ स्मरणपत्रे ब-५४८४, दिनांक १२ जुलै २०११ व ब-५५४१, दिनांक २८ जुलै २०११ पाठवूनही मुद्दे निहाय अहवाल विक्रीकर सह आयुक्त (मुख्यालय) ६, म.रा.,मुंबई यांचेकडून अद्याप प्रलंबित आहे.

प्राप्त कराच्या जमा रकमेची भरपाईच्या दाव्यातून चुकीची वजावट.

भारत सरकारने जारी केलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार, भरपाई दावा रकमेची संगणना करताना, केंद्रीय विक्रीकरात समायोजित केलेल्या प्राप्त कराच्या जमा रकमा वगळण्यात याव्यात. मुंबई विभागाच्या अभिलेख्यांच्या चाचणी तपासणी करताना असे आढळले की, आठ प्रकरणांत प्राप्त कराची जमा रक्कम ही व्यापाऱ्यांनी सादर केलेल्या विवरणपत्रानुसार रु. ४.७८ कोटी इतकी धरण्यात आली होती. तथापि, सनदी लेखापालांनी नमुना ७०४ मध्ये सादर केलेल्या लेखापरीक्षण अहवालानुसार या व्यापाऱ्यांच्या संदर्भात केंद्रीय विक्रीकरात समायोजित केलेली प्राप्त कराची जमा रक्कम ही केवळ रु. ३.६६ कोटी इतकीच होती. यामुळे अर्थ, अतिरिक्त वजाती रु.१.१२ कोटी (रू. ४.७८ कोटी - रु. ३.६६ कोटी) व परिणामी अतिरिक्त दावा रु. ८४.३३ लाख इतका झालेला आहे (रु. १.१२ कोटीच्या ७५ टक्के).

याचा अहवाल विभागाला व शासनाला जानेवारी ते मार्च २००९ या दरम्यान सादर केला असून त्यांचे उत्तर अद्याप प्राप्त झालेले नाही (नोव्हेंबर २००९).

१.६. ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात वित्त विभागाने पुरविलेल्या लेखी स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात असे नमूद करण्यात आले आहे की,

एकूण ९ प्रकरणात केंद्रीय विक्रीकरात समायोजित करण्यात आलेली प्राप्त कराची रक्कम रु. १.१२ कोटी जास्त असल्यामुळे अतिरिक्त भरपाईचा दावा रु. ८४.३३ लाख (रु. १.१२ कोटीच्या ७५%) इतका झालेला आहे. असा महालेखापालांचा आक्षेप आहे.

या मुद्यास अनुसरुन विभागाने वरील व्यापाऱ्यांचे नमुना ७०४ तपासून पाहिले असता असे आढळून आले की, केंद्रीय विक्रीकरात समायोजित केलेली प्राप्त कराची रक्कम ही फक्त रु. ३१.६५ लाख एवढीच आहे. त्यामुळे त्या प्रमाणातच भरपाईचा अतिरिक्त दावा केला गेला आहे. सोबत संबंधित व्यापाऱ्यांच्या नमुना ७०४ मधील रकमांचे विवरणपत्रक सादर केले आहे.

१.७. सामूहिक प्रोत्साहन योजनेखाली कराचे चुकीचे विलंबन.

१९९३ च्या सामुहिक प्रोत्साहन योजनेनुसार पात्र घटकांना योजनेतील विनिर्दिष्ट अटी व शर्तींच्या अधीन राहून पात्रता व अनुज्ञेयता प्रमाणपत्राच्या कक्षेत येणाऱ्या कालावधीतील पक्क्या मालाच्या विक्रीवर व स्थानिक विक्रीकर किंवा केंद्रीय विक्रीकर आणि कच्च्या मालाच्या खरेदीवर खरेदीकर या स्वरुपात प्रोत्साहन मिळण्याचा अधिकार आहे. त्याचा वस्तूच्या उत्पादनासाठी अतिरिक्त उत्पादन क्षमता निर्माण करण्याचा सध्या अस्तित्वात असलेल्या घटकाला फक्त वाढीव क्षमतेद्वारे उत्पादीत वस्तुंवरच कराचा फायदा मिळेल. तसेच पात्रता प्रमाणपत्रात नमुद केलेल्या विनिर्दिष्ट दराने किंवा पूर्णतः कर विलंबाने भरणे आवश्यक राहील.

जुलै २००५ मध्ये घाटकोपर विभागाच्या अभिलेख्यांच्या तपासणी दरम्यान २००१-०२ व २००२-०३ करिता सप्टेंबर २००४ आणि ऑक्टोबर २००४ मध्ये केलेल्या यीस्ट बनवणाऱ्या एका व्यापाऱ्याच्या निर्धारणात असे दिसून आले की, उत्पादन क्षमता वाढविण्यासाठी प्रोत्साहन म्हणून ऑक्टोबर २००० ते सप्टेंबर २००८ या कालावधीत विलंबाने विक्रीकर भरण्याचे पात्रता/अनुज्ञेयता प्रमाणपत्र देण्यात आले होते. या प्रमाणपत्रात विहित केल्यानुसार पात्र घटकांना विलंबाने कर भरण्याची मुभा उत्पादनाच्या ३७.५८ टक्के इतकीच होती. तथापि, विलंबाने भरण्याच्या कराच्या रकमेची संगणना करताना अनुज्ञेयता प्रमाणपत्रात नमुद केलेल्या टक्केवारी इतकी रक्कम मर्यादित केली गेली नाही व भरलेल्या करातून तेवढी वजावटही कमी केली गेली नाही. परिणामी, जास्त रकमेची कर भरणी लांबणीवर टाकली गेली व पर्यायाने निर्धारणा आदेशानुसार चुकीने मंजूर केलेल्या परताव्यातील रु.६.२४ लाख व्याजाची वजावट धरुन एकूण रु. ६४.७४ लाख इतक्या कराने न्युन निर्धारण झाले.

ही बाब ऑगस्ट २००५ मध्ये निदर्शनास आणल्यावर विभागाने एप्रिल २००८ मध्ये निर्धारणात सुधारणा केली व रु.१९ लाख व्याजासहीत रु. १.३७ कोटीची अतिरिक्त मागणी केली. वसुलीचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे (नोव्हेंबर २००९).

ही बाब विभागास व शासनास एप्रिल २००९ मध्ये कळविण्यात आली. त्यांचेकडील उत्तर अद्याप प्राप्त झाले नाही (नोव्हेंबर २००९).

विलंबाने भरावयाच्या कराच्या रक्कमेची संगणना करताना प्रमाणपत्रात नमुद केलेल्या टक्केवारी इतकी रक्कम मर्यादित केली गेली नाही व भरलेल्या करातून तेवढी वजावटही कमी केली गेली नाही परिणामी जास्त रक्कमेची कर भरणी लांबणीवर टाकण्यात आली. रु. ६४.७४ लाखाची न्युन निर्धारणा झाली (पर्यायाने निर्धारणा आदेशानुसार परताव्यावर दिलेल्या रु. ६.२४ लाखाच्या व्याजासह).

पुनर्विचारणा क्र. १.— या प्रकरणातील वसुली कार्यवाही अहवाल स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात दर्शविण्यात यावा.

ज्ञापन :

१.८. उपरोक्त अभिप्रायासंदर्भात वित्त विभागाने पुरविलेल्या लेखी स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात असे नमूद करण्यात आले आहे की,

व्यापाऱ्याचे नावं : मे.सेफ इस्ट कं.प्रा.लि.

नोंदणी क्रमांक : ४०० ०७१/एस/८३०.

कालावधी : दिनांक २००१-०२, २००२-०३.

निर्धारणा आदेश दिनांक : दिनांक १० सप्टेंबर २००४ व १८ ऑक्टोबर २००४

दोष निवारण कृती : विक्रीकर सहआयुक्त (व्हॅट प्रशा) रायगड विभाग, बेलापूर यांनी मुं.वि.का.कलम ५७, दिनांक९/४/०८ अन्वये मुं.वि.का. व के.वि.का. आदेश पारीत करून कालावधी २००१-०२ मध्ये मुं.वि.का. खाली ६,७२,०५१९/- व के.वि.का. खाली ३,८९,७५३/- व कालावधी २००२-०३ मध्ये मु.वि.का. खाली ५९,७१,८५४/- व के.वि.का. खाली ९,८२,८२४/- इतकी अतिरिक्त मागणी काढली.

वसुली कार्यवाही :

अंतर्गत लेखापरीक्षण झाले होते काय ? : नाही.

पुनर्विचारणेस उत्तर : व्यापाऱ्याने सुधारित आदेशान्वये न्यायाधिकरणाकडे अपिल दाखल केले होते. त्यांच्या निर्णयानुसार सुधारित आदेश रद्द करून प्रकरण निर्देशासह पुनर्निर्धारणेकरीता पाठविली आहेत.

१.९. साक्ष :

उपरोक्त परिच्छेदासंदर्भात लोकलेखा समितीने दिनांक १६ जानेवारी, २०१४ रोजी वित्त विभागाचे प्रधान सचिव व विभागाच्या अन्य प्रतिनिधींची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी एलबीटीच्या संदर्भात नियुक्त केलेल्या समितीबद्दल विभागाच्या प्रतिनिधींनी समितीस अशी माहिती दिली की, एलबीटी समिती मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आली आहे. त्या समितीची कार्यकक्षा अशी आहे की, एलबीटी प्रणाली राबवितांना येणाऱ्या अडचणी दूर करणे. सरकारने स्थापन केलेल्या समितीमध्ये सुबोधकुमार नाहीत काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी समितीला सांगितले की, उद्योग संघ (इंडस्ट्री असोसिएशन) यांनी नियुक्त केलेल्या समितीमध्ये सुबोधकुमार आहेत. ही खाजगी समिती आहे. त्या समितीने अहवाल शासनाला सादर केलेला आहे.

सन २००६ मध्ये सरकारने एक समिती स्थापन केली होती त्यामध्ये सुबोधकुमार होते. त्या समितीने शासनाला काही सूचना केल्या होत्या. सन २००६-२००७ मध्ये त्या समितीने जकात कर काढून टाकावा अशी सूचना केली होती. त्यानंतर त्याबाबत पुढे काहीही झाले नाही. एलबीटी प्रणालीतील अडचणी दूर करण्यासाठी आता समिती स्थापन करण्यात आली आहे, त्यामध्ये सुबोधकुमार नाहीत. ते खाजगी समितीमध्ये होते. खाजगी समितीने दोन तीन सूचना केल्या होत्या. जकातसारखा वेगळा कर (टॅक्स) आणावा आणि व्हॅटवर अधिभार लावावा अशा सूचना केल्या होत्या.

१.१०. विभागाच्या सचिवांनी समितीस पुढे असेही सांगितले की, **परिच्छेद क्र.२.५ " महाराष्ट्रात लागू केलेल्या मूल्यवर्धित करामुळे झालेल्या महसूल हानीच्या भरपाईचा जास्तीचा दावा "** नुसार महाराष्ट्रात मूल्यवर्धित कराची अंमलबजावणी केल्यामुळे महसुलाची जी हानी होईल त्याची भरपाई केंद्र सरकार करून देणार होते. यापूर्वी विक्रीकर होता. व्हॅटची अंमलबजावणी दिनांक १ एप्रिल, २००५ पासून सुरू झाली आहे. राज्यामध्ये व्हॅट कायद्याची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर महसुलाची हानी झाली तर जितक्या रकमेची हानी होईल तेवढी रक्कम केंद्र शासन राज्य सरकारला देईल अशाप्रकारचा सामंजस्य करार झाला होता. केंद्र सरकारकडून महसूल हानीची भरपाई जास्त मागितली असा आक्षेप महालेखाकार (एजी) कार्यालयाने घेतलेला आहे. केंद्र सरकारने तसा आक्षेप घेतलेला नाही म्हणजेच महालेखाकार (एजी) कार्यालयाने काढलेला आक्षेप राज्य सरकार व वित्त विभागाला मान्य नाही असे वित्त विभागाचे म्हणणे आहे असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, केंद्र सरकारने महसूल हानीची भरपाई केली त्याबाबत केंद्र सरकारचे आक्षेप नाही. मात्र महालेखाकार कार्यालयाने आक्षेप घेतले आहे. परिगणनेमध्ये (कॅल्क्युलेशन) काही थोडा फरक झाला असेल तर ते मान्य करता येईल. सन २००५ पूर्वी राज्यात बीएसटी लागू होता त्यानुसार महसूल प्राप्त होत होता. त्या आधारावर व्हॅट लागू केल्यानंतर जी हानी होईल ती केंद्र शासनाकडून भरपाई दिली जाणार होती. त्यानुसार केंद्र सरकारकडून भरपाई राज्य शासनाला मिळालेली आहे. लिकरवरच्या विक्रीवर लावण्यात आलेला व्हॅट हा मागणीतून वजा करण्यात यावा. तसेच ज्या ज्या करातून सूट (टॅक्स एक्झमशन्स) आहेत त्या देखील मागणीतून वजा कराव्यात. अशाप्रकारचे आक्षेप महालेखाकाराच्या अहवालात आहे. परंतु केंद्र सरकारकडून आक्षेप घेण्यात आले नाही.

अग्राह्य परताव्यांचा दाव्यामध्ये समावेश या परिच्छेदाबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, दोन-तीन परिच्छेदामध्ये छोट्या छोट्या मूल्यनिर्धारण (असेसमेंट) आहेत. त्यामध्ये विभागाने केन्द्र शासनाकडून जास्त रकमेची मागणी केलेली आहे असे महालेखाकाराचे म्हणणे आहे. परंतू यामध्ये केवळ ६९ लाख रु. इतकीच रक्कम आहे.

१.११. विभागाने रु. ३२९.२७ कोटी इतक्या रकमेचे मुंबई व पुणे विभागातील जुन्या कायद्याच्या संदर्भातील परतावे समाविष्ट केल्यामुळे रु. २४६.९५ कोटी इतक्या अतिरिक्त भरपाईचा दावा केला गेल्याचे मान्य केलेले आहे असे महालेखाकाराचे म्हणणे आहे. ही बाब समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, इतर राज्यांना केन्द्राकडून ज्या प्रमाणात रक्कम मिळते त्या प्रमाणात ती महाराष्ट्र राज्याला देखील मिळावी असे वित्त विभागाचे म्हणणे असून त्याप्रमाणे ती रक्कम परिगणन (कॅल्क्युलेट) केलेली आहे.

अग्राह्य परताव्यांच्या दाव्यामध्ये समावेश या परिच्छेदामध्ये राज्य शासनाने केलेल्या भरपाईचा दावा मान्य केलेला आहे. यामध्ये रु. ६९ लाख इतक्या रकमेच्या भरपाईचा दावा करण्यात आलेला आहे. त्यासंबंधी यूआर आलेला आहे. हा मुद्दा राज्य शासनाने मान्य केलेला असून त्यासंबंधी राज्य शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली हे समजणे अपेक्षित आहे असे महालेखाकारांनी समितीस सांगितले असता, यासंदर्भात विभागीय प्रतिनिधींनी अशी माहिती दिली की, त्या त्या वर्षी जे जे परतावे आले त्यावर परिगणना (कॅल्क्युलेशन) करून केन्द्र सरकारकडे मागणी करण्यात आली. व्यापाऱ्यांनी परतावा (रिटर्न्स) भरल्यानंतर आम्ही मूल्यनिर्धारण आदेश (असेसमेंट ऑर्डर) काढतो. त्या बाबतीत ज्यांचे आक्षेप असतील ते लोक अपिलामध्ये जातात. परतावा शाखा, मुंबई व परतावा शाखा, पुणे विभागाने अनुक्रमे रु. ९६.७९ लाख व रु. ४५.६९ लाख इतक्या रकमेचे परतावे नामंजूर केले. त्यामुळे केन्द्र सरकारकडे कमी रकमेची मागणी केली. केवळ ६९ लाख रु. इतकीच रक्कम मागितली. पहिल्या वर्षाची मागणी (क्लेम) पूर्ण झालेले आहेत. पहिल्या वर्षाची शंभर टक्के, दुसऱ्या वर्षाची ७५ टक्के आणि तिसऱ्या वर्षाची ५० टक्के मागणी (क्लेम्स) केलेली आहेत. अजून सर्व पैसे दिलेले नाहीत. त्याची कारणे वेगवेगळी आहेत. महालेखाकारांनी दुसऱ्या मुद्यासंबंधी जो आक्षेप घेतलेला आहे त्याची पूर्तता केलेली आहे. त्यासंबंधी माननीय मुख्यमंत्री महोदय माननीय केन्द्रीय वित्त मंत्र्यांना पत्र लिहिणार आहेत. ते पैसे केन्द्राकडून येतील. परंतू केन्द्राकडे जास्त रकमेची मागणी करु नका असे महालेखाकारांचे म्हणणे आहे. यावर विभागीय प्रतिनिधींनी समितीस माहिती दिली की, विभागाचे म्हणणे असे आहे की, महालेखाकार यांनी केन्द्राचे लेखापरिक्षण (ऑडिट) करून राज्य शासनाला जे काही कायदेशीर (लेजिटिमेट) पैसे द्यावयास पाहिजेत ते त्यांनी द्यावे. तसे ते दिले तर विभागाची कोणतीही हरकत राहाणार नाही. विभाग कमी-जास्त रक्कम समायोजन (ॲडजस्ट) करायला तयार आहे. जर दुसऱ्या राज्याला केन्द्राकडून जास्त रक्कम मिळत असेल तर महाराष्ट्र राज्याला देखील ती मिळायला पाहिजे असे विभागाचे मत आहे.

१.१२. सामूहिक प्रोत्साहन योजनेखाली कराचे चुकीचे विलंबन याबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी समितीला अशी माहिती दिली की, उद्योग विभागाची सामूहिक प्रोत्साहन योजना आहे. या योजनेअंतर्गत पात्र घटकांना योजनेतील विनिर्दिष्ट अटी व शर्तींच्या अधीन राहून पात्रता व अनुज्ञेयता प्रमाणपत्राच्या कक्षेत येणाऱ्या कालावधीतील पक्क्या मालाच्या विक्रीवर व स्थानिक विक्रीकर किंवा केंद्रीय विक्रीकर आणि कच्च्या मालाच्या खरेदीवर खरेदीकर या स्वरुपात प्रोत्साहन मिळण्याचा अधिकार आहे. घाटकोपर येथील मे. सेफ इस्ट प्रा.लि. कंपनीच्या संदर्भातील हा मुद्दा आहे. सन २००१-०२ व २००२-०३ करिता उत्पादन क्षमता वाढविण्यासाठी प्रोत्साहन म्हणून ऑक्टोबर २००० ते सप्टेंबर २००८ या कालावधीत विलंबाने विक्रीकर भरण्याचे अनुज्ञेयता प्रमाणपत्र देण्यात आले होते. परंतु अनुज्ञेयता प्रमाणपत्रात नमूद केल्याप्रमाणे विक्रीकर भरण्यात आला नाही. या प्रकरणी कारवाई केल्यानंतर ते अपिलामध्ये गेले. अपिल प्राधिकारी (ॲपिलेट ॲथॉरिटी) जो काही निर्णय देईल त्याप्रमाणे

पुढील कारवाई केली जाईल. यावर महालेखाकारांनी असे सांगितले की, ज्याप्रमाणे वसुली (रिकव्हरी) होईल त्याप्रमाणे महालेखाकारांना माहिती देण्यात यावी. याबाबत विभागीय प्रतिनिधींनी अशी माहिती दिली की, न्यायाधिकरणाने (ट्रिब्युनलने) असे म्हटलेले आहे की, त्या घटकाला दुसऱ्या एका निर्णयामध्ये (जजमेंटमध्ये) शंभर टक्के लाभ (बेनिफिट) दिला पाहिजे. त्या निर्णयाचा (जजमेंटचा) विचार करून अपिल प्राधिकारीने आदेश (ॲपिलेट ॲथॉरिटीने ऑर्डर) पास करावी. न्यायाधिकरणाने (ट्रिब्युनलने) पी.व्ही. टेक्स्टाईल प्रकरणी जो निर्णय दिलेला आहे त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

१.१३. दोष निवारण कृती या बाबीअंतर्गत रु.९,८२,८२४ इतकी अतिरिक्त मागणी काढलेली आहे असे समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिले असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, त्या घटकाला काही प्रमाणात सवलत द्यावयाची होती. परंतु आम्ही ती पूर्णपणे दिली. त्याबाबतीत कारवाई केल्यानंतर तो घटक न्यायाधिकरणामध्ये (ट्रिब्युनलमध्ये) गेला. न्यायाधिकरणामध्ये (ट्रिब्युनलमध्ये) पी.व्ही.टेक्स्टाईल प्रकरण होते. त्या प्रकरणी मोठा वाद निर्माण झाला होता. ते प्रकरण सुप्रीम कोर्टापर्यंत गेले होते. पी.व्ही.टेक्स्टाईल प्रकरणी न्यायाधिकरणाने (ट्रिब्युनलने) जो निर्णय दिलेला आहे त्याप्रमाणे कारवाई करण्यात येईल.

व्हॅट लागू झाल्यानंतर परताव्याचा विषय सुरू झाला. परताव्याची प्रकरणे किती आहेत, न्याय प्राधिकरणावर नेमणुका केलेल्या आहेत काय, न्याय प्राधिकरणामध्ये किती जागा रिक्त आहेत, किती दिवसापासून लोक कोर्टामध्ये गेले आहेत, परताव्याची रक्कम किती आहे, बजेटमध्ये ही रक्कम दाखविली जाते काय, व्हॅटच्या माध्यमातून जे उत्पन्न वाढेल त्यामधून परताव्यापोटी किती रक्कम परत करावी लागेल, अशा विविध प्रश्नाबाबत समितीला माहिती देण्यास प्रतिनिधींना सांगण्यात आले. यासंबंधी विधानसभेमध्ये अर्थसंकल्पावरील चर्चेच्या वेळी चर्चा होते. या सर्व मुद्यासंबंधी ॲकेडेमिक चर्चा व्हायला पाहिजे. हा विषय विधानसभेमध्ये सुद्धा लोकप्रतिनीधींनी उपस्थित केला होता. याबाबतीत आपल्या सिस्टिममध्ये काही दोष आहेत काय, पदे कमी आहेत काय, सुनावणी (हिअरिंग) होत नाही काय अशा प्रकारचे विविध प्रश्न आमच्यापुढे निर्माण होतात. प्रकरण अपिलामध्ये गेल्यानंतर शासनाच्या विरुद्ध निर्णय लागतात. प्राधिकरण व्यापा-यांच्या बाजूने निर्णय देते. मुळात कर निर्धारण चुकीचे करून कराचा आकडा फुगवून सांगून नंतर पैशासाठी तडजोड केली जात असल्याची प्रकरणे उघडकीस आलेली आहेत.

१.१४. महापालिकेने कर आकारणीसंबंधी मूल्यांकन केले. एकतर्फी निर्णय दिला की लोक कोर्टात जातात, परिणामी महापालिकेला करोडो रुपयाचा तोटा होतो. उदा. जर कोणावर कर बसविला आणि तो त्याला मान्य नसला तर तो कोर्टात जातो, कोर्टात गेल्यानंतर २०-२० वर्षे निर्णय लागत नाही, तितकी वर्षे कराची रक्कम भरली जात नाही आणि त्यावर व्याजही मिळत नाही. एखाद्याला कराच्या रकमेसंबंधी कोर्टात जायचे असेल तर त्याने कमीत कमी रक्कम न्याय प्राधिकरणाकडे भरली पाहिजे. उदा. जर १०० रुपये कर भरण्यास सांगितले असेल आणि हिशेबाप्रमाणे ९४ रुपये कर भरावयाचा असेल तर ६ रुपयाच्या फरकासाठी कोर्टामध्ये जातात आणि कोर्टाचा निर्णय लागे पर्यंत १०० रुपये कर भरत नाही आणि त्यावरील व्याजही भरत नाही. म्हणून कोर्टात जाण्यापूर्वी कमीत कमी ९४ रुपये तरी कर भरला पाहिजे अशा प्रकारचे बंधन असले पाहिजे. यासंदर्भात काही कायदा आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी समितीस अशी माहिती दिली की, मागील आठवड्यामध्ये झालेल्या साक्षीच्या वेळी हा मुद्दा उपस्थित झाला होता आणि त्यावेळी विभागाने उत्तर दिले होते. कराच्या ५० टक्क्यापर्यंत रक्कम घेण्यासंबंधी पूर्वी प्रशासकीय सूचना घेतल्या होत्या. पण उच्च न्यायालयाने त्या रद्दबातल ठरविल्या. मग कायद्यामध्ये असा बदल करण्यात आला की, कोणी जर २/३ समायोजन (ॲडजस्टमेंट) मागत असेल तर त्याने किमान १५ टक्के पार्टपेमेंट भरले पाहिजे अन्यथा अपिल काढून टाकण्यात येईल. उपायुक्त आणि सहआयुक्त, विक्रीकर यांना अशा सूचना दिल्या आहेत की, पार्टपेमेंट ठरविताना कराची जी निश्चित रक्कम दिसते, जी रक्कम करदात्याला मान्य असते, ज्या रकमेबाबत वाद असू शकत नाही तेवढी रक्कम पार्टपेमेंट म्हणून घ्यावी. पार्टपेमेंटची रक्कम निगोशिएट करता येते, त्यासाठी आदेश (ऑर्डर) पास करावा लागतो. त्या आदेशावर (ऑर्डरवर) करदाता पुन्हा न्यायाधिकरणाकडे (ट्रिब्युनलकडे) जातो. १५ टक्के रक्कम भरण्यासंबंधीची तरतूद कायद्यामध्ये केलेली असून त्याची अंमलबजावणी सुरू केलेली आहे.

१.१५. दुसरा मुद्दा परताव्या संबंधीचा आहे. अर्थसंकल्पामध्ये (बजेटमध्ये) नेट फिगर दाखविल्या जातात. एकूण कर गोळा करण्याचे उद्दिष्ट ठरवून दिलेले असते. तसेच काही रक्कम परतावासाठी ठेवलेली असते. या वर्षी साडेचार हजार कोटी रुपये परतावा देण्याचे ठरविलेले असून आतापर्यंत सव्वातीन हजार कोटी रुपये परत दिलेले आहे. जेवढे परतावासाठी अर्ज करतात त्यासर्वांना परतावा देण्याचा प्रयत्न केला जातो. किती परतावा देणे शिल्लक आहे याची आकडेवारी विभागाकडे याक्षणी उपलब्ध नाही. यासंबंधी मार्च मधील अधिवेशनामध्ये प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. २००५-०६ आणि २००७-०८ ची सर्व प्रकरणे निकाली काढलेली आहेत. त्यानंतरच्या प्रकरणामध्ये निर्धारणा केलेली आहे. २००७-०८ ते २०१०-११ या चार वर्षांचे निर्धारण जून अखेरपर्यंत पूर्ण करण्यात येईल. या चार वर्षांचा परतावा जून पर्यंत संपणार आहे. त्यापद्धतीने सर्व यंत्रणा कामाला लावलेली आहे. पूर्वी पालघर येथील चुकीच्या पद्धतीने परतावा घेण्याची प्रकरणे निदर्शनास आली होती. त्यानंतर सहा-सात महिने परतावा देण्याच्या प्रक्रियेमध्ये चेक्स ॲण्ड बॅलन्स आणून ती प्रक्रिया बदलण्यात आली. त्या कालावधीमध्ये कमी परतावा गेले ही वस्तुस्थिती

आहे. पालघर येथील मोठे प्रकरण विभागाने शोधून काढले. काही व्यापा-यांनी कर सल्लागार आणि अधिकारी यांच्या मदतीने चुकीचा परतावा मागितला होता. त्या प्रकरणी फौजदारी कारवाई सुरू केलेली आहे. त्याशिवाय जे लोक निर्यात करतात, जे महाराष्ट्र राज्याच्या बाहेर विक्री करतात त्यांचे परतावा ताबडतोबीने दिले जाते. त्यांच्यासाठी फास्ट ट्रॅक्ट परताव्याची सोय केलेली आहे. आता परताव्याचा फार मोठा प्रश्न नाही, ही परताव्याची बाब आवाक्यात आहे. मागील वर्षी साडेतीन हजार कोटी रुपयाचे परतावा दिले होते. यावर्षी देखील आतापर्यंत तेवढीच रक्कम परतावा म्हणून दिलेली आहे. विभागाकडे येणाऱ्या आकड्यामध्ये एकूण रक्कम असते. त्यामुळे ते आकडे फुगविलेले नसतात.

१.१६. करदात्याला कर वाढवून सांगणे आणि नंतर तो कमी करणे, अपिलामध्ये जाणे, असे प्रकार होऊ नयेत यानुषंगाने मुद्दा उपस्थित करण्यात आला. शंभर टक्के प्रकरणामध्ये कर निर्धारणा करीत नाही. व्यापाऱ्यांनी माल कोणाकडून विकत घेतला आणि कोणाला विकला याची माहिती एकत्रित करून त्यामधील तफावत शोधतो आणि त्यानुसार कारवाई करतो. गेल्या वर्षी २००५-०६ आणि २००८-०९ या वर्षाची निर्धारणा झाली. ते काम करीत असताना काही एक्सपार्टी ऑर्डर्स दिलेल्या आहे. ब-याच प्रकरणी व्यापारी आले नाहीत. त्यांनी माहिती दिली नाही. यावर्षी त्याची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून निर्धारणा अधिकाऱ्याचे शिबिर घेऊन त्यांना स्पेसिफिक सूचना दिलेल्या आहेत. टॅक्स रिस्क किती आहे आणि व्यापाऱ्याकडून किती रक्कम भरली गेली पाहिजे याचा विचार करून निर्धारणा अधिकाऱ्याने आदेश पारित करावेत आणि हे करीत असताना कोणकोणत्या गोष्टी काळजीपूर्वक पहाव्यात यासंबंधीच्या सूचना विभागीय अधिकारी आणि व्यापारी संघटना यांना एकत्रितपणे दिलेल्या आहेत. त्यामुळे चार वर्षांचे निर्धारण एका वर्षात करण्याचा प्रयत्न करीत आहोत. या कामामध्ये व्यापारी संघटनांनी देखील सहकार्य केलेले आहे.

१.१७. आपण जे जे मुद्दे उपस्थित केलेले आहेत त्यानुषंगाने आम्ही सुधारणा करण्याचा प्रयत्न करीत आहोत. या कामाचे नव्याने संगणकीकरण करण्याचा प्रस्ताव हाय पॉवर कमिटीने मान्य केलेला आहे. त्यासाठी टेंडर काढलेले असून फेब्रुवारी महिन्यामध्ये नवीन एजन्सीला वर्कऑर्डर मिळेल. या संगणकीकरणामुळे निर्धारणाचे बरेचसे काम संगणकावर होणार आहे. त्यामध्ये व्यापारी आणि अधिकारी यांच्यातील इंटरफेस कमीत कमी असावा. जो काही व्यवहार असेल तो वस्तुनिष्ठ (ऑब्जेक्टीव्ह) स्वरुपाचा असावा. तसेच अंतर्गत लेखापरीक्षण (इंटरनल ऑडिट) आणि महालेखा लेखापरीक्षण (ए.जी.ऑडिट) या दोन्ही गोष्टी असाव्यात. अशा प्रकारची यंत्रणा विक्रीकर विभागाकडून आजही राबविण्यात येत असून, ही कार्यपद्धती अजून चांगली करण्याचा विभागाच्या माध्यमातून प्रयत्न करण्यात येत आहे.

१.१८. अनेकदा व्यापारी किंवा चार्टर्ड अकाऊंटंट कर निर्धारणा किंवा परताव्याच्या बाबतीत तक्रारी करतात. मध्यंतरी या संदर्भातील संघर्ष टोकाला गेला होता. एवढेच नव्हे तर याबाबतीत कोर्ट-कचेऱ्या सुद्धा झाल्या होत्या. पुढील महिन्यात राज्यातील निवडक व्यापारी असोसिएशनच्या २५-३० सदस्यांना समितीसमोर निमंत्रित करून त्यांच्या काय अडचणी आहेत हे जाणून घेण्याचा प्रयत्न करु त्या वेळी वित्त विभाग व विक्रीकर विभागाच्या अधिकाऱ्यांना सुद्धा बोलविण्यात येईल. यामागील धारणा अशी आहे की, व्यापाऱ्यांकडून जास्तीत जास्त कर वसूल व्हावा आणि परताव्याची कमीत कमी प्रकरणे प्रलंबित राहावीत. विद्यमान पद्धतीमध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता असेल तर व्यापाऱ्यांचे मत सुद्धा विचारात घ्यावे लागेल. शिवाय त्यावेळी शासनाने सर्व बाजूंचा विचार करून अमुक प्रकारचा निर्णय घेतलेला असल्यामुळे त्यानुसार कार्यवाही करावी लागेल असे विभागाने ठामपणे पटवून सांगितले पाहिजे. सन्माननीय समिती सदस्यांना त्यांच्या गावातील १-२ प्रमुख व्यापाऱ्यांना त्या बैठकीसाठी निमंत्रित करायचे असेल तर जरूर करावे. व्यापारी आणि विक्रीकर विभागाची एकत्रित बैठक बोलावण्यामागील उद्देश एवढाच आहे की, शासनाचे नियम, धोरण किंवा त्यामध्ये येणाऱ्या अडचणी यावर सविस्तरपणे चर्चा करता यावी. असे समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिले असता विभागीय प्रतिनिधी म्हणाले की, न्यायाधिकरणामध्ये (ट्रॅब्युनलमध्ये) एकूण पाच सदस्य असतात. यातील अध्यक्ष न्यायमंडळामधील (ज्युडिशियरीमधील) असतात. तसेच सदस्य सुद्धा न्यायमंडळामधील (ज्युडिशियरीमधील) असतात. विभागाच्या माध्यमातून न्यायाधिकरणावर (ट्रॅब्युनलवर) एक तांत्रिक सदस्य पाठविला जातो. तसेच शासन सुद्धा त्यावर तज्ञ (एक्स्पर्ट) म्हणून सदस्यांची नेमणूक करतात. आजच्या घडीला न्यायाधिकरणाच्या (ट्रॅब्युनलच्या) पाच पैकी तीन जागा रिक्त आहेत. या जागा सेवानिवृत्ती आणि राजीनाम्यामुळे रिक्त झालेल्या आहेत. रिक्त जागा भरण्याचा प्रस्ताव विक्रीकर विभागाकडून क्लिअर करून पुढील मान्यतेसाठी मुख्य सचिवांकडे पाठविण्यात आलेला आहे. मुख्य सचिवांनी सदरहू प्रस्तावास मान्यता दिल्यानंतर तो अंतिम मान्यतेसाठी माननीय वित्त मंत्र्यांकडे पाठविण्यात येईल. त्यांनी सदरहू प्रस्तावास मान्यता दिल्यानंतर सदस्यांच्या रिक्त जागा तातडीने भरण्यात येतील.

१.१९. नवीन पद्धत सुरू केल्यामुळे सह आयुक्त (अपील) आणि उप आयुक्त (अपील) ही पदे निर्माण केली नव्हती. कारण सुरूवातीला असे वाटले होते की, नवीन पद्धत सुरू केल्यामुळे अपिलांची संख्या कमी होईल. परंतु ही संख्या कमी न झाल्यामुळे अपिले निकाली काढण्यासाठी सह आयुक्त (अपील) आणि उप आयुक्त (अपील) ही पदे निर्माण केली आहेत. जिल्ह्याच्या ठिकाणी उप आयुक्त (अपील) यांना अपिलांचा निपटारा करण्याचे अधिकार दिलेले आहेत. विभागीय स्तरावर सह आयुक्त (अपील) यांच्या एकूण १२ जागा असून त्या सर्व भरलेल्या आहेत. त्यामुळे त्या त्या ठिकाणी सुनावणी घेऊन सर्व प्रकरणे मार्गी लावण्याचा प्रयत्न केला जात आहे. शिवाय अपिलीय अधिकाऱ्यांना ज्या प्रशासकीय सूचना द्यावयाच्या होत्या त्या दिलेल्या आहेत. अपिलीय अधिकाऱ्यांची बैठक घेऊन नियमित निर्धारणा करण्याबाबत त्यांना सूचना दिलेल्या आहेत. विभागाच्या अधिकाऱ्यांनी निर्धारणा व्यवस्थित केल्या नाहीत अशा तक्रारी आल्यास संबंधितांचे म्हणणे ऐकून घेऊन योग्य ती कार्यवाही करण्याबाबत विभागाच्या अधिकाऱ्यांना सूचना दिलेल्या आहेत.

अभिप्राय व शिफारशी :

१.२०. समितीस प्राप्त झालेल्या लेखी व तोंडी माहितीच्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे अभिप्राय व शिफारशी करण्यात येत आहेत.

सन १९९३ च्या सामुहिक प्रोत्साहन योजनेनुसार पात्र घटकांना योजनेतील विनिर्दिष्ट अटी व शर्तीच्या अधिन राहून पात्रता व अनुज्ञेयता प्रमाणपत्राच्या कक्षेत येणाऱ्या कालावधीतील पक्क्या मालाच्या विक्रीवर व स्थानिक विक्रीकर किंवा केंद्रीय विक्री कर आणि कच्च्या मालाच्या खरेदीवर खरेदी कर या स्वरूपात प्रोत्साहन मिळण्याचा अधिकार आहे. जुलै, २००५ मध्ये घाटकोपर विभागाच्या अभिलेख्यांची तपासणी करताना सन २००१-०२ व सन २००२-०३ याकरिता मे.सेफ ईस्ट प्रा.लि.कंपनी या ईस्ट बनविणाऱ्या कंपनीचा निर्धारणा उत्पादन क्षमता वाढविण्यासाठी प्रोत्साहन माहे ऑक्टोबर, २००७ ते माहे सप्टेंबर २००८ या कालावधीत विलंबाने विक्रीकर भरण्याचे पात्रता / अनुज्ञेयता प्रमाणपत्र देण्यात आले होते. या प्रमाणपत्रात विहित केल्यानुसार कर भरण्याची मुभा उत्पादनाच्या ३७.५८ टक्के इतकी होती. तथापि, विलंबाने भरण्याच्या कराच्या रक्कमेची संगणना करताना अनुज्ञेयता प्रमाणपत्रात नमूद केलेल्या टक्केवारी इतकी रक्कम भरली गेली नाही व वजावटही कमी केलेली नाही. त्यामुळे कमी रक्कमेच्या कराचे निर्धारण झाले असल्याचे अभिप्राय महालेखापालांनी व्यक्त केले आहेत. याप्रकरणी कारवाई केल्यानंतर संबंधित कंपनी अपिलामध्ये गेल्याचे विभागीय सचिवांनी समिती समोरील साक्षी दरम्यान समितीस अवगत केले. **अद्याप सदरहू प्रकरणावर निकाल आलेला नसल्याने अपील प्राधिकारी जो निर्णय देईल त्याप्रमाणे कारवाई करून वसुलीबाबतची माहिती समितीस विनाविलंब कळविण्यात यावी असे समितीने निर्देश दिले. या अनुषंगाने विभागाकडून दिनांक २० जुलै २०१५ रोजीच्या पत्रान्वये माहिती प्राप्त झाली असून त्यामध्ये अपिलेट ट्रायब्युनल यांनी कराची फेरगणना केली असल्याचे नमूद केले आहे. फेरगणनेनुसार संबंधित व्यापाऱ्याकडून रुपये ७१५३१५ इतकी रक्कम वसूल करण्याकरिता मागणी नोटीस निर्गमित केली असून त्या अनुषंगाने मे. सेफ ईस्ट कंपनी प्रा. लि. कडून फेरगणनेनुसार रुपये ७१५३१५ इतक्या रकमेच्या वसुलीबाबतच्या सद्यःस्थितीची माहिती समितीला ३ महिन्यांत उपलब्ध करून देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे. तसेच यापुढील काळात सामूहिक योजनेखाली भरणा करावयाच्या रकमेच्या संगणना करताना आवश्यक ती दक्षता विभागाने घ्यावी जेणेकरून चुकीचे कर निर्धारण होणार नाही अशी समिती शिफारस करीत आहे.**

१.२१. अर्थसंकल्पामध्ये (बजेटमध्ये) परताव्या संबंधीच्या नेट फिगर दाखविल्या जातात. एकूण कर गोळा करण्याचे उद्दिष्ट ठरवून दिलेले असते. तसेच काही रक्कम परताव्यासाठी ठेवलेली असते. सन २००४-२००५ या वर्षी साडेचार हजार कोटी रुपये परतावा देण्याचे ठरविलेले असून आतापर्यंत सव्वातीन हजार कोटी रुपये परत दिलेले आहे. जेवढे परताव्यासाठी अर्ज करतात त्यासर्वांना परतावा देण्याचा प्रयत्न केला जातो. आता **किती परतावा देणे शिल्लक आहे याची आकडेवारी विभागाकडे साक्षीच्या वेळी उपलब्ध नसणे हे सुद्धा योग्य नसून सदरहू आकडेवारी समितीला तीन महिन्यात उपलब्ध करून देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

१.२२. राज्यात उद्योग वाढावे हे अत्यंत महत्त्वाचे असून त्यासाठी पोषक वातावरण राज्यात निर्माण करणे हे देखिल अत्यंत आवश्यक आहे. तसेच असे करीत असतांना शासनाच्या महसुलांचे नुकसान होणार नाही हे देखिल पाहण्याची आवश्यकता आहे. तसेच विक्रिकर भरण्यास विलंब झाल्यास शासनाकडून ज्याप्रमाणे दंड आकारण्यात येतो त्याचप्रमाणे परताव्याची जी रक्कम शासनाकडे प्रलंबित आहे त्यावर व्याज देण्याची देखिल आवश्यकता आहे. त्यामुळे विक्रीकरासंदर्भात परतावा देण्याबाबत संबंधित अधिनियम/नियम यात सुधारणा करून आयकरासदर्भांत परतावा देण्याबाबत जी पद्धत अवलंबिण्यात येते ती पद्धत विक्रीकराचा परतावा देण्यासंबंधात अवलंबली जावी. तसेच विक्रीकरासदर्भांतील परतावा विहित कालावधीत देण्यासदर्भांत तसेच परताव्याची प्रकरणे तातडीने निकाली काढणेसंदर्भांत संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

१.२३. करदात्याला कर वाढवून सांगणे आणि नंतर तो कमी करणे, अपिलामध्ये जाणे, असे प्रकार होऊ नयेत यानुषंगाने विभागाने आवश्यक ती उपाययोजना करणे आवश्यक आहे. गेल्या सन २०१३-१४ या वर्षी २००५-०६ आणि २००८-०९ या वर्षाची निर्धारणा झाली. ते काम करीत असताना काही एक्सपार्टी ऑर्डर्स दिलेल्या आहे. ब-याच प्रकरणी व्यापारी आले नाहीत. त्यांनी माहिती दिली नाही. पुढील निर्धारणेच्यावेळी याची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून निर्धारणा अधिकाऱ्याचे शिबिर घेऊन त्यांना स्पेसिफिक सूचना दिलेल्या आहेत. टॅक्स रिस्क किती आहे आणि व्यापाऱ्याकडून किती रक्कम भरली गेली पाहिजे याचा विचार करून निर्धारणा अधिकाऱ्याने आदेश पारित करावेत आणि हे करीत असताना कोणकोणत्या गोष्टी काळजीपूर्वक पहाव्यात यासंबंधीच्या सूचना विभागीय अधिकारी आणि व्यापारी संघटना यांना एकत्रितपणे दिलेल्या असल्यातरी **निर्धारणेच्या कामाची सद्यःस्थिती काय आहे व अंमलबजावणी किती टक्के झाली आहे याची माहिती समितीला देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

१.२४. राज्यातील व्यापाराचे प्रमाण वाढावे, शासनाला कराच्या रुपात प्राप्त होणाऱ्या महसुलाचे देखील नुकसान होऊ नये तसेच उद्योजकांचा पैसा परताव्याच्या रुपाने अधिक काळ शासनाकडे थकित राहू नये ही सर्व उद्दिष्ट्ये एकाच वेळी समांतर पातळीवर गाठण्याची नितांत आवश्यकता असून त्यादृष्टीने कारवाई करण्याची शिफारस ही समिती शासनास करीत आहे. त्याचप्रमाणे कर निर्धारणेची पद्धत अधिकाधिक सोपी, सुटसुटीत व पारदर्शक ठेवण्याच्या दृष्टीने शासनाने तातडीने पावले उचलावीत अशी समितीची शिफारस आहे.

महसूल विभाग

२.१. भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी त्यांच्या सन २००८-०९ या वर्षाच्या महसुली जमा अहवालामधील **परिच्छेद क्र. ३.३.१ ‘ मालमत्तेचे न्यून मुल्यांकन केल्याने मुद्रांक शुल्काची कमी आकारणी ’, परिच्छेद क्र.३.३.३ ‘मुद्रांक शुल्कावर चुकीने सूट देणे ’, परिच्छेद क्र.३.३.५ ‘ गहाणपत्रावर मुद्रांक शुल्काची कमी आकारणी ’ व परिच्छेद क्र.४.४ ‘ लिलावाची उर्वरित ३/४ रक्कम वसूल न करणे ’** यासंदर्भात खालील अभिप्राय दिले आहेत.

मालमत्तेचे न्यून मूल्यांकन केल्याने मुद्रांक शुल्काची कमी आकारणी :-

मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ अनुसार अभिहस्तांतरण करारनाम्यावर ज्या क्षेत्रात मालमत्ता असेल त्या क्षेत्राला लागू असणाऱ्या दराने मुद्रांक शुल्क मालमत्तेच्या बाजारमूल्यावर आकारले पाहिजे. हे दर सिद्धगणकात विहित करण्यात येतात.

डिसेंबर, २००७ ते जानेवारी, २००९ च्या दरम्यान केलेल्या अभिलेख्यांच्या चाचणी तपासणीत असे दिसून आले की, सहा करारनाम्याखाली नमूद केल्याप्रमाणे, मालमत्तेच्या कमी मुल्यांकनामुळे रु.२.२५ कोटींच्या मुद्रांक शुल्काची कमी आकारणी झाली.

(खालील तक्त्यात संबंधित मजकूर घेण्यात आलेला आहे.)

(रुपये लाखात)

अ.क्र	उपनिबंधकाचे नाव	दस्तऐवजाचा क्र. निष्पादनाची तारीख	सिद्धगणका प्रमाणे बाजारमूल्य	आकारणीय मुद्रांक शुल्क	आकारलेले मुद्रांक शुल्क	मुद्रांक शुल्काची कमी आकारणी
१	हवेली-५	४२०१ १८-०५-२००७	१०३.७८	१०.३८	३.३०	७.०८
२	उत्तर सोलापूर-१	३३११ १५-०६-२००७	१८४.५६	९.२३	२.९०	६.३३
३	नागपूर-६	३५५७ ०८-०८-२००६	२८२.००	१५.५१	८.६३	६.८८
४	बोरीवली-१	१५२० ०१-०३-२००६	४०१५.००	२०१.००	२५.००	१७६.००

विभागाने (ऑक्टोबर, २००८ ते एप्रिल, २००९ यादरम्यान) चूक मान्य केली आणि नमूद केले की, रक्कम वसूल करण्याकरिता कार्यवाही सुरू केली आहे.

ही बाब शासनाला एप्रिल, २००९ मध्ये कळविण्यात आली.त्यांचे उत्तर मिळालेले नाही. (नोव्हेंबर, २००९)

२.२. ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात महसूल विभागाने समितीला कळविलेल्या लेखी ज्ञापनात नमूद केले आहे की, सह दुय्यम निबंधक हवेली क्र.५ मध्ये सन २००७ च्या स्थानिक तपासणी अहवालामधील परिच्छेद क्र.३ मधील दस्त क्र. ४२०१/०७ हा विकसन करारनाम्याचा दस्त समाविष्ट करण्यात आलेला आहे. सदर परिच्छेदावरील आक्षेप महालेखापाल, नागपूर यांनी त्यांचे पत्र दिनांक १७ एप्रिल २०१२ व १ मे २०१२ अन्वये निर्लेखित केला आहे.

दुय्यम निबंधक सोलापूर उत्तर क्र.१ :- यामध्ये सन २००७ च्या स्थानिक तपासणी अहवालामधील परिच्छेद क्र.१ मधील दस्त अहवालामधील परिच्छेद क्र. १ मधील दस्त क्र.३४०९/०७ हा विक्री कराराचा दस्त समाविष्ट झाला आहे. सदर दस्तावरील आक्षेप सह जिल्हा निबंधक, सोलापूर यांनी मान्य केला असून कमी पडलेले मुद्रांक शुल्क रु. १२,०५,००० नों.फी. रु. १५,००० अनुक्रमे चलन क्र. ४४१ व ४४२ अन्वये दिनांक ९ डिसेंबर २०११ रोजी वसुल केले आहेत. सोबत चलनाची झेरॉक्स प्रत जोडली आहे.

दुय्यम निबंधक, सोलापूर उत्तर क्र.१ यामध्ये सन २००७ च्या स्थानिक तपासणी अहवालामधील परिच्छेद क्र.२ मधील दस्त क्र.३३११/०७ हा विक्री कराराचा दस्त समाविष्ट झाला आहे. या दस्तावरील आक्षेप सजिनी सोलापूर यांनी मान्य केला असून मिळकतीवर ७/१२ वर बोजा निर्माण केला आहे. तसेच वसुलीची कार्यवाही सुरू आहे.

दुय्यम निबंधक नागपूर क्र. ६ :- यामध्ये सन २००६ च्या स्थानिक तपासणी अहवालामधील परिच्छेद क्र.१ मधील दस्त क्र.३५५७/०६ समाविष्ट करण्यात आला आहे. यावर विभागाने उचित कार्यवाही केल्यामुळे महालेखापाल यांनी त्यांचे पत्र क्र.रारालेप/मु/निप्र/१०२३ दिनांक१३/१२/२०१२ अन्वये परिच्छेद निर्लेखित केला आहे.

स्थानिक तपासणी अहवालातील परिच्छेद क्र.१ मधील दस्त क्र.१५२०/०६ समाविष्ट करण्यात आला आहे. आक्षेपित दस्त खरेदीखताचा असून मिळकतीचे कमी मूल्यांकन झाल्याने रु. १७६.०० लाख इतकी मुद्रांक शुल्काची कमी आकारणी झाली आहे. सदर परिच्छेदावरील आक्षेप या कार्यालयाचे पत्र दिनांक १७ मार्च २००९ अन्वये मान्य करण्यात आला असून मु.जि. बोरीवली यांना कलम ३३ अन्वये वसुलीची कार्यवाही करणेबाबत कळविले आहे. तसेच सदर प्रकरण कलम ५३ (१)(अ) अंतर्गत सुनावणीच्या अंतिम टप्प्यात आहे.

मुद्रांक शुल्कावर चुकीने सूट देणे

५ मे २००१ ला निर्गमित केलेल्या अधिसूचनेने, विकास आयुक्त (उद्योग) किंवा कोणत्याही अधिकृत अधिकाऱ्यांने निर्गमित केलेल्या प्रमाणपत्राच्या आधारावर अधिसूचित क्षेत्रात नवीन उद्योग सुरू करण्यासाठी/उद्योगाच्या नवीन विस्तारासाठी, तारणगहाण, तारण, तारण देणे, हक्क करारनामा ठेव म्हणून ठेवणे, अभिहस्तांतरण पत्र, मालमत्तेच्या गहाण ठेवण्यावर आणखी भार, भाडेपट्टा गहाणपत्र, इत्यादिंच्या दस्तऐवजावर शासनाने मुद्रांक शुल्कात सूट दिली.

उप निबंधक - ६ नागपूर यांच्या कार्यालयाच्या अभिलेखांच्या चाचणी तपासणीत असे दिसून अले की, पट्ट्याने घेतलेल्या मालमत्तेच्या हस्तांतरणाचा एक दस्तऐवज जानेवारी, २००४ मध्ये कार्यान्वित झाला ज्यामध्ये उप निबंधकाने त्याला विक्रीचा दस्तऐवज म्हणून वर्गीकृत करून त्यावर आकारणीय मुद्रांक शुल्कात सूट दिली. पुढील छाननीत असे उघडकीस आले की, दस्तऐवजातील कथनाप्रमाणे ते वर्गीकरण चुकीचे होते कारण तो दस्तऐवज अभिहस्तांकन/भाडेपट्ट्याचे हस्तांतरण यांचा होता व त्यावर मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ च्या तरतूदीखाली मुद्रांक शुल्क आकारणीय होते. याचा परिणाम मुद्रांक शुल्कात रु ५.६० लाख चुकीची सूट देण्यात झाला.

ही बाब डिसेंबर, २००५ मध्ये निदर्शनास आणून दिल्यावर, नोंदणी महानिरीक्षक, पुणे यांनी निरीक्षण मान्य केले (फेब्रुवारी, २००९) आणि संबंधित उप निबंधकाला मुद्रांक शुल्कातील तूट वसूल करण्याचे निर्देश दिले. वसुली संबंधी अहवाल मिळालेला नाही (नोव्हेंबर, २००९) ही बाब शासनाला मार्च, २००९ मध्ये कळविण्यात आली; त्यांचे उत्तर मिळालेले नाही (नोव्हेंबर, २००९)

२.३. ज्ञापन :

उपरोक्त महालेखापरीक्षकांच्या अभिप्रायासंदर्भात महसूल विभागाने समितीला कळविलेल्या लेखी ज्ञापनात नमूद केले आहे की, या लेखा परिच्छेदामध्ये स्थानिक तपासणी अहवाल सन २००४ मधील दुय्यम निबंधक, नागपूर क्र.६ या कार्यालयातील परिच्छेद क्र.१ मधील दस्त क्र.१९१/०४ हा भाडेपट्ट्याचा दस्त समाविष्ट आहे. सदरचा दस्त अभिनिर्णित असल्याने मुंबई मुद्राक अधिनियम, १९५८ चे कलम ५३ अ खाली पुनर्विलोकनासाठी घेण्यात आला होता. त्यावर निर्णय झाला असून या दस्तावरील आक्षेप मान्य करण्यात आला आहे. त्यावर मुद्रांक जिल्हाधिकारी, नागपूर शहर यांनी आरआरसी चे आदेश पारित करून मिळकतीवर बोजा निर्माण केला आहे. त्या अनुषंगाने महालेखापाल, नागपूर यांनी सदरचा परिच्छेद त्यांचे क्र.रा.रा.ले.प. (मु)/निप्र/८ एसआर नं.१०२३, दिनांक ३१ डिसेंबर २०१२ चे पत्रान्वये वगळला आहे. सोबत पत्राची झेरॉक्स प्रत जोडली आहे.

गहाणपत्रावर मुद्रांक शुल्काची कमी आकारणी :-

मुंबई मुद्रांक अधिनियम, १९४८ च्या तरतुदीनुसार करारनाम्यात समाविष्ट असणाऱ्या मालमत्तेचा किंवा मालत्तेच्या कुठल्याही भागाचा कब्जा गहाणकाराने दिला आहे किंवा देण्याचे मान्य केले आहे. अशा करारनाम्यावर अभिहस्तांतरणावर आकारणीय असलेल्या मुद्रांक शुल्क व नोंदणी फी इतकेच मुद्रांक शुल्क व नोंदणी फी आकारणीय असते. तथापि, जेव्हा मालमत्तेचा कब्जा दिलेला नसतो तेव्हा प्रत्येक हजारावर किंवा त्याच्या भागावर पाच रुपये याप्रमाणे अशा करारनाम्याने प्रतिभूत केलेल्या रकमेवर कमीतकमी १०० रुपये व जास्तीत जास्त दहा लाख रुपये यांच्या अधिन राहून मुद्रांक शुल्क आकारणीय आहे.

डिसेंबर, २००७ व एप्रिल, २००८ या दरम्यान केलेल्या अभिलेख्यांच्या चाचणी तपासणीत असे दिसून आले की, पुढील दोन दस्तऐवजांत रु. २९.७९ लाख मुद्रांक शुल्क व नोंदणी फी कमी आकारण्यात आली.

- उप निबंधक- viii नागपुर मध्ये, एक दस्तऐवज जानेवारी २००६ मध्ये रु. ४.६८ कोटीचे कर्ज प्रतिभुत करण्यासाठी कार्यन्वित केला गेला. हा दस्तऐवज कब्जाच्या हक्कासहीत गहाणकाराने केले असलेले गहाणपत्र असल्यामुळे नेहमीच्या दराने रु.२५.७६ लाख मुद्रांक शुल्क आकारावयाचे होते. जेव्हा की फक्त रु. २.३४ लाख आकारले गेले. याचा परिणाम मुद्रांक शुल्काची रू. २३.४२ लाख इतकी कमी आकारणी होण्यात आला.

- उपनिबंधक वर्धा १ मध्ये एक दस्तऐवज जानेवारी २००६ मध्ये रु. १२.१५ कोटीचे कर्ज प्रतिभुत करण्यासाठी कार्यान्वित केला गेला.हा दस्तऐवज कब्जाचा हक्क पक्का करणारा नसलेले गहाणपत्र असल्याने त्यावर रु. ६.०७ लाखचे मुद्रांक शुल्क व रु. ३० हजाराची नोंदणी फी आकारणीय होती, जेव्हा की फक्त रु. २०० आकारण्यात आले. याचा परिणाम मुद्रांक शुल्क व नोंदणी फी च्या रु. ६.३७ लाख इतकी कमी आकारणीत झाला.

ही प्रकरणे डिसेंबर, २००७ व एप्रिल २००८ मध्ये निदर्शनास आणल्यावर विभागाने चूक मान्य केली (सप्टेंबर, २००८ व डिसेंबर, २००८) आणि उपनिबंधकांना मुद्रांक शुल्क व नोंदणी फी तील तूट वसूल करावयाचे निर्देश दिले. वसुली संबंधी अहवाल मिळालेला नाही. (नोव्हेंबर, २००९) ही बाब शासनाला मार्च, २००९ मध्ये कळविण्यात आली त्यांचे उत्तर मिळालेले नाही. (नोव्हेबर, २००९).

२.४. ज्ञापन :

उपरोक्त महालेखापरीक्षकांच्या अभिप्रायासंदर्भात महसूल विभागाने समितीला कळविलेल्या लेखी ज्ञापनात नमूद केले आहे की, सह दुय्यम निबंधक नागपूर क्र.८- या अहवालामध्ये परिच्छेद क्र. १ दस्त क्र. २१९/०६ या गहाणखताच्या दस्ताचा समावेश आहे. या दस्तावरील आक्षेप सह जिल्हा निबंधक, नागपूर शहर यांनी त्यांचे दिनांक १ डिसेंबर २००८ चे पत्रान्वये मान्य केला आहे. सदर मिळकतीवर दिनांक ९ मे २०११ रोजी बोजा निर्माण केला आहे. तसेच वसुलीची कार्यवाही सुरू आहे.

लिलावाची उर्वरित ३/४ रक्कम वसूल न करणे :-

मूळ बोलीदाराकडून उर्वरीत रक्कम वसूल न करण्याचा परिणाम रुपये १.५७ कोटीच्या महसुलाची पुर्तता न होण्यात झाला.

लिलावाने वाळू काढण्याकरिता हक्क निश्चितीसाठी शासनाने सप्टेंबर मध्ये निर्गमित केलेल्या निर्णय आणि नंतरच्या नोव्हेंबर, २००८ मध्ये निर्गमित केलेल्या मार्गदर्शक तत्वांप्रमाणे, ज्याची बोली स्वीकृत झाली आहे त्या सर्वोच्च बोलीदाराला लिलावाच्या दिवशी बोली रकमेच्या २५ टक्के जमा करणे आवश्यक असते. लिलावाची उर्वरीत रक्कम ही लिलावापासून १५ दिवसांच्या आत एक रकमी द्यावयाची असते. जर विहित काळात करार कार्यान्वित झाला नाही तर त्या क्षेत्राचा पुन्हा लिलाव करावयाचा असतो आणि बोलीदाराने जमा केलेली रक्कम अपरीवर्तित करावयाची असते. जर पुर्नलिलावात काही तूट आली तर, तुटीची रक्कम मूळ बोलीदाराकडून जमीन महसूलाची थकबाकी म्हणून वसूल करावयाची असते.

ऑगस्ट, २००६ ते जुलै, २००८ या दरम्यान तीन जिल्हाधिकारी कार्यालयांच्या (बीड, जालना आणि पुणे) अभिलेखांच्या चाचणी तपासणीत असे दिसून आले की, २००४-०५ या काळात २५ वाळूघाटांचा लिलाव रुपये २.३३ कोटींकरिता केला गेला.सर्वोच्च बोलीदारांनी लिलावाच्या वेळी रुपये ०.७६ कोटी प्रदान केले. सर्वोच्च बोलीदारांनी ना करारनामा कार्यान्वित/स्वाक्षरित केला ना बोलीची उर्वरित रक्कम प्रदान केली. त्यामुळे संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी ते वाळू घाट पुनर्लिलाव करण्याची कार्यवाही सर्वोच्च मूळ बोलीदाराच्या खर्चाने केली पण त्यात एकही बोली आली नाही. याचा परिणाम रुपये १.५७ कोटीं इतक्या उर्वरीत लिलाव रक्कम वसूल न होण्यात झाला जरी ती वसुली योग्य होती.

हे निदर्शनास आणून दिल्यावर जिल्हाधिकारी, पुणे यांनी नमूद केले (डिसेंबर, २००८) की, लिलावाच्या वेळी जमा केलेली रक्कम अपवर्तित करण्यात आली व शासनाने तात्पुरती परवानगी देण्याचे मान्य केले नाही. तथापि, या मागणी सूचना कसूरदाराला निर्गमित केल्या होत्या. जिल्हाधिकारी बीड यांनी नमूद केले (जानेवारी, २००९) की, बोलीदाराने त्यांच्या कार्यालयात रुपये ४२.०३ लाखाची रक्कम जमा केली पण हे स्पष्ट केले नाही की ती रक्कम शासनाला अपवर्तीत करण्यात आली आहे किंवा नाही. उप विभागीय अधिकारी, परतूर, जिल्हा जालना यांनी चुक स्वीकार केली व नमूद केले (मे, २००९) की, वसुली प्रगतिपथावर आहे. पुढील अहवाल मिळालेला नाही (नोव्हेंबर, २००९).

वस्तुस्थिती कायम आहे की मूळ बोलीदाराकडून उर्वरित रक्कम जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसुलीयोग्य आहे, ज्याकरिता कार्यवाही अजून प्रारंभ झाली नाही.

ही बाब शासनाला मे, २००९ मध्ये कळविण्यात आली, त्यांचे उत्तर आलेले नाही (नोव्हेंबर, २००९).

२.५. ज्ञापन :

उपरोक्त महालेखापरीक्षकांच्या अभिप्रायासंदर्भात महसूल विभागाने समितीला पाठविलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे तपशीलवार खुलासा केला आहे :-

बीड : सन २००८-२००९ साठी बीड जिल्ह्यातील, मौ. पुरुषोत्तमपुरी ता. माजलगाव या वाळू गटाचा लिलाव सर्वोत्तम बोलीने रु. १५.०२ लक्ष मध्ये देवकृपा बिल्डिंग मटेरियल सप्लायर्स म. माजलगाव यांना मंजूर करण्यात आला होता. तसेच, मौ. गोषत पिंपळगाव ता. गेवराई येथील वाळु गटाचा लिलाव सर्वोत्तम बोलीने यशवंत बहुद्देशीय सेवाभावी संस्था, श्रीरामनगर, बीड यांना रु. २७.२१ लक्ष मध्ये मंजूर करण्यात आला होता. उक्त लिलावधारक यांनी वाळु लिलावाची पूर्ण रक्कम चलनाद्वारे कोषागारात जमा केलेली आहे.

पुणे : पुणे जिल्ह्यातील सन २००६-०७ मधील वाळूपट्यांच्या जाहीर लिलावात, मौजे नरसिंहपूर, मौजे जांब लिलावधारकाकडून या ३ वाळूगटाच्या ३/४ रक्कम वसुलीच्या अनुषंगाने खुलासा करण्यात येतो की, मौजे जांब या वाळू गटाच्या प्रकरणात लिलावधारक यांच्या ७/१२ वर रु.३५,२५,००० एवढ्या रकमेचा बोजा चढवण्यात आला असून, वसुलीची कार्यवाही सुरू आहे.

तसेच मौजे नरसिंहपूर, मौजे टण्णू या दोन वाळू गटाच्या प्रकरणात लिलावधारक हे न्यायालयात गेले असता, मा. न्यायालयाने शासनाच्या बाजूने निर्णय दिला असल्याचे सरकारी वकिल यांनी दिनांक २ नोव्हेंबर २०१३ च्या पत्रान्वये कळविले आहे. त्यानुसार रुपये ४५,४१,२५० एवढ्या रकमेच्या वसुलीची कार्यवाही सुरू आहे.

जालना : आक्षेपात उपस्थित केलेली वसुली रु. १८,४३,२५० रकमेपैकी रक्कम रु. १५,६३,००० म्हणजे ८४.८९% रक्कम वसूल करण्यात आली आहे. उर्वरित रक्कम वसूल करण्यासाठी आर.आर.सी. प्रस्तावित करण्यात आली असल्याचे कळविण्यात आले होते. तथापि, याबाबतची सविस्तर वस्तुस्थिती खालीलप्रमाणे आहे :-

जालना जिल्ह्यातील सन २००४-०५ या वर्षाच्या लिलावात मौजे रामनगर, वझीरखेडा, हिसोडा, ता. भोकरदन, मौजे वाघाळा, ता. मंठा व मौजे करडगाव, ता. घनसावंगी या ३ वाळूगटाच्या लिलावधारकाकडून उर्वरित ३/४ रक्कम वसुलीबाबत परिच्छेद उपस्थित करण्यात आला आहे.

मौजे रामनगर, वझीरखेडा, हिसोडा, ता.भोकरदन या वाळूगटाच्या प्रकरणात सरपंच रामनगर यांनी पाणी टंचाईमुळे रामनगर येथील वाळूसाठ्याचे लिलाव करू नये याबाबत मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे याचिका दाखल केली होती. मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार लिलावधारकास मौजे रामनगर व वझीरखेडा या वाळूगटाचे ताबे देण्यात आले नाहीत. परिणामी मौजे हिसोडा या वाळूगटाचा ताबा घेण्यास लिलावधारकाने नकार दर्शविला. अशा परिस्थितीत मौजे रामनगर, वझीरखेडा, हिसोडा या वाळूगटाच्या लिलावाची उर्वरित रक्कम रुपये १५,३२,००० लिलावधारकाकडून वसूल करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

मौजे वाघाळा या वाळू गटाच्या सर्वोच्च बोली रुपये १,२३,००० च्या १/४ रक्कम रुपये ३१,००० शासन जमा करण्यात आली होती. उर्वरित ३/४ रक्कम रुपये ९२,००० वसूल करण्यासाठी आर.आर.सी. करून लिलावधारकाकडून सदर रक्कम वसूल करण्यात आली आहे.

मौजे करडगाव या वाळू गटाच्या लिलावाची ३/४ रक्कम रुपये १,८८,२५० लिलावधारक यांच्याकडून वसूल करण्यासाठी आर.आर.सी. करण्यात आली आहे.

२.६. साक्ष :

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००८-२००९ या वर्षाच्या महसुली जमा अहवालातील परीच्छेद क्र. ३.३.१, ३.३.३, ३.३.५ व ४.४ यासंदर्भात समितीने दिनांक ८ जानेवारी २०१३ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. सदरहू परिच्छेदासंदर्भात विभागाची ज्ञापने साक्षीच्या दिवशी विभागाने सादर केल्याने त्यावरील प्रश्नावली तयार करता आली नसल्याने या बाबीची सचिवांनी गांभीर्याने नोंद घ्यावी असे समितीने अभिप्राय नोंदविले असता, विभागीय सचिवांनी नमूद केले की, मदतकार्ये व पुनर्वसन विभागाचे एकूण ३ परिच्छेद आहेत. मालमत्तेचे न्यून मूल्यांकन केल्याबद्दलचा एक परिच्छेद आहे. विभागाकडे हे परिच्छेद दिनांक २८ नोव्हेंबर, २०१३ रोजी प्राप्त झाले. त्यानंतर दिनांक ३ जानेवारी २०१४ रोजी विभागाने वेटिंगकरिता पाठविले होते. त्यामुळे ही ज्ञापने विभागाने काल समिती कक्षाला सादर केली आहेत. सादर केलेल्या ज्ञापनाच्या प्रारूपामध्ये काही बदल समिती कक्षाला अपेक्षित होता. त्यानुसार आवश्यक बदल करून आज अंतिमतः ज्ञापने शाखेला सादर केली आहेत. पहिल्या परिच्छेदाबाबत ६ पैकी ४ प्रकरणातील वसुली पूर्ण झाली आहे. एका प्रकरणात उच्च न्यायालयात रिट पिटिशन दाखल करण्यात आले आहे. यानूषंगाने समितीने विचारणा केली की, या प्रकरणी रु.२.२५ कोटी रुपयांची आकारणी कमी झालेली आहे. ही रक्कम वसूल करण्यात आली आहे, अशी माहिती देण्यात आली आहे. तथापि, मुख्य मुद्दा हा आहे की, कमी रकमेची आकारणी कोणत्या अधिकाऱ्यांनी केली व त्यांच्याविरुद्ध विभागाने कोणती कारवाई केली आहे ? महालेखापालांनी निदर्शनास आणून दिल्यानंतर ही बाब विभागाच्या लक्षात आली आहे. त्यांनी ही बाब निदर्शनास आणून दिली नसती तर शासनाच्या महसुलाचे नुकसान झाले असते. त्यामुळे कमी रकमेची आकारणी का करण्यात आली, ती कोणी केली, याबाबतचा शोध विभागाने घेतला आहे का तसेच ७/१२ वरील वसुली पूर्ण झाली काय याबाबत विभागीय सचिवांनी एका प्रकरणातील वसुली शिल्लक असून उर्वरित प्रकरणाची वसुली झालेली आहे. दुसऱ्या एका प्रकरणात संबंधित व्यक्ती उच्च न्यायालयात गेलेली आहे. ९ तारखेला ऑर्डर पास झाली असून त्यापूर्वी ते उच्च न्यायालयात गेले होते. स्थगिती मिळवण्याकरिता त्यांचे प्रयत्न सुरू आहेत अशी माहिती दिली.

मालमत्तेचे मूल्यांकन कमी झाल्याचे निदर्शनास आल्यास कारवाई केली जाते. मात्र अन्य प्रकारे काही गैरप्रकार केल्यास त्यावर लवकरात लवकर कारवाई होत नाही. अशा प्रकारे राज्य शासनाचे करोडो रुपयांचे नुकसान होत आहे. अशा घटनांना आळा घालण्याकरिता आपल्या विभागामार्फत काही सरप्राईज व्हीजीट घेतल्या जातात काय, तसेच मालमत्तेचे मूल्यांकन योग्य आहे की नाही, हे तपासण्यासाठी काही यंत्रणा अस्तित्वात आहे काय यासंदर्भात समितीने विचारणा केली असता, विभागीय सचिवांनी इंटरनल ऑडीट करीता १० व ११ असे २ डेस्क आहेत. काही तक्रारी आल्यास त्यांची दखल घेतली जाते. ३ प्रकरणांमध्ये प्रशासकीय कार्यवाही सूचवण्यात आलेली असून त्या संदर्भातील संपूर्ण माहिती समितीला देण्यात येईल असे नमूद केले.

२.७. परिच्छेद क्रमांक ३.३.३ मधील बाब उप निबंधक, नागपूर कार्यालयाच्या अभिलेख्यांच्या चाचणी तपासणीत असे दिसून आले की, पक्ष्याने घेतलेल्या मालमत्तेच्या हस्तांतरणाचा एक दस्तऐवज जानेवारी, २००४ मध्ये कार्यान्वित झाला. ज्यामध्ये उप निबंधकाने विक्रीचा दस्तऐवज म्हणून चुकीचे वर्गीकरण केल्याने मुद्रांक शुल्कात रु. ५.६० लाख चुकीची सूट दिली यासंदर्भात समितीने विचारणा केली असता, विभागीय सचिवांनी २ केस स्वीकृत झालेल्या आहेत. यामुळे त्या केसेस सदर रिपोर्टमध्ये आपल्याला दिसत नाहीत. एकूण ६ केसेस होत्या, २ केसेस स्वीकृत झाल्याने उर्वरित ४ प्रकरणांची माहिती सांगत आहे. २ प्रकरणांची वसुली झाली असून १ प्रकरणात भूर्दंड केला आहे आणि १ प्रकरण उच्च न्यायालयात प्रलंबित आहे अशी माहिती दिली.

२.८. परिच्छेद क्रमांक ३.३.५ मधील बाबी अनुषंगाने समितीने उप निबंधक, नागपूर यांच्याकडे एक दस्तऐवज जानेवारी, २००६ मध्ये रु.४.६८ कोटीचे कर्ज प्रतिभूत करण्यासाठी कार्यान्वित केले गेले. हा दस्तऐवज कब्जाच्या हक्कासहीत गहाणकाराने केले असल्याचे गहाणपत्र असल्याने नेहमीच्या दराने रु.२५.७६ लाख मुद्रांक शुल्क आकारावयाचे असताना केवळ २.३४ लाख मुद्रांक शुल्क आकारण्याचे कारण काय, सदर मुद्रांक शुल्क व नोंदणी फीतील तूट वसुलीच्या सद्यःस्थितीविषयी समितीने विचारणा केली असता, विभागीय सचिवांनी खुलासा केला की, एकूण ४ प्रकरणांमध्ये रिकव्हरी केलेली आहे. या संदर्भात एकूण ५ मुद्दे होते. ३ प्रकरणांमध्ये भुर्दंड केला असून १ प्रकरण वसुलीस पात्र नाही व उर्वरित एका प्रकरणात वसुली झालेली आहे. इतर सर्व प्रकरणांची वसुली केली जाईल. मुद्रांक शुल्क वसुलीच्या संदर्भात साधारणपणे दोन प्रकार आहेत. काही ठिकाणी लोकांनी परस्पर मुद्रांक शुल्क भरणे अपेक्षित असते. अशा वेळी मुद्रांक शुल्क भरताना काही चूक झाल्यास त्याची वसुली केली जाते. दुसऱ्या प्रकारामध्ये मालमत्तेचे मूल्यांकन केले जाते. हे मूल्यांकन एखाद्या व्यक्तीने जाणुनबुजून कमी केल्याचे निदर्शनास आल्यास त्यांच्यावर आवश्यक ती कारवाई केली जाते. काही प्रकरणामध्ये अभिनिर्णयाकरिता अर्ज केले जातात व दुसऱ्या प्रकारामध्ये इंटरप्रिटेशन करणे आवश्यक असते. अभिनिर्णयात चूक झाल्यास संबंधितांवर कारवाई केली जाते.

२.९. अभिनिर्णयाच्या कार्यवाहीबाबत विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, मुद्रांक कायद्यानुसार किती मुद्रांक शुल्क भरावयाचे याची माहिती नसल्यास अभिनिर्णयाकरिता अर्ज करू शकतात. अर्ज प्राप्त झाल्यानंतर मूल्यांकनाकरिता दर निश्चित केला जातो. मुंबईसारख्या काही मोठ्या शहरांमध्ये मालमत्ता भाड्याने दिलेली असेल तर त्याकरिता काही सवलत द्यावी असे अर्ज आमच्याकडे येतात. त्यानुसार अभिनिर्णय करून सर्व कागदपत्रे तपासून निर्णय दिला जातो.

२.१०. रेडीरेकनर नुसार एखाद्या मालमत्तेच्या किंमत १ लाख रुपये असल्यास त्या मालमत्तेची किंमत ५० हजार रुपये असल्याचे दाखवून शासनाचे मुद्रांक शुल्कावरील उत्पन्न बुडवले जाते. राज्यात अशी प्रकरणे मोठ्या प्रमाणात होतात. यासंदर्भात विभागीय प्रतिनिधींनी माहिती देताना सांगितले की, साधारणपणे ग्रामीण भागातून अभिनिर्णयाकरिता फारसे अर्ज येत नाहीत औरंगाबाद, पुणे, ठाणे, सोलापूर या सारख्या विभागीय शहरांमधून अभिनिर्णयाकरिता मोठ्या प्रमाणात अर्ज येतात.

२.११. अनेकदा शासकीय दरापेक्षा अधिक मुद्रांक शुल्क असल्याचे दाखवले जाते व नंतर हे शुल्क कमी करून दिले जाईल मात्र त्याकरिता काही रक्कम देण्याची मागणी अधिकारी/कर्मचाऱ्यांकडून केली जाते. अशा गैरप्रकारांना आळा घालण्याकरिता विभागाने रेडीरेकनरचे दर वेबसाईटवर प्रसिद्ध केलेले आहेत. यामुळे लोक घरी बसून आपल्या मालमत्तेच्या रेडीरेकनरचे दर बघू शकतात. तसेच रेडीरेकनरच्या दराबाबत माहिती देणारे पुस्तक देखील कार्यालयात ठेवले जाते अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी दिली.

२.१२. रेडीरेकनरचे दर निश्चित करण्यासंदर्भात मुद्रांक शुल्क विभाग व महसूल विभाग यांच्यामध्ये को-ऑर्डीनेशनच्या संदर्भात काही अडचण आहे काय? काही प्रकरणांमध्ये कमी वसुली झाल्याचे आढळून आल्यानंतर त्यांच्याकडून भूर्दंड आकारला जातो. ७/१२ च्या उताऱ्यावर काही वेळा किंमत कमी दाखवली जाते. अशा अनेक प्रकरणांमध्ये फार मोठी रक्कम प्रलंबित असल्याची बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, भूर्दंड निश्चित करण्यासंदर्भात ७/१२ च्या उताऱ्याची माहिती घेतली जाते. मुद्रांक कायद्यानुसार कारवाई करण्याचे अधिकार कलेक्टर ऑफ स्टॅम्प यांना दिलेले आहेत. त्यामुळे या अधिकाऱ्यांना महसूल विभागाकडे जाण्याची आवश्यकता नाही. अशा प्रकारची कारवाई मुद्रांक शुल्क विभागाचे अधिकारी करतात. भूर्दंड निश्चित करण्यासाठी आवश्यक असलेली सर्व माहिती प्राप्त केली जाते. अशा काही प्रकरणांमध्ये नियमानुसार मूळ मालमत्ता अटॅच करावी लागते. तसेच बँक खाते देखील अटॅच करावे लागते. बँक खाते अटॅच करण्यासंदर्भात बँकेला पत्र पाठविले जाते. बँक खाते अटॅच करून देखील प्रश्न सुटत नसेल तर प्रॉपर्टी अटॅच करून तिचा लिलाव केला जातो. मात्र साधारणपणे ९९ टक्के प्रकरणामध्ये प्रॉपर्टी अटॅच झाल्यानंतर लगेचच संपूर्ण पैसे भरले जातात.

२.१३. प्रत्यक्ष मूल्यांकनापेक्षा कमी किंमतीत रजिस्ट्रेशन केले जाते. या माध्यमातून मोठ्या प्रमाणात गैर व्यवहार होतात. गेल्या ५-१० वर्षांत अशा किती प्रकरणांवर कारवाई झालेली आहे? अशी समितीने विचारणा केली असता, ज्यांनी कमी मुद्रांक शुल्क भरलेले आहे, त्यांच्यावर प्रशासकीय कारवाई सुरू केलेली आहे. यासंदर्भात समितीस विभागवार स्टेटमेंट सादर करण्यात येईल असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस आश्वासित केले तथापि अद्यापही माहिती प्राप्त झालेली नाही.

२.१४. अनेक प्रकरणात मुद्रांक शुल्क कमी आकारले जाते. पुण्यात अनेक प्रकरणात कमी मूल्यांकन दाखवून नोंदणी केली गेली आहे. यासंदर्भात तेथील अधिकारी श्री.रवींद्र बऱ्हाटे यांची तक्रार करण्यात आली होती. या प्रकरणी विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहामध्ये प्रश्न देखील उपस्थित करण्यात आला होता ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता, विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, या पत्रामध्ये रेडीरेकनर दराबद्दल तक्रार केलेली नव्हती. रेडीरेकनर दर १ लाख रुपये असेल व घराचा व्यवहार जर २ लाख रुपये या किमतीने झाल्यास मुद्रांक शुल्क २ लाख रुपयांनुसार घेतले गेले नाही, अशा स्वरुपाची तक्रार करण्यात आली होती. या बाबत अहवाल तयार केला आहे. रेडी रेकनरच्या दरानुसार मुद्रांक शुल्क भरलेले आहे. रेडीरेकनरच्या दरापेक्षा अधिक दराने व्यवहार झालेला असला तरी देखील रेडीरेकनरच्या दरानुसार मुद्रांक शुल्क आकारण्यात आले आहे. अशा प्रकारची एकूण १०० ते १५० प्रकरणे होती. तसेच श्री.बऱ्हाटे यांच्या संदर्भात जी तक्रार केली गेली, त्यामध्ये तथ्य आढळून आले नाही. त्यातील ३-४ प्रकरणे वगळण्यात आली असून इतर प्रकरणात रेडीरेकनरप्रमाणे मुदांक शुल्क भरले आहे. तसेच इतर ३-४ प्रकरणात इंटरप्रिटेशनचा मुद्दा आहे. या संदर्भातील विस्तृत माहिती समितीला दिली जाईल असे समितीस विभागीय प्रतिनिधींनी आश्वासित केले. तथापि समितीस माहिती अद्याप अप्राप्त आहे.

२.१५. यासंदर्भात समितीने वित्त विभागाच्या सचिवांनी त्यांचे मत प्रदर्शित करतांना सांगितले की, पीडब्लूसीची नेमणूक करून थर्डपार्टी ऑडिट केले जाते. यामध्ये आयकर खात्याने केवळ दोन ते पाच टक्के केसेसची स्क्रुटिनी करून त्यांचे रॅण्डम व्हेरिफिकेशन करावे. या माध्यमातून आयकर खात्याच्या अनेक गोष्टी निदर्शनास येऊ शकतात. रॅण्डमली स्क्रुटिनी करून व्हेरिफिकेशन करण्याची टक्केवारी केस डिटेल किंवा परफेक्शनकरिता वाढविण्यात आली तरीही चालेल. याप्रकरणी विभागीय प्रतिनिधींनी यानुषंगाने कार्यवाही करण्यात येईल असे नमूद केले.

प्रती वर्षी वर्षाअखेर जिल्हाधिकारी महोदयांकडे जिल्हानिहाय लोकप्रतिनिधींच्या बैठका होऊन त्यामध्ये संबंधित भागातील भाववाढीबाबत साधकबाधक चर्चा केली जाते. या चर्चेनंतर सर्वेक्षणाच्या निष्कर्षाप्रमाणे व सर्वसामान्य अभ्यासाप्रमाणे, आवश्यकतेप्रमाणे रेडी रेकनरचे सुधारित दर लागू करण्यात येतात. तथापि, अवाजवी भाववाढीचा बोजा सर्वसामान्यांवर पडून ते यामध्ये भरडले जातात. महसूल वाढीकरिता रेडीरेकनरचे भाव वाढविले जात आहेत, असे कारण या बैठकीमध्ये सांगितले जाते. प्रचलित बाजार भाव व रेडी रेकनरचे भाव यामध्ये प्रत्यक्षात काही वेळेला तफावत आढळून येते. उदाहरणार्थ १००० रुपयाच्या दरावर अतिरिक्त ५०० रुपये भाव वाढवून त्याप्रमाणे मुद्रांक शुल्क भरले जाते. परंतु आयकर खात्याने या व्यवहारातील अतिरिक्त ५०० रुपयांच्या गॅपबाबत विचारणा करणे आवश्यक आहे. हा ५०० रुपयांचा गॅप या व्यवहारामध्ये कोणाच्या मान्यतेने आलेला आहे ? या संदर्भातील जबाबदारी निश्चित करून योग्य ती कारवाई ताबडतोब करणे आवश्यक आहे. परंतु याचे कारण लक्षात न घेता या ५०० रुपयांच्या गॅपबाबत आयकर खाते सर्वसामान्यांचे काहीही ऐकून घेत नाही ही बाब समितीने निदर्शनास आणली असता, विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, रेडीरेकनरच्या दराप्रमाणे विभागाने स्वतंत्र दर ठरविलेले आहेत. काही लोक याविरुद्ध उच्च न्यायालयामध्ये गेले होते. उच्च न्यायालयाने यामध्ये असा निवाडा दिलेला आहे की, कार्यकारी अधिकारी यांना प्रॉपर्टीचे व्हॅल्युएशन कसे करावयाचे, याची माहिती नसते. तसेच, कार्यकारी अधिकारी यांना प्रॉपर्टी व्हॅल्युएट करण्याचे अधिकार नसतात. यासंदर्भात शासनाने असा निर्णय घेतला होता की, प्रॉपर्टीचे व्हॅल्युएशन करून त्याचे दर ठरविण्याकरिता प्रॉपर्टी व्हॅल्युएट करणा-या प्रोफेशनल्सची नियुक्ती करणे आवश्यक आहे. याकरिता एखाद्या प्रॉपर्टीचे 'टॉप टू बॉटम व्हॅल्युएट' करण्याकरिता टाऊन प्लानर, डेप्युटी डायरेक्टरची नियुक्ती करण्यात आली आहे. यापूर्वी महसूल विभागामध्ये अशा प्रकारचे टाऊन प्लानर आणि डेप्युटी डायरेक्टरची पोस्ट कधीही दिसून आली नव्हती. नोंदणीकृत प्रॉपर्टीजचे आणि अनोंदणीकृत प्रॉपर्टीजचे व्हॅल्युएशन करण्याकरिता प्रोफेशनल माणसांची नेमणूक करण्यात यावी, असा शासन निर्णय विभागाने उच्च न्यायालयाच्या आदेशावरून घेतलेला आहे.

२.१६. तसेच, वृत्तपत्रामध्ये येणारे प्रॉपर्टी रेट्स, बांधकामाच्या ठिकाणी जाहीर केले गेलेले रेट्स, साईट व्हिजिट, स्पॉट इन्स्पेक्शन अंतर्गत आढळून आलेल्या रेट्सचा एकत्रितरित्या विभागामार्फत सांगोपांग विचार केला जातो. तसेच, एखाद्या बांधकामाच्या ठिकाणी जर बाजारभाव व रेडीरेकनरपेक्षाही अधिक भाव सांगितला जात असेल तर अशा ठिकाणी व्हिजिट देऊन योग्य ती कारवाई करण्याचेही काम विभागाच्यामार्फत केले जाते. सप्टेंबर महिन्यापर्यंत या सर्व बाबतीतील आढावा अहवाल माननीय जिल्हाधिकारी यांच्यासमोर ठेवल्यानंतर माननीय जिल्हाधिकारी संबंधित लोकप्रतिनिधींसमवेत बैठक घेऊन यावर सांगोपांग चर्चा करतात. या बैठकीनंतर रेडीरेकनरचे दर निश्चित होतात. डिसेंबर महिन्याअखेर रेडीरेकनरचे दर जाहीर केले जातात. रेडीरेकनरचे दर मार्केट रेटपेक्षा जास्त नाहीत. परंतु जर मार्केट रेटपेक्षा रेडीरेकनरचे भाव जास्त असतील तर त्यामध्ये निश्चितपणे दुरुस्ती करण्याचा प्रयत्न केला जाईल. तथापि, रेडीरेकनरचे भाव मार्केट रेटपेक्षा निश्चितपणे कमी आहेत. यामध्ये जर काही अडचण असेल तर त्याबद्दल माहिती दिल्यास विभाग समितीच्या शंकेचे निरसन करेल असे नमूद केले.

२.१७. यानुषंगाने समितीने नमूद केले की, विभागीय अधिका-यांनी मार्केट रेटचे इन्स्पेक्शन करीत असतांना केवळ बड्या बिल्डर्सच्या बड्या बांधकामातील प्रॉपर्टीजचे रेट्स पाहिले असतील. एसआरएमधील इमारती, मिल्सच्या जागेवरील इमारतीतील खोल्यांचे दर पाहिलेले आहेत. परंतु त्याच्या बाजूला असलेल्या झोपडपट्टीमधील एसआरए योजनेतील घरांचे दर आपण पाहिलेले आहेत का? बाजार भावाचा अभ्यास करीत असतांना बड्या बांधकामाच्या दराचा अभ्यास करीत असतांना झोनवाईज बांधकामांच्या दर्जाप्रमाणे जागांचे भाव ठरविले जातात. सिम्प्लेक्स मिलच्या जागेवरील बांधकामाचा दर तसेच समोरील म्युनिसिपल जुन्या इमारतींमधील घरांचा दर यामधील फरक पाहण्यात आला आहे का? खटाव

मिलच्या जागेवर आता मोठमोठे बिल्डर्स घरे बांधत आहेत. या बांधकामांचा दर आणि दगडी चाळीतील घरांच्या भावांचा अभ्यास सांगोपांग रीतीने करणे आवश्यक आहे. जिल्हाधिकारी महोदयांकडे होणा-या रेडीरेकनरच्या बैठकीला पूर्व निश्चित दरांना केवळ मान्य करण्याचे काम लोकप्रतिनिधींकडून करून घेतले जाते. विभागीय अधिकारी त्यांच्या सर्वेनुसार रेडी रेकनरचे दर अगोदरच निश्चित करून ठेवतात. या दरांबाबत बैठकीमध्ये साधकबाधक चर्चा वगैरे काहीही होत नाही. जिल्हाधिकारी यांच्याकडे होणा-या बैठकीमध्ये पहिल्या मजल्यावर राहणा-या व एकोणिसाव्या मजल्यावर राहणा-या व्यक्तीला जर देखभाल दुरुस्ती खर्च तसेच मालमत्ता कर सारख्याच प्रमाणात भरावा लागत असेल तर हा अन्याय आहे, हे संबधित अधिका-यांच्या सोदाहरण लक्षात आणून दिले होते. पहिल्या मजल्यावरील माणसाला देखभाल दुरुस्ती व इतर खर्चाचा जो दर लागू आहे, त्यापेक्षा वेगळा दर एकोणिसाव्या मजल्यावर राहणा-या माणसाला लागू होईल. वर्तमानपत्रामध्ये झळकणारे रेट्स आणि त्याचा तुलनात्मक अभ्यास लक्षात घेऊन रेडी रेकनरचे दर ठरविण्यात येतात, हे सर्व असत्य आहे. कारण की, वर्तमानपत्रामध्ये भायखळा येथील भाग हा पश्चिम उपनगरामध्ये दाखविला जातो. परंतु प्रत्यक्षात हा भाग वेगळ्या उपनगरामध्ये येतो. परंतु भायखळा येथील मिल्सच्या जागेवरील भाव झोपडपट्टीच्या ठिकाणावरील एसआरए योजनेअंतर्गत असलेल्या घरांचे भाव लक्षात न घेता येथील दर निश्चित करण्यात आलेले आहेत. मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद येथील जागांच्या भावामध्ये व भाववाढीच्या वारंवारतेमध्ये फरक आहे. मुंबईतील भाववाढीच्या वारंवारतेमध्ये चढउतार जास्त आहेत. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे. मुंबईतील जागांच्या भावामध्ये वाढ झाल्यानंतर त्याचा थोडाबहुत परिणाम इतर शहरांवरही पडतो. या भाववाढीतील वारंवारतेतील चढउतारामुळे प्रकल्पाकरिता जमीन संपादित करणे व त्याचा मोबदला देणे, यामध्ये अनेक प्रकारच्या अडचणी येतात. भू-संपादन कायद्यामुळे त्या त्या भागातील भू-संपादन दराप्रमाणे जमीन संपादित करून त्याचा मोबदला देण्याचा प्रघात आहे. परंतु संबंधित भागामध्ये जर एखाद-दुसरी जागा अतिरिक्त दराने विक्री होऊन त्याची नोंदणी झालेली असेल तर प्रकल्पाकरिता भू-संपादन करीत असतांना अनेक अडचणी येतात. श्री.रविंद्र बऱ्हाटे नावाच्या व्यक्तीने शासनाच्या प्रकल्पाच्या एरियातील काही जमीन एक कोटी रुपये भावाने खरेदी करून त्याची नोंदणी केलेली आहे. तसेच, १ कोटी रुपये या भावाच्या हिशोबाने स्टॅम्प डयुटीही भरलेली आहे. त्या भागामध्ये एक गुंठा जमीन केवळ एक लाख रुपयांना मिळत होती. परंतु श्री. बऱ्हाटे यांनी एक गुंठा ही जमीन एक कोटी रुपये या दराने खरेदी केल्यामुळे उत्पादन शुल्क विभागाच्या रेकॉर्डला तेथील भाव प्रतिगुंठा एक कोटी रुपये इतका नोंदविला गेलेला आहे. उत्पादन शुल्क विभागाचे प्रतिनिधी भूसंपादनाचा दर ठरवित असतांना श्री.बऱ्हाटे यांनी खरेदी केलेल्या जमिनीचा भाव बघून तेथील इतर जमिनींचा मोबदला दर निश्चित करतील. यामध्ये शासनाचा महसूल बुडविला जात आहे. एखाद्या भागातील जमिनीला अवाजवी भाव व महत्त्व देऊन प्रकल्प स्थळी असलेल्या जमिनीचा भू-संपादनाअंतर्गत भाव उगाचच वाढवून देण्याचे हे काम आहे. तसेच भू-संपादन करीत असतांना संबंधित विभाग व उत्पादन शुल्क विभागाच्या प्रतिनिधींनी केवळ ५-२५ व्यवहार न बघता सर्व प्रकारच्या खरेदी विक्री व्यवहाराची तपासणी करणे आवश्यक आहे. प्रकल्प स्थळी असलेल्या जमिनींच्या व्यवहारांची सविस्तर कागदपत्रांचा सखोल अभ्यास करून त्यामधील सरासरी दर मोबदल्याकरिता निश्चित करणे आवश्यक आहे.

२.१८. भू-संपादन करीत असतांना संबंधित भागातील जमिनीच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहाराची सविस्तर माहिती पडताळून त्याप्रमाणे मोबदला दर निश्चित करणे आवश्यक आहे, असा सर्वोच्च न्यायालयाचा निकाल आहे असे समितीने निदर्शनास आणले असता, विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, काही ठराविक व्यक्तींनी एखादी जमीन विशिष्ट कारणाकरिता, जाणुबुजून जास्त किमतीला विकली किंवा विकत घेतली असेल आणि त्याप्रमाणे शासकीय दस्ताऐवजांवर व्यवहार नोंदविले गेले असतील तर त्याप्रमाणे रेडी रेकनरचे दर वाढत नाहीत. भू-संपादन अधिकाऱ्यांना सेक्शन १८ नुसार संबंधित प्रकल्प स्थळी असलेल्या व आजुबाजूच्या सर्व प्रकारच्या जमिनींचे खरेदी विक्रीच्या व्यवहाराचा सखोल अभ्यास केल्याशिवाय भू-संपादनाच्या मोबदल्याचे दर निश्चित करता येत नाहीत. तसेच, हे सर्व दर पाहता रेडी रेकनरमधील जागांचे भाव व त्यांच्या भाववाढीमधील वारंवारतेमध्ये चढ उतार येत नाहीत.

२.१९. मुंबई शहरामध्ये मिल्सच्या जागेवर, जिल्हाधिकारी यांच्या जागेवर ज्या इमारतींचे बांधकाम होत आहे, त्यामधील सदनिकांचे भाव गृहनिर्माण संस्थेमध्ये दिल्या जाणा-या सोयी सुविधा व एरिया पाहून ठरविलेले असतात. एसआरए योजनेतील सदनिकांचे भाव बड्या बिल्डर्सच्या बांधकामापेक्षा कमी असतात. बड्या इमारतींमध्ये व मिल्सच्या जागेवर असलेल्या इमारतींमधील सदनिका व त्यांच्या प्रशस्तपणामध्ये फरक असतो. सामाजिक न्यायाच्या दृष्टीकोनातून एसआरए व उच्चभ्रू इमारतींच्या सदनिकांच्या किंमती व देखभाल दुरुस्ती खर्च, मालमत्ता कर यामध्ये फरक असणे आवश्यक आहे. एका शहरातील एकाच भागातील सदनिकांच्या वैविध्यामधील हा फरक रेडीरेकनर दर निश्चित करण्याकरिता गृहित धरणे आवश्यक असल्याचे मत समितीने व्यक्त केले.

२.२०. एकाच शहरातील एकाच भागातील एखाद्या जमिनीच्या एका जमिनीच्या तुकड्याकरिता २५ लाख रुपये दिले गेले असतील. दुसऱ्या तुकड्याकरिता एका व्यक्तीने जर एक करोड रुपये दिले असतील तर त्या भागातील रेडी रेकनर दर निश्चित करण्याकरिता यापैकी कोणता व्यवहार गृहित धरला जाईल अशी पृच्छा समितीने केली असता, विभागीय प्रतिनिधींनी या दोन्ही व्यवहाराचा सखोल अभ्यास करून रियालिस्टीक कंडिशन पाहून सरासरी भाव रेडीरेकनरकरिता निश्चित केला जाईल. काही वेळेला असे होते की, एखाद्या जमिनीच्या तुकड्याला अपरिहार्य कारणामुळे अवास्तव गैरवाजवी महत्त्व व भाव प्राप्त करून दिला जातो. उद्योजक त्या जमिनीच्या तुकड्याला वाणिज्यिक दृष्टीकोनातून विचार

करून मिळेल त्या किंमतीने खरेदी करून नोंदणी करतो. रेडीरेकनर दर निश्चितीकरिता केवळ दहा टक्के केसेस विचारात घेत नाहीत. एखाद्या जागेवर फायनान्शियल कंपनीच्या सेटअप करिता व निवासी सदनिकेकरिता देण्यात आलेल्या सोयीसुविधांचे दर व इतर बाबींचे दर यामध्ये तफावत असणे आवश्यक आहे असे समितीस विदित केले.

२.२१. या संदर्भात तत्कालीन अर्थमंत्री यांच्याकडे एक तक्रार करण्यात आली होती. एखाद्या बँकेने जर एखाद्या कंपनीला किंवा व्यक्तीला लोन दिले असेल आणि संबंधित व्यक्ती किंवा कंपनी थकबाकीदार झाली असेल तर बँक संबंधित प्रॉपर्टी जप्त करते. अर्शिल कंपनीने एका बँकेकडून लोन घेऊन प्रॉपर्टी विकत घेतली होती. परंतु अर्शिल कंपनी या बँकेची थकबाकीदार झाली. बँकेने अर्शिल कंपनीची प्रॉपर्टी जप्त केली. उत्पादन शुल्क विभागाच्या काही अधिका-यांनी या प्रॉपर्टीचे काही भाग एकत्रितरीत्या स्टॅम्प ड्यूटी व रजिस्ट्रेशन करून परस्पर विकत घेतलेले आहेत. एकापेक्षा अधिक प्लॉट एकत्रितरीत्या नोंदणी करून विकत घेतलेले आहेत. या माध्यमातून शासकीय अधिका-यांनी शासनाचा बराचसा महसूल बुडवलेला आहे. ज्या प्रॉपर्टीचे प्रत्येक प्लॉट स्वतंत्ररित्या रजिस्टर्ड होऊन त्याची स्टँप ड्यूटी भरणे आवश्यक होते, ते एकत्रितपणे रजिस्टर्ड करण्यात आल्यामुळे शासनाचा नोंदणीच्या माध्यमातून व स्टँप ड्यूटीच्या माध्यमातून येणारा महसूल बुडालेला आहे. ही तक्रार केल्यानंतर महसूल विभागाने या संदर्भात चौकशीचे आदेश दिलेले आहेत. ही बाब समितीने निदर्शनास आणली असता, विभागीय प्रतिनिधींनी सदरहू बाब तपासून योग्य ती कारवाई करण्यात येईल. सदरहू अर्शिल कंपनीची प्रॉपर्टी ही मॉर्गेज करण्यात आलेली आहे असे समितीस अवगत केले.

२.२२. परिच्छेद क्रमांक : ४.४ बीड, जालना आणि पुणे या जिल्हयातील वाळू गटाचा लिलाव करतांना शासनाने सप्टेंबर,२००३ मध्ये निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार तसेच नोव्हेंबर, २००८ मध्ये निर्गमित केलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार सर्वोत्तम बोलीदाराशी करारनामा केला नाही. तसेच, त्यांच्याकडून उर्वरित रक्कम घेण्यात आली नाही यासंदर्भात विभागीय सचिवांनी विदित केले की, सन २००५-२००६ मध्ये झालेल्या वाळू लिलावाबाबतचा हा मुद्दा आहे. वाळूच्या लिलावाची एकूण बेरीज ही एक अब्ज रुपये होणे आवश्यक होती. परंतु ही रक्कम केवळ ४२ लाख रुपये वसूल झालेली आहे. उर्वरित ५८ लाख रुपये वसूल होणे बाकी आहे, असे यामध्ये म्हटलेले आहे. या संदर्भात जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडून अहवाल प्राप्त झालेला आहे. वाळू लिलाव हा केवळ एकट्या बीड जिल्ह्यातील नाही. बीड जिल्ह्याशी संलग्न पुणे व जालना या जिल्हयातील वाळूच्या लिलावाचाही यामध्ये समावेश आहे. बीड, पुणे व जालना या तीन जिल्ह्यातील वाळू लिलावाची वसुली ०१ कोटी रुपये इतकी होणे आवश्यक होती. हा तीन जिल्हयांचा संलग्न व संयुक्त वाळू लिलाव विभागीय आयुक्तांच्या मार्फत केला जातो. या तीनही जिल्हयांच्या जिल्हाधिका-यांकडे या वाळूच्या लिलावाची वसुलीची रक्कम विभागून जमा झालेली आहे. विभागीय आयुक्तांनी या लिलावाच्या पावत्या आपल्याकडे ठेवलेल्या असून आता शासनाच्या कार्यवाहीच्या मागणीप्रमाणे संबंधित जिल्हाधिका-यांकडे सादर केलेल्या आहेत. हा वाळूचा लिलाव संलग्न रित्या तीनही जिल्हयामध्ये झालेला आहे, या लिलावामधून शासनाला अपेक्षित असलेली एक कोटी रुपयांची रक्कम वसूल झालेली आहे. या संदर्भातील सविस्तर माहिती जिल्हाधिकारी,बीड यांनी महालेखापालांना सादर केलेली आहे.

२.२३. बीड, पुणे व जालना जिल्हयामध्ये या एक कोटी रुपयांच्या वाळूचा लिलाव विभागून झालेला आहे. केवळ हा लिलाव स्वतंत्रपणे न होता विभागून झाल्यामुळे एका वेळी वाळूच्या लिलावाची रक्कम रिफलेक्ट झालेली नाही. तीनही जिल्हयांच्या जिल्हाधिकारी महोदयांमध्ये या वाळूच्या लिलावाच्या रकमेसंबंधी समन्वय असणे आवश्यक आहे. तसेच, या संदर्भात आक्षेप परिच्छेद येण्यापूर्वी किंवा आल्यानंतर ताबडतोब त्याचे कम्प्लायन्स करणे आवश्यक आहे. या वाळूचा लिलाव कधी झाला अशी समितीने विचारणा केली असता, विभागीय सचिवांनी लिलाव सन २००५-२००६ मध्ये झालेला आहे. तसेच त्यांनी विहित कालावधीत पैसे भरलेले पूर्ण पैसे भरल्यानंतरच वाळू घाटाचा ठेका दिला असल्याचे समितीस अवगत केले.

२.२४. यासंदर्भात उप महालेखाकार नागपूर यांनी, सन २००५-२००६ मध्ये एकूण १९ वाळू घाटांचा लिलाव झाला होता. त्यातील सर्वोच्च बोली १००.३५ लाख रुपयांची होती. विभागाने कळविल्याप्रमाणे आतापर्यंत ४२ लाख रुपयांची वसुली झालेली असून, ५८ लाख रुपयांची वसुली व्हावयाची आहे असे समितीस अवगत केले.

२.२५. याबाबत विभागीय सचिवांनी खुलासा केला की, बीड जिल्ह्यात एकंदरीत १६ लिलावाची प्रकरणे आली होती. त्यापैकी बहुतांश लिलाव संयुक्त होते, तर काही बीड जिल्ह्यापुरते मर्यादित होते. त्याचा एकंदरीत खर्च रुपये १,५१,४५,००० इतका होता. ते पैसे पूर्णपणे मिळालेले आहेत. त्या १६ लिलावांपैकी बीड जिल्ह्यापुरते मर्यादित किती लिलाव होते व संयुक्त लिलाव किती होते या बाबतची आकडेवारी व माहिती महालेखाकारांना व समितीला सादर करण्यात येईल.

२.२६. पोलीस यंत्रणा, तहसीलदार वगैरेंशी हातमिळवणी करून असे व्यवहार होतात. शासनाचे महसुलाचे होणारे नुकसान रोखून महसुलात वाढ होण्याकरिता काय उपाययोजना करण्यात येणार आहे अशी समितीने विचारणा केली असता, ई-टेंडरिंग पद्धतीला २ वर्षांपूर्वी सुरूवात केली असून त्याच्या पुढचा टप्पा ई-ऑक्शन हा आहे. आता विभागाने वाळू घाटांच्या लिलावाबाबत ई-टेंडरिंग व ई-ऑक्शनची पद्धती सर्व जिल्ह्यांत अत्यावश्यक केलेली आहे. यामुळे व्यवहारात पारदर्शकता येईल. महाराष्ट्रात प्रथमच असे केल्याने महसूलात वाढ झालेली आहे. गेली दोन वर्षे याबाबत उशिर होत होता कारण, याकरिता राज्यस्तरिय पर्यावरण समितीची मान्यता मिळणे आवश्यक होते व ती समिती काही काळ

अस्तित्वात नव्हती. परंतु, परवा त्या समितीची बैठक होऊन यास मान्यता मिळालेली आहे. कालच अशी माहिती मिळालेली आहे की, राज्यात किती वाळू घाटांचा लिलाव झाला, त्या करिताची सर्वोच्च बोली किती होती व तो कोणाला देण्यात आला ही सर्व माहिती राज्य शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे असे विभागीय सचिवांनी समितीला अवगत केले.

२.२७. १०० ब्रास वाळू मिळेल असे गृहित धरुन लिलाव झाल्यानंतर ५०० ब्रास वाळू काढली जाते, त्याबाबतच्या उपाययोजनेबाबत समितीने विचारणा केली असता, विभागीय सचिवांनी अशी प्रकरणे निदर्शनास आल्यावर त्यांच्यावर दंडनीय कारवाई केली जाते व त्यांच्याकडून दंड वसूल केला जातो अशी माहिती दिली.

हा प्रश्न केवळ वाळूपुरता मर्यादित नाही तर, मुरुम, माती, दगडांच्या लिलावाबाबतचा देखील आहे. यामध्ये १०० पावत्या केल्या की, पुढच्या पावत्या बनवायच्या नाहीत असे प्रकार होताना दिसतात. १०० ऐवजी ५०० ट्रक वाळू निघते. परंतु, शासनाला मात्र १०० ट्रक वाळूचा महसूल मिळतो. प्रत्येक जिल्हाधिकारी कार्यालयात एक मायनिंग ऑफिसर असतो. परंतु, या सर्व गोष्टी पाहण्यास वेळ नसतो आणि तेथूनच सर्व भ्रष्टाचाराला सुरूवात होते. कोणत्या तरी पातळीवरील प्रशासकीय अधिकारी, ठेकेदार, गावगुंड, ट्रकवाले इतकेच नव्हे तर मिडियाचा देखील यामध्ये सहभाग असतो की, काय असे समितीला नाईलाजाने म्हणावेसे वाटते, एवढे प्रचंड उत्पन्न या मधून मिळते.

२.२८. पिंपरी चिंचवड व पुणे महापालिका कँटोनमेंट क्षेत्रामध्ये गेल्या दोन वर्षांत मोठ्या प्रमाणावर बांधकामे झाली असून त्यांचा सर्व्हे एका एनजीओने केला आहे. त्यानुसार तेथील खोली किंवा बंगला अशा प्रकारच्या नवीन बांधकामांचे एकूण क्षेत्रफळ सुमारे १० लाख चौरसफूट एवढे आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणावरील बांधकामाकरिता किमान १५ हजार ट्रक वाळू लागते असे आपण गृहित धरु. परंतु, दुसरीकडे संपूर्ण पुणे जिल्ह्यासाठी जवळपास ३५०० ट्रक वाळूचा लिलाव झाला. मात्र एकूण लिलाव केलेल्या वाळूपेक्षा प्रत्यक्षात कितीतरी जास्त पट बांधकाम तेथे झालेले आहे, हे एका एनजीओने सिद्ध करून दाखविले आहे. सन २०१०-२०११ मधील हा व्यवहार आहे. वरिष्ठ अधिकारी, भूवैज्ञानिक कार्यालयातील अधिकारी या सर्वांना या व्यवहाराची माहिती आहे, त्यामुळे याची कायदेशीर चौकशी झाली पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले. पैठण येथील शर्मा नावाच्या एका वाळू माफियाने सन २०११-२०१२ मध्ये टाकळी अंबड घाट येथील ५५ हजार ब्रास वाळूचा काही करोड रुपयांचा लिलाव घेतला. टाकळी-अंबड येथे सन २०११-२०१२ मध्ये संबंधित शासकीय अधिकाऱ्यांच्या संगनमताने १५ ब्रास वाळू उचलण्याऐवजी एका वर्षात ५५ हजार ब्रासपेक्षा जास्त वाळू संबंधित कंत्राटदाराने उचलली. एवढेच नव्हे तर या वाळूचा शेजारच्या गावामध्ये अवैध साठा करून ठेवला. त्यानंतर सन २०१२-२०१३ मध्ये कंत्राटदाराने अशी मागणी केली की, सन २०११-२०१२ च्या कंत्राटामधील काही वाळू उपसा करण्याचे राहून गेले असल्यामुळे वाळू उपसा करण्यास व उचलण्यास मुदतवाढ देण्यात यावी. सदर मागणी बाबतचा प्रस्ताव मंत्रालय स्तरावर मंजूर केला गेला व कंत्राटदाराने सन २०१२-२०१३ मध्ये पुन्हा सुमारे ४० हजार ब्रास वाळू उचलली. यापुढे जाऊन चालू वर्षी याच कंत्राटदाराने अशी मागणी केली आहे की, मागील कंत्राटामधील आणखी वाळू उपसा करण्याचे राहून गेले असून पुन्हा मुदतवाढ देण्यात यावी. शासकीय अधिकाऱ्यांनी आता हा प्रस्ताव देखील तयार केलेला आहे. अशा प्रकारे करोडो रुपयांचा भ्रष्टाचार तलाठी स्तरापासून अगदी वरच्या स्तरापर्यंत सुरू आहे आणि त्या माध्यमातून शासनाची दिशाभूल करून शासकीय महसुलाचे प्रचंड नुकसान होत आहे असे नमूद केले.

२.२९. कंत्राटदाराने अवैध वाळू उपसा केल्यानंतर त्याचा साठा करून ठेवला होता. याबाबतची माहिती स्थानिक पोलीस अधीक्षकांना मिळाल्यानंतर त्यांनी त्या ठिकाणी धाड टाकली, ती जागा सिल केली आणि त्या वाळूच्या व्यवहाराला स्थगिती दिली. परंतु, एका महिन्यात पोलीस अधीक्षकांनी दिलेली स्थगिती उठविण्यात आली ही बाब समितीने निदर्शनास आणून या प्रकरणाची चौकशी करीत असताना संबंधित पोलीस अधीक्षकांकडूनही सचिवांनी माहिती घ्यावी. संपूर्ण राज्यातील वाळू उपसा प्रकरणांची चौकशी करावी आणि पुढील आठवड्यात होणाऱ्या समितीच्या बैठकीत त्याबाबतची माहिती समितीला द्यावी असे समितीने सूचित केले.

२.३०. यासंदर्भात माहिती देताना विभागीय सचिवांनी नमूद केले की, अवैध वाळू उत्खननाबाबत विभागाकडून उपाययोजना करण्यात येत असते व मागील काळातही केली गेली आहे. सन २०१२-२०१३ मध्ये राज्यात ३१४३८ अवैध वाळू उपसा प्रकरणे विभागाने शोधून काढली आहेत व संबंधितांना सुमारे ९२ कोटी रुपये दंडाची आकारणी केली असून ४३ कोटी २४ लक्ष रुपये प्रत्यक्षात वसूल झाले आहेत. या संदर्भात एकूण ४०० गुन्हे दाखल करण्यात आले असून या गुन्ह्यांमध्ये ४५७ लोकांना अटक करण्यात आली आहे. प्रतिबंधात्मक कारवाई करणाऱ्या शासकीय अधिकारी, कर्मचाऱ्यांवर मागील काळात हल्ले करण्यात आले होते. काही अधिकारी, कर्मचाऱ्यांना ट्रक, डंम्परखाली चिरडण्याचेही प्रकार झाले आहेत. सन २०१२-२०१३ मध्ये अशा १६ घटना घडल्या आहेत. सन २०१३-२०१४ मध्ये १६८५४ अवैध प्रकरणे विभागाने शोधून काढली आहेत. या प्रकरणात ४५ कोटी १६ लाख रुपये दंडाची आकारणी करण्यात आली असून २८ कोटी २६ लक्ष रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. या प्रकरणात ९६१ गुन्हे दाखल झाले असून ७१७ लोकांना अटक करण्यात आली आहे. शासकीय अधिकारी व कर्मचारी यांच्यावरील हल्ल्याच्या १२ घटना या वर्षात घडल्या आहेत. वारंवार अशा प्रकारे अवैध उत्खनन होत असते. परंतु, त्यावर आळा घालण्याची आवश्यक ती प्रक्रिया किंवा प्रयत्न विभागाकडून केले जात असतात.

२.३१. स्थानिक शासकीय कार्यालये व त्यांचे प्रमुख, उदाहरणार्थ, तलाठी, पोलीस पाटील, ग्राम सेवक, नायब तहसीलदार आणि अन्य अधिकारी यांना अवैध उत्खननाची माहिती का मिळत नाही, ही विचार करण्यासारखी गोष्ट आहे. याचे कारण असे आहे की, या सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांची एक साखळी आहे. वाळू माफियांवर विभागाकडून कारवाई केली जात आहे, हे ठीक आहे. किंबहुना त्यांच्याविरुद्ध टाडा किंवा अन्य कठोर कायद्यान्वये कारवाई करावी, असे समितीचे मत आहे. कारण, या वाळू माफियांनी या व्यवसायामधून एवढे पैसे मिळविले आहेत की, त्यांना या दंडात्मक रकमेचे काहीही वाटणार नाही, ते त्वरित दंडात्मक रक्कम भरतील. महत्त्वाचा प्रश्न हा आहे की, अवैध वाळू उत्खनन करणाऱ्यांविरुद्ध आणि या अवैध वाळू उत्खननाकडे जाणुनबुजून दुर्लक्ष करणाऱ्या शासकीय अधिकारी, कर्मचारी यांच्याविरुद्ध विभागाने कठोर कारवाई करणे आवश्यक आहे. अनुभव असा आहे की, या लोकांविरुद्ध आणि शासकीय अधिकाऱ्यांविरुद्ध कोणतीही कठोर कारवाई होत नाही. जोपर्यंत त्यांच्याविरुद्ध कठोरातील कठोर कारवाई होणार नाही, तोपर्यंत दंडात्मक रकमेची कारवाई केल्याची कागदपत्रे फक्त समोर ठेवली जातील आणि अवैध उत्खनन व अवैध व्यवहार सुरळित सुरू राहतील असे समितीने निदर्शनास आणले असता, विभागीय सचिवांनी सन २०१२-२०१३ मध्ये ४०० गुन्हे दाखल झाले असून ४५७ लोकांना अटक करण्यात आली आहे. तसेच, सन २०१३-२०१४ मध्ये ९६१ गुन्हे दाखल करण्यात आले असून ७१७ लोकांना अटक करण्यात आली आहे असे नमूद केले.

२.३२. अवैध वाळू उत्खनन म्हणजे लिलावाविना, परवानगी नसताना जे वाळू काढतात, त्यांच्यावर केलेली कारवाई. परंतु, ज्यांना १०० ब्रास वाळू काढण्याची परवानगी दिलेली आहे, पण ज्यांनी १५० ब्रास वाळू काढली आहे, त्यांच्यावर कोणतीही कारवाई होत नाही. त्यांचा परवाना वैध असतो. परंतु, त्या वैध परवानाधारकांकडून ड्युप्लिकेट स्लिप्स तयार केल्या जातात, त्यावर शासनाचे खोटे शिक्के मारले जातात आणि वाळूची वाहतूक केली जाते. त्यांच्यावर शासनाचे किंवा शासकीय यंत्रणेचे कोणतेही नियंत्रण नाही. त्याबाबत विभागाकडून कोणती उपाययोजना करण्यात येणार आहे, यासंदर्भात माहितीची विचारणा समितीने केली असता, विभागीय सचिवांनी अशाप्रकारच्या गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी सुरूवातीला पुणे जिल्ह्यात प्रायोगिक तत्त्वावर एक उपाययोजना करण्यात आली होती व आता ती सर्व राज्यभर सुरू करण्यात आली आहे. वाहतूक परवाना स्लिप्स ड्युप्लिकेट तयार केल्या जातात, हे लक्षात आल्यानंतर बारकोडिंग असलेल्या वाहतूक परवाना स्लिप्स तयार करण्यात आल्या आहेत व सर्व जिल्ह्यांमध्ये अशा प्रकारच्या स्लिप्स वितरित करणे बंधनकारक करण्यात आले आहे. समितीने अवैध उत्खनन नेमके कोणते, याबाबतही मुद्दा मांडला आहे. शासनाकडून वाळू उत्खननाची परवानगी देत असताना त्या परवान्यामध्ये परवान्याचा कालावधी आणि उपसा करावयाच्या वाळूची मात्रा (क्वांटिटी) नमूद केलेली असते. शासनाने जर १०० ब्रास काढण्यास परवानगी दिली असेल आणि कंत्राटदाराने १५० ब्रास वाळू काढली असेल तर १०० ब्रास वगळून उर्वरित सर्व वाळू अवैध ठरते. वाळू उत्खननाचा ब्लँकेट परवाना दिला जात नाही. त्यावर कालावधी आणि क्वांटिटी नमूद केलेली असते, असे समितीस अवगत केले.

२.३३. महालेखाकार आणि विभागाच्या आकडेवारीमध्ये निर्माण झालेल्या तफावतीसंदर्भात माहिती सादर करतांना विभागीय सचिवांनी नमूद केले की, पुणे जिल्ह्यात १ कोटी ७ लक्ष रुपयांचा लिलाव त्या वर्षी पुकारण्यात आला होता. त्यापैकी २६ लाख ८८ हजार रुपयांची वसुली झाली असून उर्वरित ८० लाख ६० हजार रुपयांची वसुली करावयाची आहे, असा महालेखाकारांचा आक्षेप आहे. ही फिगर टॅली झाली असून महालेखाकारांचा आक्षेप विभागाला मान्य आहे.

विभागाने पुणे जिल्ह्याच्या संदर्भात दिलेल्या लेखी उत्तरात असे नमूद केले आहे की, 'मौजे जांब या वाळू गटाच्या प्रकरणात लिलावधारक यांच्या ७/१२ वर रु.३५,२५,००० एवढ्या रकमेचा बोजा चढवण्यात आला असून वसुलीची कार्यवाही सुरू आहे.' हे प्रकरण सन २००६-२००७ मधील असून सरकारी वकिलांनी दिनांक २/११/२०१३ रोजी पत्र पाठविले आहे. याबाबत विभागीय सचिवांनी नमूद केले की, सदरहू प्रकरणी संबंधितास खंडकरी शेतकरी म्हणून शासनाकडून ११ हेक्टर जमीन मिळाली आहे. विभागाच्या अधिकाऱ्यांना विश्वास आहे की, या माध्यमातून ही रक्कम वसूल होईल. पूर्वी या लिलावधारकाकडे असलेल्या मालमत्तेचे क्षेत्रफळ ६० गुंठे असे फारच छोटे होते.

२.३४. पुणे जिल्ह्यातील या प्रकरणांबाबत पुणे जिल्हाधिकारी यांना सर्व संबंधित अधिकारी तसेच त्या काळात कार्यरत असणारे अधिकारी आणि या समितीमधील पुणे जिल्ह्यातील सन्माननीय सदस्य यांची एक बैठक आयोजित करण्याच्या सूचना सचिवांनी द्याव्यात. या बैठकीला या समितीमधील पुणे जिल्ह्यातील सन्माननीय सदस्य उपस्थित राहतील व संबंधित अधिकाऱ्यांकडून आवश्यक ती माहिती घेतील. तशाच पद्धतीने बीड व जालना जिल्ह्यातील प्रकरणांबाबत त्या त्या जिल्हाधिकाऱ्यांना बैठक आयोजित करण्याच्या सूचना द्याव्यात. या समितीमधील त्या जिल्ह्यातील सन्माननीय सदस्य बैठकीस उपस्थित राहून माहिती घेतील असे समितीने निदेश दिले. यासंदर्भातील कार्यवाहीची माहिती समितीस अद्याप अप्राप्त आहे.

२.३५. या प्रकरणातील रकमेची वसुली करण्यासाठी संबंधिताच्या मालमत्तेवर बोजा चढविण्यात आला असल्याची व क्षेत्रफळ कमी असल्याची माहिती विभागाने दिली आहे. परंतु, लिलावात भाग घेत असताना संबंधित लिलावधारकांकडून बँक गॅरेंटी किंवा सिक्युरिटी म्हणून मालमत्तेची नोंद घेतली जाते. मग या प्रकरणात अशा प्रकारची कार्यवाही विभागाने का केली नाही अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय सचिवांनी या प्रकरणातील २५ टक्के रक्कम संबंधितांनी अगोदरच भरली आहे. उर्वरित ७५ टक्के रक्कम वसूल करण्यात येत आहे अशी माहिती दिली.

२.३६. ३५ लाख रुपये व ४५ लाख रुपयांची वसुली करण्याचा प्रयत्न केला जात आहे. ४५ लाख रुपयांची वसुली करण्याबाबत कोर्टाने स्टे दिला असून ३५ लाख रुपयांची वसुली करण्याकरिता स्थगिती दिलेली नाही अशी माहिती देण्यात आलेली आहे. १० वर्षे झाल्यानंतर देखील विभागाकडून केवळ मुद्दलच वसूल केली जाणार आहे काय? त्यावर व्याज आकारणे आवश्यक असल्याचे मत समितीने व्यक्त केले असता, विभागीय सचिवांनी, पहिल्या प्रकरणात ३५ लाख २५ हजार रुपये वसूल करावयाचे असून सदर व्यक्तीला वाळू उपसा करण्याची परवानगी दिलेली नव्हती. त्यामुळे त्यांच्याकडून वाळूचे उत्खनन झालेले नाही. वाळू उत्खनन न झाल्याने त्यांच्याकडून ७५ टक्के रक्कम वसूल केली जात आहे. १५ दिवसात उर्वरित ७५ टक्के रक्कम भरावी, अशी अट लिलावाच्या वेळीच निश्चित करण्यात आलेली होती. त्यानुसार सदर वसुली केली जात आहे. मात्र संबंधित व्यक्तीकडून वसुली करताना काही अडचणी येत आहेत. त्यांच्याकडे केवळ ६० गुंठे जमीन आहे. खंडकरी शेतकऱ्यांना जमीन परत करण्याचा कार्यक्रम शासनाने हाती घेतला असून त्यानुसार त्यांना आता ११ हेक्टर जमीन मिळाली आहे. यामुळे आता त्यांच्याकडून रक्कम वसूल करणे शक्य होणार आहे अशी माहिती दिली.

२.३७. एखाद्या व्यक्तीने १०० रुपयांचा ठेका मिळवण्याकरिता २५ रुपये अनामत रक्कम भरली व उर्वरित ७५ टक्के रक्कम न भरल्यास त्यांना ठेका दिला जात नाही. अशा परिस्थितीत वाळू न उचलता त्यांच्याकडून ३५ लाख रुपयांची वसुली केली जात आहे. खरे तर स्वतः ठेका न घेऊन त्यांनी इतर ठेका घेणाऱ्यांना लाभ मिळवून दिलेला आहे. वाळूचा लिलाव करताना काही व्यक्ती अनामत रक्कम भरून नंतर आपला अर्ज मागे घेतात. अशा प्रकारांमुळे काही जणांना फायदा होतो. आतापर्यंत अशी हजारो प्रकरण आहेत. लिलावात भाग घेतल्यानंतर पुढील प्रक्रियेत सहभागी न होता पुढील रक्कम भरायची नाही व ठेका देखील घ्यायचा नाही, असे प्रकार मोठ्या प्रमाणात सर्रासपणे होऊ लागले आहेत ही बाब समितीने निदर्शनास आणली व ४५ लाख रुपयांची वसुली करताना व्याजाची रक्कम आकारुन एकूण ९० लाख रुपयांची वसुली केली पाहिजे असे समितीने अभिप्राय नोंदविले असता, विभागीय सचिवांनी साधारणपणे वाळूचे उत्खनन झाल्यास व्याजाची वसुली केली जाते असे नमूद केले.

२.३८. यानूषंगाने समितीने वाळूचे उत्खनन झाले किंवा नाही, हा मुद्दा महत्वाचा नाही. एखाद्या व्यक्तीकडून मागील १० वर्षापासून ३५ लाख रुपये येणे असल्यास १० वर्षाचे व्याज आकारणे आवश्यक आहे. अन्यथा यामध्ये शासनाचे नुकसान होईल. व्यापारी तत्वानुसार या रकमेवर व्याज आकारलेच पाहिजे. अशा प्रकरणांमध्ये लिलावात भाग घेतला जातो व १०-११ लाख रुपये भरुन १ कोटी रुपयांचा फायदा इतरांना मिळवून दिला जातो. अशा व्यक्तींकडून व्याजाची आकारणी केली गेली पाहिजे असे नमूद केले असता, विभागीय सचिवांनी ही रक्कम व्याजासह वसूल केली जाईल असे समितीस विदित केले.

२.३९. साक्षीच्या सुरूवातीस उपमहालेखाकार (श्री.शिंदे) यांनी दिलेल्या बीड जिल्ह्याच्या माहिती संबंधी असे नमूद केले होते की, सन २००५-०६ यावर्षी १९ वाळू घाटांचा लिलाव झाला होता. बीड खनिकर्म अधिकारी तथा तहसलीदार यांनी समितीस सादर केलेली माहिती १६ वाळूंच्या घाटांच्या लिलावाची होती. सदर माहिती अन्य वर्षाची असल्याने उपमहालेखाकार व विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव यांच्या माहितीमध्ये तफावत येत होती. ही बाब वरीलप्रमाणे स्पष्ट केल्याने समितीसमोर साक्षीच्या सुरूवातीस असलेला मुद्दा निकालात निघाला आहे असे समितीने स्पष्ट केले.

अभिप्राय व शिफारशी :

२.४०. मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ अनुसार अभिहस्तांतरण करारनाम्यावर ज्या क्षेत्रात मालमत्ता असेल त्या क्षेत्राला लागु असणाऱ्या दराने मुद्रांक शुल्क मालमत्तेच्या बाजारमुल्यांवर आकारले पाहिजे. डिसेंबर २००७ ते जानेवारी २००९ च्या दरम्यान उपनिबंधक हवेली-५ यांनी ७.०८ लाख रू, उपनिबंधक उत्तर सोलापूर- १ यांनी ६.३३ लाख रुपये उपनिबंधक नागपूर- ६ यांनी ६.८८ लाख रुपये उपनिबंधक बोरीवली- १ यांनी १७६.०० लाख रुपये असे एकुण २.२५ कोटी रुपये इतक्या कमी मुद्रांक शुल्काची आकारणी केल्याचे महालेखापालांनी अहवालामध्ये निदर्शनास आणले.

उपनिबंधक-६ नागपूर यांच्या दस्ताऐवजावरून भाडेपट्याने घेतलेल्या मालमत्तेच्या हस्तांतरणाचा दस्ताऐवज, विक्रिचा दस्ताऐवज म्हणून वर्गीकृत केल्याने व चुकीच्या पद्धतीने मुद्रांक शुल्कात सुट दिल्याने रुपये ५.६० लाख चुकीची सुट देण्यात आली तसेच उपनिबंधक- ८ नागपूर येथे दस्ताऐवज कब्जाच्या हक्कासहीत गहाण पत्र केले असल्याने रुपये ४.६८ कोटीचे कर्ज प्रतिभुत करण्यासाठी केलेल्या दस्ताऐवजास नियमानुसार रुपये २५.७६ लाख मुद्रांक शुल्क आकारण्याऐवजी फक्त २.३४ लाख इतके मुद्रांक शुल्क आकारले गेल्याने परिणामी रुपये २३.४२ लाख इतक्या मुद्रांक शुल्काची कमी आकारणी झाली, उप निबंधक वर्धा-१ येथे १२.१५ कोटी रूपयाचे कर्ज प्रतिभुत करण्यासाठी केलेले दस्ताऐवज कब्जाचा हक्क पक्का करणारे नसलेले गहाण पत्र असल्याने त्यावर रुपये ६.०७ लाख इतके मुद्रांक शुल्क व रुपये ३०,००० हजार नोंदणी फी आकारणे आवश्यक असताना फक्त रू २०० इतके आकारण्यात आले परिणामी मुद्रांक शुल्क व नोंदणी फी चे रुपये ६.३७ लाख कमी आकारण्यात आले असल्याचे महालेखापालांनी अहवालात नमूद केले आहे.

सदरहू परिच्छेदासंदर्भात समिती पुढील साक्षीदरम्यान समितीस विभागीय सचिवांनी ६ पैकी ४ प्रकरणातील वसुली पूर्ण झाली असल्याचे तसेच एका प्रकरणात उच्च न्यायालयात रिट पिटीशन दाखल असल्याची माहिती समितीस दिली. या अनुषंगाने समितीने नमूद केले की, सदरहू वसुली महालेखापालांनी निदर्शनास आणून दिल्यानंतर केली गेली. ही बाब महालेखापालांनी निदर्शनास आणली नसती तर निश्चितच शासनाच्या महसूलाचे नुकसान झाले असते. याअनुषंगाने रकमेची कमी आकारणी करणारे अधिकारीही जबाबदार असल्याचे अभिप्राय व्यक्त केले.

२.४१. मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम, १९५८ मधील तरतुदी स्पष्ट असताना मुद्रांक शुल्काची योग्य आकारणी न करणे, नियमातील तरतूदीचा चुकीचा अर्थ लावुन मुद्रांक शुल्कातुन चुकीची सुट देणे इ. बाबी संबंधित अधिकाऱ्यांमार्फत जाणीवपूर्वक होत असल्याचे निदर्शनास येत असून त्याव्दारे शासनाचा कोट्यवधी रुपयाचा महसूल बुडविला जात आहे. त्यामधील काही बाबी निदर्शनास आल्यास काही प्रमाणात वसुली केली जाते परंतू बुडविलेल्या शुल्काची पूर्ण वसुली कधीही होत नाही ही वस्तुस्थिती आहे. त्यासंदर्भातील प्रकरणे न्यायालयात वर्षोगिनतीने प्रलंबित रहाणे हाही एक वसुली न होण्यास कारणीभूत असणारा घटक आहे. याकरिता मुद्रांक शुल्क आकारताना संबंधित अधिकाऱ्यांनी अधिक दक्षता घेणे आवश्यक आहे तसेच मुद्रांक शुल्क अधिनियमातील बारकावे जाणून घेणे आवश्यक आहे. **उपरोक्त नमूद प्रकरणी चौकशी करण्यात यावी व मुद्रांक शुल्काची कमी आकारणी करणे तसेच मुद्रांक शुल्कातुन नियमबाह्य सूट देणे इत्यादी बाबी आढळल्याने त्यामध्ये शासनाचे करोडो रुपयाचे नुकसान झाले असल्याने संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करण्यात यावी व त्यांच्याविरुद्ध आवश्यक ती कारवाई केल्यानंतर केलेल्या कार्यवाहीची विस्तृत व प्रकरणनिहाय माहिती समितीस ३ महिन्यात सादर करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

२.४२. लिलावाने वाळू काढण्याकरीता हक्क निश्चितीसाठी शासनाने सप्टेंबर मध्ये निर्गमित केलेला निर्णय आणि नंतर नोव्हेंबर, २००५ मध्ये निर्गमित केलेल्या मार्गदर्शक तत्वाप्रमाणे ज्याची बोलणी स्वीकृत झाली आहे. त्या सर्वोच्च बोलीदाराला लिलावाच्या दिवशी बोली रकमेच्या २४ टक्के रक्कम जमा करणे आवश्यक आहे. लिलावाची उर्वरीत रक्कम ही लिलावापासून १५ दिवसाच्या आत एक रकमी द्यावयाची असते, जर विहीत काळात करार कार्यान्वित झाला नाही तर त्या क्षेत्राचा पून्हा लिलाव करावयाचा असतो आणि बोलीदाराने जमा केलेली रक्कम अपरिवर्तीत करावयाची असते. जर पुनर्लिलाव काही तुट आली तर, तुटीची रक्कम मुळ बोलीदाराकडून जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसुल करावयाची असते.

ऑगस्ट २००४-०५ या काळात बीड, जालना व पुणे येथे २४ वाळूघाटांचे लिलाव रुपये. २.२३ कोटींकरीता केला गेला. सर्वोच्च बोलिदारांनी लिलावाच्या वेळी रू ०.७६ कोटी प्रदान केले. त्यानंतर सर्वोच्च बोलिदारांनी ना करारनामा कार्यान्वित केला ना बोलिची उर्वरित रक्कम प्रदान केली. सबंधित जिल्ह्याधिकाऱ्यांनी केलेल्या पूनर्लिलावामध्ये एकही बोली आली नाही. परिणामी रुपये १.५७ कोटी रकमेला लिलाव देण्यात आला.

समिती समोरील साक्षीदरम्यान समितीने असे निदर्शनास आणले की, काही बोलिदार वाळू लिलावामध्ये सहभागी होऊन अनामत रक्कम भरल्यानंतर उर्वरित रक्कम जाणीवपूर्वक न भरता इतर ठेका घेणाऱ्यांना लाभ मिळवून देतात. आतापर्यंत अशी हजारो प्रकरणे उघडकीस आली आहे. त्यांच्याकडून केवळ मुळ रक्कम वसूल न करता व्याजासह रक्कम वसूल करावी असे समितीने अभिप्राय व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सदरहू रक्कम व्याजासह वसूल केली जाईल असे समितीस आश्वासित केले. **समितीस आश्वासित केल्याप्रमाणे केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्याच्या आत सादर करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

२.४३. वाळुचे लिलाव करताना सर्वोच्च बोलिदाराशी त्यासंदर्भात करारनामा केला नसल्याचेही महालेखापालांनी निदर्शनात आणले आहे. यासंदर्भात अधिक दक्षता म्हणून संबंधित अधिकाऱ्यांना सर्वोच्च बोलीदारांशी प्राथमिक करारनामा करता आला असता परंतू तसेही केले गेले नाही. संबंधित बोलिदारांशी करारनामा न केल्याने त्यांच्याकडून उर्वरीत रक्कम वसुल करण्यामध्ये अडचणी येतात व प्रकरण न्यायालयात गेले तर शासनाची बाजू कमकूवत होते व त्याचा गैरफायदा बोलीदार घेतात ही वस्तुस्थिती आहे. **यासंदर्भातील कर्तव्यामध्ये कसूर करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करण्यात येऊन दोषी आढळल्यास उचित कारवाई करावी. तसेच लिलावाच्या दिवशी सर्वोच्च बोलीदाराशी प्राथमिक करारनामा करण्यासंदर्भात नियमामध्ये सुधारणा करण्याच्या दृष्टीने योग्य ती कार्यवाही करण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

२.४४. अवैध वाळू उत्खननाबाबत विभागाकडून होत असलेल्या कार्यवाहीबाबत माहिती देतांना विभागीय सचिवांनी नमुद केले की, सन २०१२-१३ मध्ये राज्यात ३१४३५ अवैध वाळू उपसा प्रकरणे उघडकीस आल्याचे व संबंधितांकडून रुपये ९८ कोटी दंड आकारणी केली असुन रुपये ४३ कोटी २४ लक्ष वसुल केल्याचे तसेच यासंदर्भात एकुण ४०० गुन्हे दाखल करण्यात आले असून ४५७ लोकांना अटक करण्यात आली असल्याचे नमूद केले. यावरून अवैध वाळू उत्खनन किती मोठ्या प्रमाणात होत असल्याचे निदर्शनास येते. तसेच, वाळूचा अवैध उपसा होण्याच्या प्रकरणांना आळा घालणारी सद्यस्थितीतील यंत्रणा कीती तोकडी व अपूरी असल्याचेही निदर्शनास येते. वाळूचे अवैध उत्खनन होत असताना त्यास पायबंध घालण्यासाठी स्थानिक पातळीवरील तलाठी, तहसिलदार इत्यादी संबंधित अधिकारी यांच्या वेळीच नजरेत न येणे हे सुद्धा अतिशय शंकास्पद व गंभीर आहे. यामध्ये वाळुचे अवैध उत्खनन करणारे व संबंधित अधिकारी यांचे संगनमत असल्याशिवाय हे शक्य नसल्याचे समितीचे मत आहे. **अशी प्रकरणे उघडकीस आल्यास तलाठी, तहसीलदार इत्यादी संबंधित अधिकारी यांचेवरही जबाबदारी निश्चित करण्यात यावी व अवैध वाळूचे उत्खनन होणार नाही याकरीता सशस्त्र व अधिक प्रभावी प्रबळ यंत्रणा उभारण्यासंदर्भात यथोचित कार्यवाही करण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

गृह (परिवहन) विभाग

३.१. भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००८-२००९ या वर्षाच्या महसूली जमा अहवालामधील **परिच्छेद क्रमांक ५.३.१. "शासकीय महसुलाची अफरातफर" व परिच्छेद क्रमांक ५.३.२. "कराची वसुली न करणे"** यासंदर्भात महालेखापरिक्षकांनी खालील अभिप्राय व्यक्त केले.

शासकीय महसुलाची अफरातफर

मुंबई मोटार वाहन कर अधिनियम, १९५८ च्या कलम ३ आणि त्यानुसार केलेल्या नियमान्वये राज्यात वापरात असलेल्या किंवा वापरासाठी ठेवण्यात आलेल्या सर्व वाहनांवर विहित दराने मोटार वाहन कर (एक रकमी करासहित) आणि शुल्क आकारणीय आहे. कर/शुल्क जमा करण्यासाठी विहीत करण्यात आलेल्या पद्धतीप्रमाणे पोचपावत्या तीन प्रतीत बनविणे आवश्यक आहे. त्यापैकी पहिली प्रत कर भरणाऱ्या व्यक्तीस दिली जाते, दुसरी प्रत मोटार वाहन अभिलेख्यात ठेवण्यात येते आणि तिसरी प्रत रोकडवहीत नोंद करण्यासाठी पावती पुस्तकातच ठेवण्यात येते.

महाराष्ट्र कोषागार नियम (मकोनि), १९६८च्या नियम ८(१), अनुसार शासकीय अधिकाऱ्यांनी स्वीकारलेल्या किंवा त्यांच्याकडे भरणा केलेल्या सर्व रकमा प्राप्त झालेल्या दिनांकापासून दोन दिवसांच्या आत कोषागारात/बँकेत जमा करणे आवश्यक आहे. तसेच नियम ९८(ii), (iii), (iv) आणि (vi) अन्वये सर्व अर्थिक व्यवहार, व्यवहार झाल्यावर तत्काळ रोकडवहीत नोंदवावेत आणि ती नोंद तपासण्यात आल्याची खूण म्हणून कार्यालय प्रमुखाने (का.प्र.) ती अनुप्रमाणित करावी. रोकडवही नियमितपणे पूर्ण करण्यात यावी आणि कार्यालय प्रमुखाने रोकडवहीतील रोख शिलकेची पडताळणी करावी अगर सदर काम रोकडवही लिहिणाऱ्या लेखानिकाव्यतिरिक्त इतर कोणत्याही दुय्यम जबाबदार व्यक्तीकडून करवून घ्यावे आणि त्याने, ती बरोबर असल्याबद्दल आद्याक्षरी करावी. महिना अखेरीस, कार्यालय प्रमुखाने रोकडवहीतील रोख शिलकेची पडताळणी करावी आणि पडताळणी करावी आणि पडताळणी केली असल्याचे आणि शिल्लक रक्कम अक्षरी व आकड्यात दोन्ही प्रकारे नमूद करून स्वाक्षरी व तारखेसहीत प्रमाणपत्र अभिलिखित करावे. रोकडवहीत एकदा करण्यात आलेल्या नोंदीत खाडाखोड किंवा उपरिलेखन करण्यात सक्त मनाई आहे. नंतर एखादी चूक आढळल्यास, चुकीच्या नोंदीमधून रेघ ओढून दोन ओळींमध्ये बरोबर असणारी नोंद लाल शाईने करून, सदर चूक दुरूस्त करण्यात यावी. कार्यालय प्रमुखाने अशा प्रत्येक दुरूस्तीसाठी दिनांक घालून अद्याक्षरी करावी.

उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, अंबेजोगाई, जिल्हा बीड येथील अभिलेख्यांची जुलै/ऑगस्ट, २००८ मध्ये चाचणीदाखल तपासणी केली असता पावतीपुस्तक आणि रोकडवहीत आकड्यात फेरबदल करून रुपये १५.६१ लाख इतक्या शासकीय निधीचा अपहार केल्याचे आढळून आले. मोटार वाहन अभिलेख्यांत ठेवण्यात आलेल्या दुसऱ्या प्रतीवरून असे दिसून आले की, फेब्रुवारी २००७ ते एप्रिल २००८ या कालावधीत वाहन धारकांकडून ६५ वाहनांचे रु. १६.५५ लाख वसूल केले होते. या पावत्यांची, पावतीच्या तिसऱ्या प्रतिबरोबर तसेच रोकडवहीबरोबर पडताळणी केली असता रोकडवहीत फक्त रुपये ०.९४ लाखाची नोंद केल्याचे आढळून आले. अशाप्रकारे, मोटार वाहन अभिलेख्यात पूर्ण रक्कम वसूल केल्याचे दर्शविले असताना सुद्धा पावतीपुस्तकाच्या तिसऱ्या प्रतीत, तसेच रोकडवहीतील आकड्यांमध्ये फेरबदल केल्याने रोकडवहीत कमी रकमेची नोंद करण्यात आली आणि पर्यायाने रुपये १५.६१ लाखाची कमी वसुली झाली. पावतीपुस्तकात पावतीच्या तीन प्रती असतात. या तीनही प्रती एकाचवेळी तयार करावयाच्या असल्याने सकृतदर्शनी असे दर्शविते की, पावतीच्या तिसऱ्या प्रती स्वतंत्रपणे तयार केल्या गेल्या असाव्यात.

हे प्रकरण प्रकाशात आल्यावर माहे सप्टेंबर, २००८ मध्ये या कार्यालयातील अभिलेख्यांची, कार्यालय अस्तित्वात असल्यापासून म्हणजेच १५ ऑक्टोबर २००४ पासून सविस्तर तपासणी करण्याकरिता शंभर टक्के लेखापरिक्षण करण्यात आले. अभिलेख्यांची छाननी केली असता माहे मे, २००५ ते जून, २००८ दरम्यान पावत्यांच्या दुसऱ्या व तिसऱ्या प्रतितील आकड्यांत फेरफार करून एकूण रु.४२.५८ लाखाची कमी वसुली केल्याचे आढळून आले.

ऑक्टोबर, २००८ मध्ये रोकडवहीचे तपशीलवार पुनर्विलोकन केले असता पुढील त्रुटी आढळून आल्या.

(१) **रोकडवहीत कमी रकमेची नोंद करणे :** दिनांक२४ नोव्हेंबर २००४ ते दिनांक२८ नोव्हेंबर २००७ मध्ये २१ पावत्यांद्वारे एकूण रुपये ९१,८९९ प्राप्त झाले होते. त्यापैकी रोकडवहीत फक्त रुपये ३७,३१७ ची नोंद होती आणि उर्वरित रकमेची नोंद केली नव्हती. या पावत्यांची अधिक छाननी केली असता नऊ पावत्यांमधील एकूण रुपये ४,२३५ पैकी कोणत्याही रकमेची रोकडवहीत नोंद घेतली नव्हती आणि उर्वरित १२ पावत्यांमधील पूर्ण रकमेऐवजी फक्त अंशतः रकमेचीच रोकडवहीत नोंद केली होती.

(२) **शासकीय कोषागारात कमी रकमेचा भरणा :** रोकडवहीतील दैनंदिन बेरजांनुसार दिनांक १९ नोव्हेंबर, २००७ रोजी रुपये ३२,२८०, दिनांक ७ मार्च, २००८ रोजी रुपये ४४,०८५ आणि दिनांक २७ मार्च, २००८ रोजी रुपये १२,८३५ पैकी प्रत्यक्षात अनुक्रमे रुपये ३२,१८०, रु. ४४,००५ आणि रुपये १२,८२५ चा भरणा करण्यात आला होता. ही बाब लेखापरिक्षणात निदर्शनास आणून दिल्यानंतर विभागाने माहे ऑगस्ट, २००८ मध्ये वरील तीनही तारखांच्या फरकाच्या एकूण रुपये १९० रकमेचा भरणा करून ही चूक सुधारीत केली.

(३) **कोषागारात भरणा करण्यास विलंबः-** रोकडवही/पावती पुस्तकातील नोंदीप्रमाणे दिनांक २९ नोव्हेंबर २००४ ते दिनांक ३० नोव्हेंबर २००७ दरम्यान नऊ वेळा प्राप्त झालेल्या एकूण रु.१०.४१ लाखपैकी रू.९.८७ लाखाचा वेळेत भरणा करण्यात आला आणि उर्वरित एकूण रुपये ५४,००६ रकमेचा ८ ते ४१ दिवसांच्या विलंबावधीने कोषागारात भरणा करण्यात आला.

(४) **खाडाखोड आणि उपरिलेखन :** ९ नोव्हेंबर २००४ ते २३ जून २००८ या कालावधीत रोकडवहीत खाडाखोड/ उपरिलेखन आणि पांढरा द्रव वापरून (White Fluid) आकडयांत फेरबदल/दुरूस्ती केल्याच्या ६५ नोंदी आढळून आल्या. हे बदल कार्यालय प्रमुखाने साक्षांकित केले नव्हते.

(५) **संशयास्पद व्यवहार :** माहे जून, २००५ ते नोव्हेंबर, २००७ मधील विविध कालावधीत रोकडवहीत केलेल्या रुपये ४३ ते रुपये ३,००३ पर्यंतच्या ३६ नोंदी संशयास्पद असल्याचे आढळून आले. कारण या नोंदीचा पावती पुस्तकात नोंदलेल्या रकमांशी कोणताही परस्पर संबंध नव्हता.

(६) **चुकीच्या शिर्षाखाली जमा रकमेची नोंद :** मोटार वाहन कराच्या तीन पावत्यांमधील एकूण रु.१७,४५६ इतकी रक्कम " ००४१ मोटार वाहन कर " ऐवजी '००२८ व्यवसाय कर' शीर्षाखाली चुकीने जमा करण्यात आली होती.

(७) **रोकडवहीचे अधूनमधून अधिप्रमाणन :** दिनांक २२ नोव्हेंबर २००४ ते मार्च २००६ मधील कालावधीत कार्यालय प्रमुखाने रोकडवहीत अधूनमधून स्वाक्षरी केली होती. तसेच महाराष्ट्र कोषागार नियमानुसार आवश्यक असतानासुद्धा दिनांक १ एप्रिल २००७ पासून ते ३१ मार्च २००८ पर्यंत रोकडवहीतील दैनिक बेरजा तपासण्यात आल्या नव्हत्या आणि कार्यालय प्रमुखाने त्या साक्षांकित केल्या नव्हत्या.

उपनिर्दिष्ट बऱ्याचशा त्रुटी, जर सुधारणेची कोणतीही पावले उचलली नाहीत तर अफरातफर होऊ शकते असे विशेषत्वाने नमूद करून याआधीच ऑगस्ट, २००६ मध्ये लेखापरीक्षणात निदर्शनास आणून दिल्या होत्या. तरीही विभागाला उपाययोजना करण्यात अपयश आले.

एकूण रु. ४३.१३ लाखांच्या शासकीय महसूलाची अफरातफर झाली, हे लेखापरीक्षणात निदर्शनास आणून देताच यापैकी रु.३.३८ लाख वसूल केले गेले. उर्वरित रकमेचा अहवाल प्रतिक्षित आहे (नोव्हेंबर, २००९).

सदर प्रकरण अतिरिक्त मुख्य सचिव (गृह) महाराष्ट्र शासन यांना अर्धशासकीय पत्राद्वारे नोव्हेंबर, २००८ मध्ये कळविण्यात आले. विभागाने माहे जानेवारी २००९ मध्ये शासकीय निधीच्या अफरातफरीत गुंतलेल्या कर्मचाऱ्यांच्या विरोधात फिर्याद (एफ.आय.आर.) दाखल करण्यात आल्याचे कळविले. या संबंधातील पुढील प्रगतीचा अहवाल प्रतिक्षित आहे (नोव्हेंबर, २००९).

३.२. ज्ञापन :

उपरोक्त महालेखापरीक्षकांच्या अभिप्रायासंदर्भात गृह (परिवहन) विभागाने कळविलेल्या लेखी ज्ञापनात नमूद करण्यात आले आहे की,—

मुंबई मोटार वाहन कर अधिनियम, १९५८ च्या कलम २ नुसार पोचपावत्या आता तीन प्रतीत तयार करण्यात येतात व परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे.

महाराष्ट्र कोषागार नियम (मकोनि), १९६८ च्या नियम ८(१), नुसार आता रोकडवही नियमितपणे दररोज पूर्ण करण्यात येत असून, जमा महसुलाची रक्कम त्याच दिवशी स्टेट बँक ऑफ हैद्राबाद, शाखा अंबाजोगाई, जि.बीड ह्या बँकेत शासनाच्या महसूल लेख्यात भरण्यात येते. रोकडवहीवर रोजचे रोज कार्यालय प्रमुख स्वाक्षरी करतात. रोख पुस्तकाची प्रत्येक नोंद तपासण्यात आल्याची खूण म्हणून कार्यालय प्रमुखाने त्यावर स्वाक्षरी करावी अशी तरतूद आहे. तथापि, याबाबत असे सादर करण्यात येते की, या विभागाअंतर्गत पावत्याद्वारे जमा होणारी रक्कम व पावत्यांची संख्या व रोखपुस्तकातील नोंदीची संख्या ही व्यापक प्रमाणात असल्याने तीन बिंदू तपासणी करणे याबाबत नियम केले आहेत. त्यामुळे प्रत्येक नोंद ही कार्यालय प्रमुख साक्षांकित करीत नाहीत असे सादर करण्यात येते.

रोकडवही लिहीणाऱ्या रोखपालाव्यतिरिक्त इतर दुय्यम जबाबदार अधिकाऱ्यांकडून रोखवहीच्या बेरजांची तपासणी व ते बरोबर असल्याबाबत त्याची स्वाक्षरी, अशी कार्यवाही करण्यात येत आहे. महसूलाचा भरणा रोजच्या रोज कोषागारात होत असल्याने महिना अखेरीस शिल्लक रक्कम राहत नसल्याने तसे शिल्लक रकमेचे प्रमाणपत्र देण्यात येत नसून उपरिलेखन न करण्याबाबत रोखवही लिहीणाऱ्या सहायक रोखपालास सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच एखाद्या नोंदीत चूक आढळल्यास ती कार्यालय प्रमुखाच्या स्वाक्षरीने चुकीच्या नोंदीवर रेघ मारुन दोन ओळीमध्ये लाल शाईने बरोबर नोंद घेण्यात येते.

उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, अंबाजोगाई, जिल्हा बीड येथील अभिलेख्यांची तपासणी महालेखापाल कार्यालयाकडून माहे ऑगस्ट, २००८ मध्ये झाली असता, पावती पुस्तक व रोकडवहीतील आकड्यात फेरबदल करून रुपये १५.६५ लाख इतक्या रकमेच्या शासकीय निधीचा अपहार श्री.आर.बी.तायडे, कनिष्ठ लिपिक यांनी केला होता व त्यांनतर महालेखापाल कार्यालयाच्या तपासणी पथकाने माहे सप्टेंबर, २००८ मध्ये

कार्यालय स्थापनेच्या दिनांक १५ ऑक्टोबर २००४ पासून सविस्तर शंभर टक्के तपासणी केली त्यामध्ये मे २००५ ते जून २००८ या कालावधीत पावत्याच्या दुसऱ्या व तिसऱ्या प्रतीतील आकड्यात फेरफार करून एकूण रुपये ४२.५८ लाखाची कमी वसुली केल्याचे आढळले. हा अपहार देखिल श्री.आर.बी.तायडे यांनी केला होता याबाबत सादर करण्यात येते की :-

मा. महालेखापाल यांनी त्यांच्या सन २००७-२००८ च्या लेखपरीक्षणामध्ये दर्शविलेल्या रुपये १५.६१ लाख पैकी रुपये ३.३८ लाख इतकी रक्कम वसूल करण्यात आली व उर्वरीत रक्कम रुपये १२.२३ लाख इतक्या रकमेच्या अपहाराबाबत श्री.आर.बी.तायडे, कनिष्ठ लिपिक यांच्या विरुद्ध शहर पोलीस स्टेशन, अंबाजोगाई येथे ६ ऑगस्ट २००८ रोजी अफरातफरीचा गुन्हा दाखल केला आहे. त्याचा प्रथम खबरी अहवाल क्रमांक १८ ऑक्टोबर २००८ असा असून सदर प्रकरण अंबेजोगाई येथील मा.अतिरिक्त सत्र न्यायाधीश यांचे न्यायालयात सुरू आहे. तसेच याबाबत तातडीची कारवाई म्हणून श्री.आर.बी.तायडे यांना दिनांक ४ सप्टेंबर २००८ पासून शासकीय सेवेतून निलंबित केले आहे. तसेच त्यांना मा. परिवहन आयुक्त यांचेमार्फत विभागीय चौकशी सुरू करण्याबाबत ज्ञापन जा.क्र.पआका/का.८अ/आरबीडी/२००९५२७७, दिनांक २७ जानेवारी २००९ च्या पत्रान्वये या अपहाराबाबत पूर्तता करीत असल्याबाबत स्पष्टोक्ती दिली होती.

मा. महालेखापाल यांच्या पथकाने माहे सप्टेंबर २००८ मध्ये उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाची १०० टक्के तपासणी केली होती त्यानुसार निश्चित झालेली २७.०५ लाख रुपयांच्या अपहाराबद्दल श्री.आर.बी.तायडे, कनिष्ठ लिपिक हेच जबाबदार होते याबाबत शहर पोलीस स्टेशन अंबाजोगाई येथे दिनांक १९ नोव्हेंबर २००८ रोजी उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, अंबेजोगाई यांचे पत्र क्रमांक ७०१/रअप/आस्था उपप्रापका/ अंबेजोगाई नुसार कळविले आहे. आता मा.महालेखापाल यांनी अशा बाबी घडू नयेत यासाठी आता सहायक रोखपालाव्यतिरिक्त इतर जबाबदार अधिकाऱ्यांकडून रोख पुस्तकातील व पावत्यावरील रकमा पडताळणी करणे व त्याबरोबर असल्याबाबत साक्षांकित करणे याचा अवलंब करण्यात येतो. तसेच कोषागारात भरणा केलेल्या शासकीय महसुलाचा रकमांचा ताळमेळ दरमहा घेण्यात येतो.

(१) **रोकडवहीत कमी रकमेची नोंद करणे.—** मा. महालेखापाल यांच्या लेखपरीक्षणामध्ये दिसून आलेल्या त्रुट्या व अपहाराच्या रकमासंदर्भात शहर पोलीस स्टेशन, अंबेजोगाई येथील अपहारसंबंधित कर्मचारी श्री.आर.बी.तायडे, कनिष्ठ लिपिक यांच्यावर दिनांक ६ ऑगस्ट, २००८ रोजी गुन्हा दाखल केला होता व त्यांचेकडून महसूलाच्या हानीची रक्कम वसुलीबाबत प्रयत्न चालू आहेत.

(२) **शासकीय कोषागारात कमी रकमेचा भरणा.—**याबाबत कोषागारात भरणा केलेल्या चलनाची प्रत सोबत जोडली आहे व आता दैनिक रोखपुस्तकाची तपासणी होत असल्याने अशा बाबी घडून येत नाहीत असे सादर करीत आहे.

(३) **कोषागारात भरणा करण्यास विलंब.—**याबाबत सादर करण्यात येते की, आता रोकडवहीची तपासणी, पावतीद्वारे जमा होणाऱ्या रकमा यांची दैनंदिनी तपासणी होऊन सदर रक्कम त्याच दिवशी कोषागारात भरणा करण्यात येते. त्यामुळे पूर्वी झालेल्या विलंबाने भरणा यासारख्या बाबी टाळल्या गेल्या आहेत असे सादर करीत आहे, पूर्वी झालेला विलंब क्षमापित करण्याची विनंती आहे.

(४) **खाडाखोड आणि उपरिलेखन.—**दिनांक ९ नोव्हेंबर २००४ ते २३ जून २००८ या कालावधीतील रोकडवहीत खाडाखोड/ उपरिलेखन व पांढरा द्रव वापरून आकड्यात दुसऱ्या केलेल्या ६५ नोंदी तपासणी पथकास आढळल्या होत्या, सदर कालावधीची रोखपुस्तके, गुन्ह्यांसंदर्भात शहर पोलीस ठाणे, अंबाजोगाई यांनी ताब्यात घेतली असल्याने ते बदल, तपासून साक्षांकित करता येत नाहीत. ती रोखपुस्तके, परत आल्यानंतर तपासणी करून, दुसऱ्या साक्षांकित करण्यात येतील.

(५) **संशयास्पद व्यवहार.—**या व्यवहारासंबंधीच्या कालावधीतील मूळ कागदपत्रे शहर पोलीस स्टेशन, अंबाजोगाई यांच्या ताब्यात असल्याने व उपलब्ध फोटोप्रतीवरून त्याचे व्यवस्थित आकलन होत नसल्याने सदरची पोलिसांकडील मूळ कागदपत्रे प्राप्त होताच शोध घेतला जाईल व त्याचा अहवाल सादर केला जाईल.

(६) **चुकीच्या शिर्षाखाली जमा रकमेची नोंद.—**उप प्रोदशिक परिवहन अधिकारी, आंबाजोगाई यांची मोटार वाहन कराची रुपये १७४५६ इतकी रक्कम '००२८ व्यवसाय कर' या लेखाशिर्षाखाली वजा करून '००४१, मोटार वाहन कर' या लेखाशिर्षाखाली जमा घेण्याबाबत कोषगारास कळविण्यात आले आहे व त्याबाबतच्या कार्यवाहीसाठी पाठपुरावा चालू आहे. आता योग्य त्या लेखाशिर्षाखाली महसूलाच्या जमा रकमा घेण्याबाबत योग्य ती दक्षता घेण्यात येत आहे.

(७) **रोकडवहीचे अधूनमधून अधिप्रमाणन.—**याबाबत आता योग्य ती दक्षता घेण्यात येत असून, रोख पुस्तकातील बेरजा दररोज कार्यालय प्रमुखांकडून साक्षांकित करण्यात येत आहे. मा.महालेखापाल कार्यालयाचे लेखापरीक्षण पथकाने निदर्शनास आणून दिलेल्या चुकाची दुरुस्ती संबंधित पोलीस स्टेशनकडून रोकडवह्या प्राप्त होताच करण्याबाबत दक्षता घेत आहे.

याबाबतच्या सूचना संबंधित कार्यालय प्रमुखांना या अहवालाच्या अनुषंगाने देण्यात आलेल्या आहेत. आता शासकीय महसूलाची हानी/ अपहार होऊ नये यासाठी वेळीच दक्षता घेण्यात येत आहे. व यासाठी अभ्यासगटाची स्थापना करून अशा बाबी भविष्यात घडू नये यासाठी सर्व कार्यालयांना उपाययोजना करण्याबाबत सूचित केले आहे व त्याप्रमाणे प्रत्येक स्तरावर कार्यवाही होत आहे.

मा.लेखापाल कार्यालयाने घेतलेल्या अपहाराच्या संदर्भातील आक्षेपांच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

एलएआर क्र. १५८४६	रु. ५३२४२
एलएआर क्र. १६७३०	रु. १५,५९,७०८
विशेष लेखापरिक्षण	रु. २७,०५,५६३
एकूण	रु. ४३,१८,५१३

यापैकी या कार्यालयाने आज अखेर रू.४,११,००० इतक्या रकमेची वसुली केली आहे. सोबत तक्ता जोडला आहे.

या शासकीय निधीच्या अफरातफरीत गुंतलेल्या श्री. आर. बी. तायडे, कनिष्ठ लिपिक या कर्मचाऱ्यांच्या विरोधात शहर पोलीस स्टेशन, अंबेजोगाई या ठिकाणी फिर्याद क्रमांक १८९/०८ दाखल करण्यात आली आहे. पोलिसांकडून सदर प्रकरण आता मा. अतिरिक्त सत्र न्यायाधीश, अंबेजोगाई यांच्या न्यायालयात दाखल झाले आहे व पुढील सुनावणी चालू आहे.

या प्रकरणी शासकीय पैशांचा अपहार करणारे श्री.आर.बी.तायडे, कनिष्ठ लिपिक यांची केलेल्या अपहाराची रक्कम वसुलीसाठी मा.जिल्हाधिकारी, बीड व औरंगाबाद यांना पत्र क्रमांक ५६८/आस्था/उपप्राप/अंबा/१०, दिनांक १६ एप्रिल २०१० नुसार त्यांच्या नावावर असलेल्या स्थावर व जंगम मालमत्तेसंबंधातील माहिती मागविण्यात येत आहे. ती प्राप्त होताच त्याचे मालमत्तेवर अपहार रकमेच्या वसुलीसाठी टाच आणण्यात येईल.

याबाबत असेही सादर करण्यात येते की, मा. महालेखापाल यांनी त्यांच्या लेखापरीक्षण अहवालामध्ये घेतलेल्या आक्षेपांच्या अनुषंगाने व अपहारीत रकमेच्या वसुलीबाबत, पाठपुरावा करण्यात येत असून ते काम चालू आहे. तसेच मा. महालेखापाल, यांनी शासकीय निधीचा अपहार होऊ नये यासाठी केलेल्या सूचनांचा कोटेकोरपणे अवलंब करण्याबाबत संबंधित कार्यालयास सुचनाही निर्गमित केल्या आहेत व त्याप्रमाणे त्या कार्यालयात कार्यवाही होत आहे.

३.३. कराची वसुली न करणे :

मोटार वाहन कर अधिनियम, १९५८ च्या कलम ३ आणि त्यानुसार केलेल्या नियमान्वये राज्यात वापरात असलेल्या किंवा वापरासाठी ठेवण्यात आलेल्या सर्व वाहनांवर विहित दराने कर आकारणीय आहे. याअधिनियमात वाहनधारकांनी कर आगाऊ भरण्याची तरतूद आहे. देय कराचा भरणा करण्यात कसूर केल्यास प्रत्येक प्रकरणात प्रत्येक महिन्यासाठी किंवा त्याच्या भागासाठी कराच्या रकमेवर दोन टक्के दराने व्याज देय आहे.

पंधरा जिल्ह्यातील १९ प्रादेशिक परिवहन अधिकारी (प्रा.प.अ.) उपप्रादेशिक परिवहन अधिकारी (उ.प्रा.प.अ.) यांच्या कार्यालयातील अभिलेख्यांची मार्च, २००६ ते मे, २००८ दरम्यान चाचणीदाखल तपासणी केली असता असे निदर्शनास आले की, ७२८ वाहनांचा मार्च, २००३ ते फेब्रुवारी, २००९ मधील विविध कालावधीचा रु. ८९.३८ लाख मोटार वाहन कर प्रदान केला नव्हता. याचा परिणाम रु. ८९.३८ लाख मोटार वाहन कराची वसुली न होण्यात झाला. या प्रकरणात प्रदान न केलेल्या विलंबाने प्रदान केलेल्या मोटार वाहन करावर व्याज आकारणीय होते.

ही प्रकरणे माहे एप्रिल, २००६ ते जून, २००८ मध्ये निदर्शनास आणून दिल्यानंतर विभागाने आक्षेप मान्य केले आणि माहे एप्रिल, २००६ ते मार्च २००९ दरम्यान २९० वाहनांचे रू.२५.१८ लाख, रू.२.४३ लाख व्याजासह वसूल केले. उर्वरीत वाहनांच्या वसुली अहवाल प्राप्त झाला नाही (नोव्हेंबर २००९).

उपप्रादेशिक अधिकारी, भंडारा यांच्या अभिलेख्यांची माहे एप्रिल, २००८ मध्ये चाचणीदाखल तपासणी केली असता असे निदर्शनास आले की, वाहनधारकांनी मालवाहू वाहनांच्या १५ प्रकरणात आणि शाळेच्या बसच्या चार प्रकरणात मे, २००२ ते मार्च, २००८ मधील विविध कालावधीचा रु. ८.६९ लाख मोटार वाहन कर भरला नव्हता. विभागाने देय रकमा वसूल करण्यासाठी कार्यवाही केली नव्हती. परिणामी, रु. १४.३१ लाख मोटार वाहन कराची वसुली झाली नाही. (विलंबाने प्रदान केलेल्या/प्रदान न केलेल्या मोटार वाहन कराच्या रु. ५.६२ लाख व्याजासह) ही प्रकरणे निदर्शनास आणून दिल्यानंतर विभागाने (मार्च, २००९) ही वगळणूक मान्य केली आणि संबंधित वाहनधारकांना मागणी पत्रे पाठविण्यात आल्याचे आणि त्वरित वसुली करण्यासाठी एका सहायक उप प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्याची प्रतिनियुक्ती केल्याचे कळविले. तसेच दोन प्रकरणात रु. १.२३ लाखाची रक्कम वसूल केल्याचे नमूद केले (जुलै, २००९) उर्वरित प्रकरणांतील वसुलीचा अहवाल प्राप्त झाला नाही (नोव्हेंबर, २००९)

सदर बाब शासनास मार्च आणि मे, २००९ दरम्यान कळविण्यात आली. त्याचे उत्तर प्राप्त झाले नाही (नोव्हेंबर २००९).

३.४. ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायासंदर्भात गृह (परिवहन) विभागाने कळविलेल्या लेखी ज्ञापनात नमूद करण्यात आले आहे की,

पंधरा जिल्ह्यातील १९ प्रादेशिक आणि उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या महालेखापाल कार्यालयाने मार्च, २००६ ते मे, २००८ या कालावधीत केलेल्या अभिलेख्यांच्या तपासणीमध्ये मार्च, २००३ ते फेब्रुवारी, २००९ मधील विविध कालावधीचा एकूण ७३८ वाहनांचा रू.९०.४१ लाख एवढा मोटार वाहन कर मोटार वाहन मालकानी प्रदान केला नव्हता.

उपरोक्त प्रकरणे महालेखापाल कार्यालयाने माहे एप्रिल, २००६ ते माहे जून, २००८ या कालावधीमध्ये मोटार वाहन विभागाच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर सदर प्रकरणांवर विभागीय प्रादेशिक व उप प्रादेशिक कार्यालयांमार्फत विशेष मोहिमा राबवून करवसूलीसाठी प्रयत्न केले आहेत. संबंधित वाहन मालकांना नोटीसा पाठवून, त्यांच्या पत्यांवर प्रत्यक्ष भेटी देऊन करवसुलीचे प्रयत्न केले आहेत. त्यादरम्यान ७२८ प्रकरणांपैकी ३३८ वाहनांचा ३४९ लाख एवढा कर वसुल केलेला आहे. उर्वरित ४०० वाहनांपैकी प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (मध्य), पश्चिम व पूर्वमधील ८ वर्षावरील परिवहन संवर्गातील वाहने न्यायालयीन आदेशामुळे रद्दबातल झाली असून रस्त्यावर धावत नाहीत. त्यामुळे त्या वाहनांचा कर वसूल होणे शक्य नाही. मोटार वाहन मालकांनी संबधित वाहनांची नोंदणी कायदेशिररित्या रद्द करणे आवश्यक असून तसे न झाल्यामुळे त्या वाहनांचा कर प्रलंबित आहे. परंतु वसुली होणे शक्य नाही.

उप प्रोदशिक परिवहन कार्यालय, भंडारा यांच्या अभिलेख्यांची एप्रिल २००८ मध्ये महालेखापाल कार्यालयाने चाचणीदाखल तपासणी केली तेव्हा मालवाहू वाहनांच्या १५ प्रकरणांत आणि शाळांच्या बसेसच्या ४ प्रकरणात माहे मे, २००२ ते माहे मार्च, २००८ मधील विविध कालावधीचा रू.८.६९ लाख एवढा कर तसेच त्यावरील ५.६२ लाख व्याज मिळून एकूण १४.३१ लाख एवढा कर भरला नसल्याचे निदर्शनास आले होते. सदर प्रकरणी निदर्शनास आणून दिल्यानंतर कार्यालयाने संबंधित वाहन मालकांना मागणीपत्रे पाठवून करवसुलीकरिता सक्षम अधिकाऱ्यांची नियुक्ती केली होती. त्यामुळे ४ प्रकरणांमध्ये कर रू.४.८० लाख व व्याज रू.०.५६ लाख वसूल करण्यात आले आहेत. एकूण ५.३६ लाख वसुली झाली असून उर्वरित ८.९५ एवढ्या वसुलीसाठी कार्यालय प्रयत्नशील आहे.उपरोक्त दोन्ही परिच्छेदांमधील होणाऱ्या कार्यवाहीचा अहवाल आपणांस वेळच्यावेळी पाठवण्यात येईल. महालेखापाल नागपूर विभागीय कार्यालयाच्या लेखा समिती बैठकीचे आयोजन केल्यास बरेचसे परिच्छेद कमी होण्याची शक्यता आहे.

वरील मुद्दांबाबत कार्यालयनिहाय वसुलीचा सविस्तर तपशील पुढीलप्रमाणे आहे :—

(१) अहमदनगर,औरंगाबाद, बीड, जळगाव, जालना, नांदेड, नंदुरबार, नाशिक, मुंबई, पुणे, परभणी, रायगड, रत्नागिरी, सोलापूर आणि ठाणे.

(२) प्रादेशिक परिवहन अधिकार- औरंगाबाद, मुंबई-मध्य, वडाळा, अंधेरी, ठाणे : उपप्रादेशिक परिवहन अधिकारी:अंबाजोगाई, अकलुज, बारामती, जळगाव, जालना, मालेगाव, नांदेड, नंदुरबार, परभणी, पेण, पिंपरी-चिंचवड, रत्नागिरी, श्रीरामपूर आणि सोलापूर.

३.५. साक्ष :

उपरोक्त परिच्छेदासंदर्भात समितीने दिनांक ७ व १५ जानेवारी २०१४ रोजी परिवहन विभागाच्या सचिवांची साक्ष घेतली साक्षीच्या वेळी समितीने उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, अंबेजोगाई, जिल्हा बीड येथील कार्यालयात जुलै/ऑगस्ट २००८ मध्ये अभिलेख्यांच्या फेरतपासणीत पावती पुस्तक व रोकडवहीतील आकड्यात फेरफार करून रु.१५.६५ लाख इतक्या शासकीय रकमेचा अपहार केल्याचे, तसेच मे, २००५ ते जून, २००८ दरम्यान पावत्यांच्या दुसऱ्या व तिसऱ्या प्रतीतील आकड्यात फेरफार करून एकूण ४२.५८ लाख रुपयांची कमी वसुली केल्याचे आढळले. ही बाब कार्यालय प्रमुखांच्या वा सुपर व्हिजन करणाऱ्या अधिकाऱ्याच्या निदर्शनास का आली नाही तसेच त्यावेळी कार्यालय प्रमुख कोण होते? अशी विचारणा विभागीय सचिवांकडे केली असता विभागीय सचिवांनी असा खुलासा केला की, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, अंबाजोगाई, जिल्हा बीड येथील कार्यालयातील अभिलेख्यांची जुलै/ऑगस्ट, २००८ मध्ये तपासणी केली असता शासकीय निधीचा अपहार झाल्याचे आढळून आले, असा महालेखाकारांनी लेखापरीक्षण परिच्छेदात (Audit Para) आक्षेप नोंदविलेला आहे. महालेखाकार कार्यालयाने माहे ऑगस्ट, २००८ मध्ये उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, अंबेजोगाई, जिल्हा बीड येथील कार्यालयातील अभिलेख्यांची तपासणी केली असता पावती पुस्तक व रोकड वहीतील आकड्यांमध्ये फेरबदल करून १५.६५ लाख रुपये इतक्या रकमेच्या शासकीय निधीचा अपहार झाल्याचे आढळून आले. त्यानंतर महालेखाकार कार्यालयाच्या तपासणी पथकाने कार्यालय स्थापनेच्या दिनांकापासून अभिलेख्यांची तपासणी केली असता मे, २००५ ते जून, २००८ या कालावधीत ४२.५८ लाख रुपयांची कमी वसुली केल्याचे आढळून आले. त्यावेळी श्री.आर.बी.तायडे, कनिष्ठ लिपिक हे कॅशियर म्हणून काम पाहत होते. त्यांनी लोकांकडून जास्त पैसे घेतले आणि लोकांना कमी पैसे भरल्याची पावती दिली आणि कॅश बुकामध्ये तशी नोंद घेतली.

उप प्रादेशिक परिवहन अधिकारी हे पर्यवेक्षिय अधिकारी आहेत. त्यामुळे कॅश बुक तपासण्याची जबाबदारी त्यांची आहे. परंतु त्यांनी दररोज कॅश बुक तपासणे, त्याचा ताळमेळ घालणे व महालेखाकार कार्यालयाबरोबर लेखे जुळविणे याकडे दुर्लक्ष केलेले आहे. त्यांनी आपली जबाबदारी व्यवस्थित पार पाडली नाही म्हणून हे प्रकरण घडले. अपहार झालेल्या रकमेपैकी ४.११ लाख रुपये वसूल झालेले आहेत या प्रकरणी श्री.आर.बी.तायडे, कनिष्ठ लिपिक यांच्याविरूद्ध एफआयआर नोंदविण्यात आलेला आहे.

३.६. या घटनेला उप प्रादेशिक परिवहन अधिकारी जबाबदार नाहीत काय? या समितीच्या प्रश्नावर उप प्रादेशिक परिवहन अधिकारी " Lack of Supervision " च्या बाबतीत जबाबदार आहेत असा खुलासा विभागीय सचिवांनी केला. उप प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांवर एफआयआर का दाखल करण्यात आला नाही ? कनिष्ठ लिपिक यांच्याविरुद्ध एफआयआर दाखल करण्यात आलेला आहे. तथापि विभागाने वरिष्ठ अधिकाऱ्यांवर एफआयआर दाखल करावयास पाहिजे होता या समितीच्या मताशी सहमत असल्याचे सांगत विभागीय सचिवांनी उप प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांनी आपली जबाबदारी व्यवस्थित पार पाडली नाही असे विदित केले. त्यांच्या विरुद्ध कोणती कारवाई करणार आहात ? अशी समितीने विचारणा केली असता त्या कालावधीत दोन प्रादेशिक परिवहन अधिकारी आणि एक उप प्रादेशिक परिवहन अधिकारी तेथे कार्यरत होते. आता हे तिन्ही अधिकारी सेवानिवृत्त झालेले आहेत अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीला दिली.

सेवानिवृत्त झालेले असले तरी त्यांच्या विरुद्ध कायदेशीर गुन्हा दाखल करता येतो. त्यांच्या विरुद्ध लवकरात लवकर गुन्हा दाखल करणार आहात काय ? अशी समितीने विचारणा केली असता त्यावर विभागीय सचिवांनी तपासुन घेतो असे समितीस सांगितले.

३.७. विभागीय सचिव समितीला दिशाभूल करणारे उत्तर देत आहेत. शासकीय निधीचा अपहार झाल्याचे विभागाने मान्य केलेले आहे. या प्रकरणी फक्त कनिष्ठ लिपिकावर गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. हे प्रकरण उघडकीस आल्यानंतर या प्रकरणाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात आलेले आहे. जर दोन प्रादेशिक परिवहन अधिकारी आणि एक उप प्रादेशिक परिवहन अधिकारी दोषी होते तर मग विभाग ते अधिकारी सेवानिवृत्त होण्याची वाट बघत होता काय ? त्यांच्या विरुद्ध गुन्हा का दाखल करण्यात आला नाही ? प्रादेशिक परिवहन अधिकारी आणि उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी संगनमताने हा गुन्हा केलेला आहे. ४२.५८ लाख रुपयांचा अपहार झालेला आहे आणि फक्त ४.११ लाख रुपयांची वसुली झालेली आहे. आता हे प्रकरण लोकलेखा समिती समोर आलेले आहे. विभागाने आता पर्यंत या प्रकरणी कार्यवाही का केली नाही ? आता ही कार्यवाही कोण करणार आहे ? तसेच ही घटना केव्हा घडलेली आहे ? अशी विचारणा, समितीने केली असता माहे मे, २००५ ते जून, २००८ या कालावधीत ही घटना घडलेली असून उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, अंबाजोगाई, जिल्हा बीड हे कार्यालय स्थापन झाले तेव्हापासून ही घटना घडलेली असून तीन अधिकाऱ्यांपैकी एक अधिकारी एक वर्षापूर्वी सेवानिवृत्त झालेला आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी आपल्या कामामध्ये दुर्लक्ष केले आहे. प्रत्येक वर्षी अंतर्गत लेखापरिक्षण झाले असते तर हे प्रकरण त्याच वेळी निदर्शनास आले असते. असा खुलासा विभागीय सचिवांनी समितीसमोर केला. तसेच या प्रकरणी एफआयआर दाखल करण्यात आलेला आहे. संबंधित अधिकाऱ्यांवर त्याच वेळी कारवाई करावयास पाहिजे होती. विभागीय चौकशी सुरू करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना नोटीस पाठविण्यात आली आहे. त्यांच्याकडून उत्तर आल्यानंतर कारवाई करण्यात येईल असे ही नमूद केले.

३.८. हे प्रकरण माहे मे, २००५ ते माहे जून, २००८ या कालावधीत घडलेले आहे. हे प्रकरण महालेखाकारांनी उघडकीस आणले का अधिकाऱ्यांनी उघडकीस आणले ? तसेच, हे प्रकरण उघडकीस आल्यानंतर संबंधितांविरुद्ध ताबडतोब गुन्हा का दाखल करण्यात आला नाही या संबंधी माहिती देताना विभागीय सचिवांनी असे विदित केले की, महालेखाकार कार्यालयाने ऑडिट केल्यानंतर हे प्रकरण उघडकीस आलेले आहे. हे प्रकरण अधिकाऱ्यांनी उघडकीस आणलेले नाही. संबंधित अधिकाऱ्यांनी आपली जबाबदारी व्यवस्थितपणे पार पाडली नाही, म्हणून हे प्रकरण घडलेले आहे. प्रत्येक वर्षी लेखापरिक्षण केलेले नाही सन २००५ चे लेखापरीक्षण केले असते तर हे प्रकरण त्याच वेळी उघडकीस आले असते.

श्री. आर. बी. तायडे, कनिष्ठ लिपिक यांच्याविरुद्ध एफआयआर दाखल करण्यात आलेला आहे. या प्रकरणी दोन प्रादेशिक परिवहन अधिकारी आणि एक उप प्रादेशिक परिवहन अधिकारी दोषी आहेत अशी विचारणा समितीने केली असता या प्रकरणात त्यांचा सहभाग आहे किंवा नाही, हे विभागाला सांगता येणार नाही. जर ते दोषी असतील तर पोलीस त्यांचा फौजदारी कारवाईमध्ये समावेश करतील. विभागाला ते पर्यवेक्षणाचा अभावाखाली (Lack of Supervision) दोषी आढळून आलेले ओहत असे विभागीय सचिवांनी स्पष्ट केले.

३.९. या अनुषंगाने समितीने पुढे अशी विचारणा केले की, फक्त कनिष्ठ लिपिकावर एफआयआर का दाखल करण्यात आला ? इतर संबंधित अधिकाऱ्यांवर एफआयआर का दाखल करण्यात आला नाही ? गुन्हेगारी हेतु (criminal intent) आणि (Lack of Supervision) पर्यवेक्षणाचा अभाव या दोन्ही वेगळ्या बाबी आहेत. या प्रकरणी जर पोलीस तपासात इतर लोकांचा सहभाग आढळून आला तर पोलीस त्यांच्यावर देखील फौजदारी स्वरुपाची कारवाई करतील या प्रकरणी गुन्ह्याचा तपास सुरू आहे.

३.१०. विभागाने पोलिसांना कळविले आहे काय तसेच, " Lack of Supervision " च्या बाबतीत देखील पोलिसांना कळविले आहे काय अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधीनी असा खुलासा केला की, या प्रकरणी श्री.आर.बी.तायडे, कनिष्ठ लिपिक यांनी संपूर्ण रकमेचा अपहार केल्याचे कबूल केलेले आहे. दुसरे म्हणजे, या प्रकरणी एफआयआर दाखल करण्यात आलेला आहे. पोलिसांच्या तपासात हा एक अपहार आहे व यामध्ये फक्त एकाच व्यक्तीचा सहभाग आहे की त्याला सहाय्य करणारे इतर काही लोक आहेत हे आढळून आल्यानंतर तपास अधिकाऱ्याला इतर संबंधितांची नावे समाविष्ट करण्याचा अधिकार आहे.

३.११. विभागीय प्रतिनिधीनी केलेल्या खुलाशास अनुसरुन समितीने असे मत व्यक्त केले की, ही घटना मे, २००५ ते जून, २००८ या कालावधीत घडलेली आहे. महालेखाकार कार्यालयाने अभिलेख्यांची तपासणी केली असता १५.६५ लाख आणि ४२.५८ लाख रुपयांचा अपहार झाल्याचे आढळून आले आहे. विभागाने फक्त कनिष्ठ लिपिक यांच्या विरुद्ध एफआयआर दाखल केलेला आहे. विभागाने इतर संबंधित अधिकाऱ्यांवर एफआयआर दाखल केलेला नाही. समितीचे असे मत आहे की, या प्रकरणी प्रधान सचिवांपासून कनिष्ठ पातळीपर्यंतचे अधिकारी जबाबदार आहेत. परिवहन विभागाचे प्रधान सचिव, परिवहन आयुक्त, प्रादेशिक परिवहन अधिकारी, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करावा असे समितीने निदेश दिले. दिनांक १५ जानेवारी, २०१४ रोजीच्या बैठकीत समितीने पुन्हा असे निदेश दिले की, दिनांक ७ जानेवारी, २०१४ रोजीच्या बैठकीत समितीने दिलेल्या निदेशाप्रमाणे कारवाई करण्याची आवश्यकता नसून परिवहन विभागाचे प्रधान सचिव व आयुक्त यांचा लेखी खुलासा घेवून अन्य संबंधित अधिकाऱ्याविरुद्ध कारवाई करण्यात यावी असे निर्देश विभागाला दिले.

३.१२. समितीने दिलेल्या निदेशानुषंगाने प्रधान सचिव व आयुक्त गृह (परिवहन) विभाग यांनी त्यांचे खुलासे समिती समोर सादर केले. प्रधान सचिव गृह (परिवहन) विभाग यांनी त्यांच्या खुलाशात पुढील प्रमाणे नमूद केले आहे.

उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, अंबेजोगाई जि.बीड येथील कार्यालयात माहे जुलै, ऑगस्ट, २००८ मध्ये अभिलेख्यांच्या फेरतपासणीत पावती पुस्तक व रोकडवहीतील आकड्यात फेरफार करून रू.१५.६५ लाख इतक्या शासकीय रकमेचा अपहार केल्याचे तसेच माहे मे, २००५ ते जून, २००८ दरम्यान पावत्यांच्या दुसऱ्या व तिसऱ्या प्रतीतील आकड्यात फेरफार करून एकूण ४२.५८ लाख रूपयांची कमी वसुली केल्याचे आढळले.

३.१३. उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, अंबेजोगाई येथील अपहार लेखापरीक्षणादरम्यान निदर्शनास आल्यानंतर तत्कालीन कनिष्ठ लिपीक श्री.आर.बी.तायडे हे जबाबदार असल्याने त्यांच्याविरुद्ध अंबेजोगाई पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल करण्यात आली. त्यावरून पोलीस स्टेशन, अंबेजोगाई येथे श्री.आर.बी.तायडे आणि श्री.सचिन रामेश्वर तायडे यांच्याविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. सद्यःस्थितीत सदर प्रकरण जिल्हासत्र न्यायालय, अंबेजोगाई येथे न्यायप्रविष्ट आहे.

३.१४. उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, अंबेजोगाई कार्यालयास एकूण १२ अधिकारी/कर्मचारी यांची पदे मंजूर असून त्यापैकी ४ पदे ही ड्रायव्हर, स्वच्छक, रखवालदार, शिपाई या प्रवर्गातील आहेत. उर्वरित आठ पदांपैकी काही पदे नेहमीच रिक्त राहतात. सध्याही उप प्रादेशिक परिवहन पदावरील अधिकारी बदलीनंतर वैद्यकीय कारणास्तव दीर्घकाळ रुजू झालेले नाहीत. त्यामुळे प्रत्यक्षात कमी कर्मचाऱ्यांच्या सहाय्याने कामकाज सुरू आहे. परिणामी एका अधिकाऱ्यांस/कर्मचाऱ्यास अनेक जबाबदाऱ्या सांभाळाव्या लागतात. त्यामुळे कामाचे दर्जावर परिणाम होतो. तसेच नियुक्ती दिलेले अधिकारी/कर्मचाऱ्यांची सदर ठिकाणी रुजू न होण्याची प्रवृत्ती दिसून आली आहे. त्यामुळे कर वसुलीवर त्याचा प्रतिकूल परिणाम दिसून आलेला आहे.

३.१५. या कार्यालयामध्ये अधिकारी/कर्मचारी यांच्यामध्ये रूजू न होण्याची प्रवृत्ती असल्याचे महत्वाचे कारणे म्हणजे त्या कार्यालयातील कनिष्ठ लिपीक श्री.आर.बी.तायडे यांच्यावर गुन्हा दाखल झाल्यानंतर त्यांना सेवेतून निलंबित करण्यात आले. त्यांच्या निलंबनाचा राग मनात धरून त्यांचा मुलगा श्री.सचिन रामेश्वर तायडे यांनी दिनांक ३० मे, २००९ रोजी प्रादेशिक परिवहन कार्यालय, औरंगाबाद येथे बैठक चालू असतांना कार्यालयात घुसून गोळीबार केला. या गोळीबारात सदर कर्यालयाचे तत्कालीन लेखाधिकारी श्री. धर्माजी शिवान्ना कोंडवार यांचा मृत्यू झाला. तसेच तत्कालीन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्यावर देखील त्याने हल्ला केला. तथापि, त्या हल्ल्यातून ते बचावले. सदरच्या गुन्ह्यासंबंधाने श्री.सचिन रामेश्वर तायडे औरंगाबाद कारागृहात आहे. या प्रकरणामुळे अंबेजोगाई येथील अधिकारी/कर्मचाऱ्यांमध्ये दहशतीचे वातावरण असल्यामुळे या ठिकाणी अधिकारी/कर्मचारी रूजू होण्यास सामान्यतः राजी नसतात.या प्रकरणात साक्षीदार असलेले अधिकारी/कर्मचारी बीड जिल्ह्यात बदली झाल्यास तेथे जाण्याचे टाळतात असेही आढळले आहे.

३.१६. सदरच्या प्रकरणामध्ये गुन्हा दाखल असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहेत. या दरम्यान मुख्य आरोपी श्री.आर.बी.तायडे यांचे दिनांक २४.३.२०१० रोजी निधन झाले आहे. तसेच श्री. तायडे यांच्या नावावर असलेल्या मालमत्तेची माहिती घेण्याचे प्रयत्न विभागाकडून झाले असून, त्यांच्या नावावर कोणतीही मालमत्ता असल्याचे आढळून आलेले नाही. त्यामुळे अपहाराच्या संपूर्ण रक्कमेची वसुली झाली नाही. तसेच आर. बी. तायडे यांना कोणतेही सेवानिवृत्तीचे लाभ देण्यात आलेले नाहीत.

वरील प्रकरणात उप प्रादेशिक, परिवहन कार्यालय, अंबेजोगाई यांची कार्यालय प्रमुख म्हणून महाराष्ट्र कोषागार नियम, १९६८ प्रमाणे दररोज रोजकिर्द तपासणे, व महिना अखेरीस महालेखापाल कार्यालय व कोषागार कार्यालयाशी याबाबतचा ताळमेळ घालण्याची जबाबदारी होती. तसेच प्रादेशिक परिवहन अधिकारी, औरंगाबाद यांनी प्रादेशिक नियंत्रण अधिकारी म्हणून अंतर्गत लेखापरीक्षण करून नियमाप्रमाणे रोजकिर्द ठेवण्यात येत असल्याचे सुनिश्चित करणे आवश्यक होते. असे झाले असते तर सदर अपहारास वाव मिळाला नसता. परंतु याबाबत कसूर झालेली दिसते. वरील परिच्छेद-४ मधील परिस्थिती विचारात घेतली तरी झालेल्या प्रकाराबाबत त्यांच्याविरुद्ध महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम, १९७९ मधील तरतुदींनुसार जबाबदारी निश्चित करण्याची बाब कार्यवाहीखाली आहे.

३.१७. आयुक्त गृह (परिवहन) विभाग यांनी त्यांच्या खुलासात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :-

उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, अंबेजोगाई जि.बीड येथील कार्यालयात माहे जुलै, ऑगस्ट, २००८ मध्ये अभिलेख्यांच्या फेरतपासणीत पावती पुस्तक व रोकडवहीतील आकडयात फेरफार करून रु. १५.६५ लाख इतक्या शासकीय रकमेचा अपहार केल्याचे तसेच माहे मे, २००५ ते जून, २००८ दरम्यान पावत्यांच्या दुसऱ्या व तिसऱ्या प्रतीतील आकडयात फेरफार करून एकूण रू.४२.५८ लाख रूपयांची कमी वसुली केल्याचे आढळले.

उप प्रदेशिक परिवहन अधिकारी, अंबेजोगाई येथील अपहार लेखापरीक्षणादरम्यान निदर्शनास आल्यानंतर तत्कालीन कनिष्ठ लिपीक श्री.आर बी.तायडे हे जबाबदार असल्याने त्यांच्याविरूद्ध अंबेजोगाई पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल करण्यात आली. त्यावरून अंबेजोगाई पोलीस सत्र न्यायालय, अंबेजोगाई येथे न्यायप्रविष्ठ आहे.

उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, अंबेजोगाई कार्यालयास एकूण १२ अधिकारी/कर्मचारी यांची पदे मंजूर असून त्यापैकी ४ पदे ही ड्रायवर, स्वच्छक, रखवालदार, शिपाई या प्रवर्गातील आहेत. उर्वरीत आठ पदांपैकी काही पदे नेहमीच रिक्त रहातात.सध्याही उप प्रादेशिक परिवहन पदावरील अधिकारी बदलीनंतर वैद्यकीय कारणास्तव दिर्घकाळ रूजू झालेले नाहीत. दोन पैकी एक निरीक्षकांचे पद रिक्त आहे. लिपिकांचे २ पैकी १ पद रिक्त आहे. त्यामुळे प्रत्यक्षात ५ कर्मचाऱ्यांच्या साहाय्याने कामकाज सूरू आहे. परिणामी एका अधिकाऱ्यांस/कर्मचाऱ्यास अनेक जबाबदाऱ्या सांभाळाव्या लागतात. त्यामुळे कामाचे दर्जावर परिणाम होतो. तसेच नियुक्ती अधिकारी/कर्मचाऱ्यांची सदर ठिकाणी रूजू न होण्याची प्रवृत्ती दिसून आली आहे. त्यामुळे कर वसुलीवर त्याचा प्रतिकूल परिणाम झालेला दिसून आलेला आहे.

३.१८. या कार्यालयामध्ये अधिकारी/कर्मचारी यांचेमध्ये रूजू न होण्याची प्रवृत्ती असल्याचे महत्वाचे कारण म्हणजे त्या कार्यालयातील कनिष्ठ लिपिक श्री.आर.बी.तायडे यांच्यावर गुन्हा दाखल झाल्यानंतर त्यांना सेवेतून निलंबित करण्यात आले. त्यांना करण्यात आलेल्या निलंबनाचा राग मनात धरून त्यांचा मुलगा श्री.सचिन रामेश्वर तायडे यांनी दिनांक ३० मे २००९ रोजी प्रादेशिक परिवहन कार्यालय, औरंगाबाद येथे बैठक चालू असतांना कार्यलयात घुसून गोळीबार केला. या गोळीबारात सदर कार्यालयाचे तत्कालिन लेखाधिकारी श्री.धर्माजी शिवान्ना कोंडवार यांचा मृत्यू झाला. तसेच तत्कालिन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्यावर देखिल त्यांनी हल्ला केला. तथापी, त्या हल्ल्यातून ते बचावले. सदरच्या गुन्ह्या- संबंधाने श्री.सचिन रामेश्वर तायडे औरंगाबाद कारागृहात आहेत. याप्रकरणामुळे अंबेजोगाई येथील अधिकारी/कर्मचाऱ्यांमध्ये दहशतीचे वतावरण असल्यामुळे याठिकाणी अधिकारी/कर्मचारी रूजू होण्यास सामान्यतः राजी नसतात. या प्रकरणात साक्षीदार असलेले अधिकारी/कर्मचारी बीड जिल्ह्यात बदली झाल्यास तेथे जाण्याचे टाळतात, असेही आढळले आहे.

३.१९. सदरच्या प्रकरणामध्ये गुन्हा दाखल असून प्रकरण न्याप्रविष्ट आहे. यादरम्यान मुख्य आरोपी श्री.आर.बी.तायडे यांचे दिनांक २४/०३/२०१० रोजी निधन झाले आहे. तसेच श्री.तायडे यांच्या नावावर असलेल्या मालमत्तेची माहिती घेण्याचे प्रयत्न विभागाकडून झाले असून, त्यांच्या नावावर कोणतीही मालमत्ता असल्याचे आढळून आलेले नाही. त्यामुळे अपहाराच्या संपूर्ण रकमेची वसुली झालेली नाही. तसेच श्री. आर. बी. तायडे यांना कोणतेही सेवानिवृत्तीचे लाभ देण्यात आलेले नाहीत.

३.२०. वरील प्रकरणात उप प्रादेशिक परिवहन कार्यालय,अंबेजोगाई यांची कार्यालय प्रमुख म्हणून महाराष्ट्र कोषागार नियम १९६८ प्रमाणे दररोज रोजकिर्द तपासणे व महिना अखेरिस महालेखापाल कार्यालय व कोषागार कार्यालयाशी याबाबतचा ताळमेळ घालण्याची जबाबदारी होती. तसेच प्रादेशिक परिवहन अधिकारी औरंगाबाद यांनी प्रादेशिक नियंत्रण अधिकारी म्हणून अंतर्गत लेखा परिक्षण करून नियमाप्रमाणे रोजकिर्द ठेवण्यात येत असल्याचे सूनिश्चित करणे आवश्यक होते. असे झाले असते तर सदर अपहारास वाव मिळाला नसता. परंतु याबाबत कसूर झालेला दिसतो. वरील परिस्थिती विचारात घेतली तरीही झालेल्या प्रकाराबद्दल त्यांच्याविरुद्ध म.ना.सेवा (शिस्त व अपिल) १९७९ मधील तरतूदीनूसार जबाबदारी निश्चित करण्याची बाब कार्यवाहीखाली आहे.

३.२१. उपरोक्त मुद्दयाच्या अनुषंगाने महालेखाकार यांनी अशी पृच्छा केली की, महाराष्ट्र के ट्रेजरी रुल्स में कैश रिसीट एवं एकाउंट का जो प्रोसीजर है वह विभाग में फॉलो नहीं हुआ है इसलिए यह मिसएप्रोप्रिएशन हुआ है क्या विभाग के प्रधान सचिव यह बता सकते हैं कि इस बारे में क्या कारवाई की गई है एवं भविष्य में ऐसा न हो इस बारे में विभागने क्या कदम उठाये हैं, प्रधान महालेखाकारांच्या या मुद्दयासंदर्भात विभागीय

सचिवांनी असा खुलासा केला की, या संदर्भात विभागांतर्गत अतिरिक्त आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्त करण्यात आली होती. या समितीने आपला अहवाल दिला असून त्यांच्या शिफारशीनुसार अंतर्गत लेखापरीक्षणासंदर्भातील काळजी घेण्यात येत आहे. गेल्या दोन वर्षापासून विभागात अंतर्गत लेखापरीक्षण सुरू झालेले आहे. अंतर्गत लेखापरीक्षणासाठी अधिकारी, कर्मचाऱ्यांची कमतरता होती. तथापि, अन्य विभागातील कर्मचारीवृंद या कामासाठी उपलब्ध करून देण्यात येत आहे. अंतर्गत लेखापरीक्षणाबरोबरच रिकन्सीलिएशनची कार्यवाही देखील वारंवार करीत आहोत. There was a lack of supervision and we admit it. However, lack of supervision doesn't mean as a criminal act.

३.२२. परिच्छेद क्रमांक ५.३.२, संदर्भात उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, भंडारा या कार्यालयाची रु.८.९५ लाख इतक्या थकित कर वसुलीची सद्य:स्थिती काय आहे ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधीनी असे विदित केले की, यामध्ये एकूण १९ प्रकरणे होती. त्यापैकी ७ प्रकरणांमधील वसुली पूर्ण झाली आहे. एकूण आक्षेपित रक्कम रु.१४,३१,०५९ एवढी होती. त्यापैकी रु.४,४३,४७४ एवढी रक्कम वसूल झाली आहे. अन्य, १२ प्रकरणातील रु.९,८७,५८५ एवढी रक्कम वसूल होऊ शकलेली नाही. ही रक्कम वसूल न होण्याचे कारण असे की, ही सर्व प्रकरणे बस ट्रान्स्पोर्टशी संबंधित आहेत. खाजगी बस ट्रान्स्पोर्टच्या चालकांना वार्षिक कर भरणा करण्यास परवानगी देण्यात आली आहे. तथापि, काही लोकांकडून तिमाही किंवा मासिक पद्धतीने कर भरणा केला जातो. तसेच वसुलीचे प्रयत्न सुरू आहेत संबंधित परिवहन निरीक्षकांना प्रकरणे नेमून दिलेली आहेत. त्याचप्रमाणे जमिन महसुल संहितेनुसार (Land Revenue Code) वसुली करण्याबाबतचा प्रस्ताव सन २००९ मध्ये जिल्हाधिकारी, भंडारा यांच्याकडे पाठविण्यात आला आहे. तसेच स्थावर मालमत्ता वसुलीच्या संदर्भात महाराष्ट्र जमिन महसुल संहितेनुसार वसुली करण्याच्या दृष्टीने सन २००९ मध्ये जिल्हाधिकारी, भंडारा यांच्याकडे प्रस्ताव पाठविण्यात आला असल्याची माहिती विभागीय प्रतिनिधींनी दिली.

सन २००९ मध्ये प्रस्ताव पाठविल्याचे विभागाने सांगितले आहे. सन २००९ नंतर सन २०१४ या कालावधीत या प्रस्तावाच्या बाबतीत विभागाने कोणता पाठपुरावा केला, जिल्हाधिकाऱ्यांकडून या प्रस्तावाला ५ वर्षात परवानगी का मिळू शकली नाही, नेमक्या कोणत्या त्रुटी प्रस्तावात आहेत, विभागाने खरोखरच पाठपुरावा केला आहे काय अशी पृच्छा समितीने केली.

३.२३. उपरोक्त समितीच्या प्रश्नावर विभागीय सचिवांनी असा खुलासा केला की, अनुदान क्रमांक ५.३.२ संदर्भात एकूण ७२८ प्रकरणे आहेत. रु.८९.३८ लक्ष कर वसुलीच्या संदर्भात ६२६ प्रकरणांमध्ये १०० टक्के वसुली झाली आहे ही वसुली ६७ लक्ष ११ हजार रुपये एवढी आहे. १०२ प्रकरणातील वसुली राहिलेली आहे त्यामध्ये २२ लाख २६ हजार रुपयांची वसुली करीत असून मार्च अखेर १०० टक्के वसुली करावी, अशा प्रकारचे आदेश संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. संबंधित अधिकाऱ्यांकडून आदेशानुसार कार्यवाही झाली नाही तर त्यांचे वेतन रोखण्याची कार्यवाही देखील करण्यात येणार आहे. भंडारा उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या संदर्भात १९ प्रकरणे आहेत व त्यामध्ये १४ लाख ३१ हजार रुपयांची वसुली करावयाची होती. यापैकी ७ प्रकरणी १०० टक्के वसुली झाली असून ही रक्कम ४ लाख ४३ हजार रुपये आहे. अन्य १२ प्रकरणांमध्ये पार्ट वसुली झाली असून उर्वरित ९ लाख ८७ हजार रुपयांची वसुली मार्चअखेर करण्यासाठी टप्पे घालून दिलेले आहेत. काही प्रकरणातील वसुली झालेली आहे, काही प्रकरणातील रक्कम राईटऑफ करण्याबाबतचा प्रस्ताव आहे तर काही प्रकरणात जमीन महसुल संहिते प्रमाणे वसुली करण्याबाबतचा प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. याप्रमाणे वसुलीसंदर्भात विभागाकडून कार्यवाही केली जात आहे.

३.२४. समितीने पुढे अशी विचारणा केली की, कराची रक्कम राईट ऑफ करण्याचे अधिकार आहेत काय या प्रश्नावर खुलासा करताना विभागीय सचिवांनी असे विदित केले की, वित्त विभागाने या संदर्भात एक शासन निर्णय निर्गमित केलेला आहे. ज्यांच्याकडून वसुली होणे शक्य नसेल त्या प्रकरणातील रक्कम विहित केलेल्या निकषानुसार राईट ऑफ करण्याची परवानगी देण्यात आली आहे. या प्रकरणातील रक्कम १० हजार, २० हजार, ३० हजार, अशी वेगवेगळी आहे. वित्त विभागाच्या शासन निर्णयानुसारच गृह (परिवहन) विभागाकडून कार्यवाही केली जात आहे. तसेच एकूण ७४७ प्रकरणांपैकी ६३३ प्रकरणांमध्ये १०० टक्के वसुली झाली आहे ११४ प्रकरणी वसुली झालेली नाही. ही प्रकरणे सन २००८-२००९ मधील आहेत. तथापि, मार्च अखेर वसुली करण्याबाबतचे आदेश संबंधितांना देण्यात आले आहेत. याच संदर्भात विभागीय प्रतिनिधींनी अशी माहिती समितीस दिली की, ज्या प्रकरणातील वसुली राहिलेली आहेत, त्यापैकी काही प्रकरणातील वसुलीच्या रकमेसंदर्भात लेखापरीक्षक आणि प्रशासन यांच्यामध्ये मतभेद आहेत. विभागाने मांडलेले म्हणणे लेखापरीक्षकांनी मान्य केलेले नाही. बसेसचा कॉन्ट्रॅक्ट करण्यासाठी प्रति आसन ५०० रुपये हा आकारण्यात आलेला कर, बरोबर आहे, असे विभागाचे म्हणणे आहे. तथापि, लेखापरीक्षकांचे म्हणणे असे आहे की, रु. १९०० प्रमाणे कर आकारला जावयास हवा होता. एखादी बस प्रासंगिक करारानुसार चालवायची असेल तर व त्यासाठी तात्पुरते परमिट घ्यावयाचे असेल तर रु. १९०० चार्ज केले जातात. काही प्रकरणात त्रैमासिक कर भरण्यात आला होता यापैकी काही ट्रान्स्पोर्ट वाहने १५/१६ वर्षांपूर्वीच्या आहेत. ही वाहने अपघातामुळे किंवा देखभाल, दुरुस्तीसाठी बंद असल्या तर त्याबाबत चालकांनी विभागाला कळविणे आवश्यक असते. त्यामुळे त्या काळातील कर त्यांना लागत नाही. तथापि, ग्रामीण भागात अनेक युवकांनी शेती व्यवसाय सोडून टेम्पो किंवा अन्य वाहनांव्दारे

प्रवासी वाहतूक करण्याचा स्वयंरोजगार सुरू केलेला आहे. त्यांना या नियमाची योग्य पद्धतीने माहिती नसते व त्यांच्याकडून विभागाला कळविले जात नाही. ज्या मोठ्या ट्रान्स्पोर्ट कंपन्या आहेत, त्यांना नियमांची योग्य माहिती असते. त्यामुळे त्यांच्याकडून वाहन बंद असल्याबाबत विभागाला कळविले जाते.

३.२५. विभागीय प्रतिनिधींनी दिलेल्या खुलाशानुषंगाने समितीने पुढे अशी विचारणा केली की, अनुदान क्रमांक ५.३.२.१ बाबत दिलेल्या लेखी माहितीमध्ये विभागाने असे नमूद केले आहे की, 'उर्वरित ४०० वाहनांपैकी प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (मध्य), पश्चिम व पूर्वमधील ८ वर्षांवरील परिवहन संवर्गातील वाहने न्यायालयीन आदेशामुळे रद्दबातल झाली असून रस्त्यावर धावत नाहीत. त्यामुळे त्या वाहनांचा कर वसूल होणे शक्य नाही.' विभागाने दिलेल्या लेखी माहितीनुसार शहरी भागातील कर वसूल होऊ शकलेला नाही, हे स्पष्ट होते. या विभागामध्ये मोठ्या प्रमाणावर गोंधळ आहे वर्षानुवर्षे वसुली केली जात नाही या विभागाचे प्रमुख म्हणून आयुक्तांकडून किंवा प्रादेशिक परिवहन कार्यालय, उप प्रादेशिक परिवहन कार्यालयामधील प्रमुखांकडून कोणताही पाठपुरावा केला जात नाही विभागाचे प्रमुख म्हणून ही विभागीय सचिवांची जबाबदारी आहे. लेखापरीक्षकांनी निदर्शनास आणून देईपर्यंत या विभागाला कर वसुली न झाल्याचे लक्षातच येत नाही त्यामुळे या सर्वांवर कारवाई झाली पाहिजे, असे समितीचे मत असल्याचे समितीने सांगितले यावर खुलासा करताना विभागीय सचिवांनी हे प्रकरण सन २००८ मध्ये घडलेले असून त्यावेळी या संदर्भातील कार्यवाही करणे आवश्यक होते तथापि, विभागाकडून आता कार्यवाही करण्यात येत असल्याचे समितीस सांगितले.

उपरोक्त परिच्छेदासंदर्भात समितीने दिनांक ७ जानेवारी २०१४ रोजी घेतलेल्या बैठकीत समितीने विभागीय सचिवांनी अशी विचारणा केली की, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, अंबेजोगाई, जिल्हा बीड येथील कार्यालयात जुलै, ऑगस्ट २००८ मध्ये अभिलेख्यांच्या फेरतपासणी पावतीपुस्तक व रोकडवहीतील फेरफार करून रु. १५.६५ लाख इतक्या शासकीय रकमेचा अपहार केल्याचे तसेच मे २००५ ते जून २००८ दरम्यान पावत्यांच्या दुसऱ्या व तिसऱ्या प्रतीतील आकड्यात फेरफार करून एकूण रू. ४२.५८ लाख रुपयाची कमी वसुली केल्याचे आढळले. ही बाब कार्यालय प्रमुखाच्या वा सुपरव्हिजन करणाऱ्या अधिकाऱ्याच्या निदर्शनास का आले नाही तसेच त्यावेळी कार्यालय प्रमुख कोण होते.

उपरोक्त मुद्यांच्या अनुषंगाने खुलासा करतानां विभागीय सचिवांनी समितीस असे विदित केले की, सन २००५ ते जून २००८ या कालावधीत सदरची बाब कार्यालय प्रमुखाच्या व नियंत्रक अधिकाऱ्याच्या निर्देशनास आली नव्हती, सदर कालावधीत खालील अधिकारी कार्यरत होते.

कार्यालय प्रमुख :

(१) श्री. जे. एम. सोनवणे,

दिनांक ०५/०५/२००५ ते ३०/११/२००७

(२) श्री. एस. जे. बुधवंत,

दिनांक ०१/१२/२००७ ते ३०/०६/२००८

प्रादेशिक परिवहन अधिकारी :

(१) श्री. एस. एम. सलामे

दिनांक १०/०९/२००४ ते जून २००७

(२) श्री. ए. व्ही. गिरी

जून २००७ ते ऑगस्ट २००८.

३.२६. महालेखाकारानी यासंदर्भात अभिप्राय नोंदविल्यानंतर केवळ श्री.आर.बी.तायडे, कनिष्ठ लिपीक यानांच जबाबदार धरून कारवाई करण्यात आली. सदरहू प्रकरणी सुपरव्हिजन करणाऱ्या अधिकाऱ्यांचीही जबाबदारी महाराष्ट्र कोषागार नियमान्वये निश्चित करण्यात आली असेल तर त्यांच्यावरही कारवाई का करण्यात आली नाही समितीच्या या उपरोक्त प्रश्नावर कार्यालय प्रमुख व प्रादेशिक परिवहन कार्यालय प्रमुख यांना पर्यवेक्षकीय कर्तव्यातील कसूर व शासकीय कर्तव्यात निष्काळजीपणा केल्याबद्दल दिनांक०४/०१/२०१४ रोजी कारणे दाखवा नोटीस जारी करण्यात आल्या.

कार्यालय प्रमुख :- उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, अंबेजोगाई

(१) श्री. जे. एम. सोनवणे

प्रादेशिक परिवहन अधिकारी :- औरंगाबाद

(१) श्री. एस. एम. सलामे

(२) श्री. ए. व्ही. गिरी

* श्री. एस. जे. बुधवंत, उप प्रा.प.अ अंबेजोगाई यांचे दिनांक २५/०७/२०१३ रोजी निधन झाले आहे असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

शहर पोलीस स्टेशन, अंबेजोगाई येथे अपहारासंबंधी कर्मचारी श्री. आर. बी. तायडे, कनिष्ठ लिपीक यांच्यावर दिनांक ६ ऑगस्ट, २००८ रोजी गुन्हा दाखल केला होता. त्याची सद्यःस्थिती काय आहे व त्यांच्याकडून महसुलांच्या हानीची रक्कम वसुलीबाबतची सद्यःस्थिती काय आहे, तसेच श्री. तायडे यांच्याविरूद्ध आतापर्यंत काय कारवाई केली आहे अशी विचारणा समितीने केली असता श्री. तायडे यांच्याविरोधात दिनांक ०६/०८/२००८ रोजी प्रथम खबरी अहवाल (FIR) दाखल करण्यात आला. सदर प्रकरणी न्यायालयात आरोपपत्र दिनांक २४ नोव्हेंबर २०११ रोजी दाखल करण्यात आले RCC क्र.५१९/०९, पार्ट-१ जे.एम.एफ.सी. अंबेजोगाई स्टेट विरूदध रामेश्वर तायडे हे प्रकरण दिनांक ०९/१२/२०१० च्या मा. न्यायालयाच्या आदेशानुसार अतिरीक्त मुख्य दंडाधिकारी, अंबेजोगाई यांच्या कोर्टात वर्ग करण्यात आले असून सदरचे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. अपहारीत रक्कम रु. ४३.१३ लाख रक्कमेपैकी रु. ४.११ लाख रक्कम वसूल झाली असून उर्वरित ३९.०२ लाख रक्कमेच्या वसुलीचे प्रयत्न सुरू असल्याची माहिती समितीस दिली.

३.२७. रोकडवहीची तपासणी पावतीद्वारे जमा होणाऱ्या रक्कमा यांची दैनंदिन तपासणी होऊन सदर रक्कम त्याच दिवशी कोषागारात भरणा करण्यात येते. यावर कोणाचे नियंत्रण असते, याबाबत अचानक तपासणी करण्यात येत असल्यास कोणत्या दर्जाच्या अधिकाऱ्यामार्फत करण्यात येते या संदर्भात महिती देण्यास विभागास सांगितले त्यावर विभागीय सचिवांनी असा खुलासा केला की जमा शासकीय महसुलाचा त्याच दिवशी कोषागारात भरणा करण्यात येतो व त्यावर कार्यालय प्रमुखांचे संपूर्ण नियंत्रण असते तसेच प्रादेशिक कार्यलयातील अंतर्गत लेखा परिक्षण पथकाद्वारे याबाबतची पडताळणी केली जाते. अचानक तपासणी कार्यालय प्रमुख तसेच प्रादेशिक कार्यालय प्रमुखाद्वारे होत असते.

रोख पुस्तके साक्षांकित करण्यासंदर्भात सध्या कोणती पद्धत अवलंबिण्यात येत आहे याबाबत समितीने विचारणा केली.

३.२८. रोख पुस्तके सांक्षांकित करण्याबाबत महाराष्ट्र कोषागार नियम, १९६८ चे नियम ९८(२) नुसार कॅशबुक ठेवण्यात येत असून जमा रक्कमेची नोंद पावती पुस्तकावरून ठेवण्यात येते. याबाबत तीन बिंदू तपासणी अंतर्गत परिवहन अभिलेख्यातील पावती, स्थळप्रत व कॅशबुकमध्ये नोंदविलेली पावती यांचा ताळमेळ घेऊन लेखापरिक्षण केले जाते. तसेच महाराष्ट्र कोषागार नियम, १९६८ चे नियम ९८(६) नुसार उपरिलेखन वा खाडाखोड कार्यालय प्रमुखामार्फत साक्षांकित करण्यात येते असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

३.२९. माहे जून, २००५ ते नोव्हेंबर, २००७ मधील विविध कालावधीत रोकडवहीत केलेल्या रु. ४३ ते रु. ३,००३ पर्यंतच्या ३६ नोंदी संशयादस्पद असल्याचे आढळून आले याबाबत तपासाची सद्यःस्थिती काय आहे अशी पृच्छा समितीने केली असता सदरचे दफ्तर पोलीस ठाणे, अंबेजोगाई येथे आहे. संशयास्पद नोंदी तपासण्याच्या सूचना प्रादेशिक परिवहन कार्यालय, अंबेजोगाई यांना देण्यात आल्या असल्याची माहिती विभागीय सचिवांनी समितीस दिली.

३.३०. शासकीय निधीच्या अफरातफरीत गुंतलेल्या श्री. आर. बी. तायडे, कनिष्ठ लिपीक यांचे प्रकरण मा. अतिरीक्त सत्र न्यायाधीश, अंबेजोगाई यांच्या न्यायालयात दाखल झाले आहे. या प्रकरणाची सद्यःस्थिती काय आहे अशी समितीने विचारणा केली.

सदरचे प्रकरण न्यायप्रविष्ट असून या प्रकरणी पुढील सुनावणी दिनांक १४/०२/२०१४ अशी होती. तथापि दिनांक १४/०२/१४ रोजी झालेल्या सुनावणीत पुन्हा पुढील सुनावणी दिनांक २४/०२/२०१४ अशी देण्यात आली. त्यांनतर दिनांक २०/०३/२०१४ रोजी सुनावणी ठेवण्यात आली असल्याची माहिती विभागीय सचिवांनी समितीस दिली.

मोटार वाहन मालकाकडून प्रलंबित असलेला रु. ८९.३८ लाख मोटार वाहन कर वसूल करण्यासंदर्भात विशेष मोहीम कशाप्रकारे राबविण्यात येत आहे.

३.३१. उपरोक्त समितीच्या प्रश्नाला माहिती देताना विभागीय सचिवांनी असे विदित केले की, एकूण ७२८ प्रकरणांत रु. ८९.३८ लाख अपेक्षित होते. यापैकी ६४६ प्रकरणांत रु. ६९.४४ लाख वसुली करण्यात आली आहे. उर्वरित ८२ प्रकरणांत रु. १९.९४ लाख करिता कार्यवाही चालू आहे. विलंबाने कर भरणाऱ्या मोटार वाहन मालकांवर काय कार्यवाही करण्यात येते या समितीच्या प्रश्नाला कर थकित असल्यास पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येते असे नमूद केले :—

(१) वाहन मालकास मागणी पत्र पाठविण्यात येते.

(२) मागणी पत्रानुसार कर न भरल्यास, वाहन वायुवेग पथकाद्वारे पकडून अटकावून ठेवले जाते.

(३) कर न भरल्यास कर कायदा, कलम १६ (अ) नुसार परिवहन विभागाकडे प्रकरण पाठविले जाते.

(४) जर वाहन मालक अथवा वाहन दोन्ही सापडत नसतील तर कर वसुली प्रकरण विहीत कर्यपद्धती अवलंबुन निर्लेखित (Write off) करण्यात येते.

संपूर्ण राज्यामध्ये आतापर्यंत मोटार वाहन मालकाकडून किती दंड/कर वसुली करण्यात आला. अद्यापपर्यंत दंड/कर किती प्रलंबित आहे या संदर्भात विभागीय सचिवांनी समितीस अशी माहिती दिली की, महालेखापालांच्या अहवालातील परिच्छेद क्र. ५.३.२ अंतर्गत एकुण ७४७ प्रकरणांत रु. १.०३ कोटी रक्कम आक्षेपित होती. यापैकी ६५३ प्रकरणांत रु. ०.७४ कोटी रक्कम वसूल करण्यात आले आहे. उर्वरित ९४ प्रकरणांत रु. ०.२९ कोटी रक्कम वसूलीकरिता कार्यवाही सुरू आहे.

उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, भंडारा या कार्यालयाची रु. ८.९५ लाख इतक्या थकीत वसुलीच्या सद्यःस्थितीबाबत समितीने विचारणा केली.

३.३२. उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, भंडारा यांच्या अभिलेख्यांची एप्रिल, २००८ मध्ये महालेखापाल कार्यालयाने चाचणी दाखल तपासणी केली तेव्हा मालवाहू वाहनांच्या १५ प्रकरणात आणि शाळांच्या बसेसच्या ०४ प्रकरणात मे, २००२ ते मार्च, २००८ मधील विविध विविध कालावधीचा रू. ८.६९ लाख एवढा कर तसेच त्यावरील ५.६२ लाख व्याज मिळून एकूण १४.३१ लाख एवढा कर भरला नसल्याचे निदर्शनास आले. सदर प्रकरणे निदर्शनास आल्यानंतर कार्यालयाने संबंधीत वाहनमालकांना मागणी पत्रे पाठवून कर वसुलीकरीता सक्षम अधिकऱ्यांची नियुक्ती केली. त्यामुळे ०७ प्रकरणांमध्ये एकूण कर रू.४.९८ लाख इतकी वसुली झाली असून उर्वरित १२ लाख प्रकरणांमध्ये रू. ०९.३२ लाख एवढया वसुलीसाठी कार्यालय प्रयत्नशील असल्याचे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

३.३३ अभिप्राय व शिफारशी :

महाराष्ट्र कोषागार नियम, १९६८ नुसार शासकीय अधिकाऱ्यांनी स्वीकारलेल्या वा त्यांच्याकडे भरणा केलेल्या सर्व रकमा प्राप्त झालेल्या दिनांकापासून दोन दिवसांच्या आत कोषागार/बँकेत जमा करणे आवश्यक आहे. तसेच सर्व आर्थिक व्यवहार, व्यवहार झाल्यावर तात्काळ रोकड वहीत नोंदवून, नोंद तपासल्याची खूण कार्यालय प्रमुखाने अनुप्रमाणित करणे आवश्यक आहे. कार्यालय प्रमुखाने रोकडवही लिहिण्याऱ्या लेखनिकाव्यतिरिक्त रोकडवहीतील शिल्लकेची पडताळणी करावी. या स्वरुपाची कार्यपद्धती अंगिकारणे अभिप्रेत आहे. परंतु बीड जिल्ह्यातील आंबेजोगाई येथील उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाने महाराष्ट्र कोषागार नियमान्वये रोख तथा लेखे या संबंधीची कार्यपद्धती वापरली नाही. त्यामुळे रोखपाल, श्री. आर. बी. तायडे यांनी रु. ४२.५८ लाखांचा अपहार केला आहे. हा अपहार मे, २००५ ते माहे जून, २००८ पर्यंत झालेला असून तो महालेखाकार यांना लेखापरिक्षण करताना लक्षात आलेला आहे. याप्रकरणी अपहार कालावधीत कार्यरत असलेले उप प्रादेशिक परिवहन अधिकारी हेही जबाबदार आहेत. श्री. तायडे यांचा मृत्यू झाला असला तरी त्यांच्या व कुटुंबाच्या नावे असलेल्या स्थावर व जंगम मालमत्तेतून शासकीय रकमेची वसुली करण्यात यावी व उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, श्री.एस.जे.बुधवंत यांचे दिनांक २५-७-२०१३ रोजी निधन झाले असल्याने त्यांच्यावरील कारवाई वगळून श्री.जे.एम.सोनवणे, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी व प्रादेशिक परिवहन अधिकारी, औरंगाबाद, श्री.एस.एम.सलामे व श्री.ए.व्ही. गिरी यांनी आपल्या कर्तव्यात कसूर केलेली असल्यामुळे त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी व याप्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

३.३४. आंबेजोगाई, जि. बीड येथील उप प्रादेशिक परिवहन कार्यालयातील अपहार हा अंतर्गत लेखापरिक्षण वेळेवर न करण्यात आल्यामुळे झाला असून महालेखाकार कार्यालयासोबत वेळेत मेळ घालण्यात न आल्यामुळे शासकीय अधिकाऱ्यांच्या ही बाब वेळीच लक्षात आलेली नाही. **त्यामुळे राज्यातील प्रत्येक उप प्रादेशिक व प्रादेशिक परिवहन कार्यालयात कोषागार विभागाचा एक लेखाधिकारी नियुक्त करण्यात यावा व अंतर्गत लेखापरिक्षण नियमित करण्यात यावे. तसेच महालेखाकार कार्यालयासोबत मेळ घालण्याचे काम वेळेत करण्यात यावे अशी समितीची शिफारस आहे.**

३.३५. उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, भंडारा यांच्या अभिलेख्यांची एप्रिल, २००८ मध्ये महालेखापाल कार्यालयाने चाचणी दाखल तपासणी केली तेव्हा मालवाहू वाहनांच्या १५ प्रकरणात आणि शाळांच्या बसेसच्या ०४ प्रकरणात मे, २००२ ते मार्च, २००८ मधील विविध कालावधीचा रु. ८.६९ लाख एवढा कर तसेच त्यावरील ५.६२ लाख व्याज मिळून एकूण १४.३१ लाख एवढा कर भरला नसल्याचे निदर्शनास आले. **सदर प्रकरणे निदर्शनास आल्यानंतर कार्यालयाने संबंधित वाहनमालकांना मागणी पत्रे पाठवून कर वसुलीकरिता सक्षम अधिकाऱ्यांची नियुक्ती केली. त्यामुळे ०७ प्रकरणांमध्ये एकूण कर रु.४.९८ लाख इतकी वसुली झाली असून उर्वरित १२ प्रकरणांमध्ये रु. ०९.३२ लाख एवढया रकमेची अजून वसुली झालेली नाही. सदर वसुली तातडीने करण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

गृह (राज्य उत्पादन शुल्क) विभाग

४.१. भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या २००८-२००९ या वर्षाच्या महसुली जमा अहवालातील **परिच्छेद क्र. ५.३.३ " अनुज्ञप्ती शुल्काची वसुली "** यासंदर्भात महालेखाकारांनी खालीलप्रमाणे अभिप्राय नोंदविले आहेत.

५.३.३ अनुज्ञप्ती शुल्काची कमी वसुली

महाराष्ट्र बाटलीबंद मद्य नियम, १९९६ अन्वये आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क यांनी प्रतिवर्षी प्रमाणित केलेल्या दराने अनुज्ञप्ती शुल्काची आकारणी आणि वसुली करण्याची तरतूद आहे. राज्य उत्पादन प्राधिकाऱ्यांनी अनुज्ञप्ती शुल्काची अचूक दराने आकारणी आणि वसुली केल्याची खातरजमा न केल्याने अनुवर्ती परिच्छेदांत नमूद केल्याप्रमाणे रु. १८.६२ लाख अनुज्ञप्ती शुल्काची कमी वसुली झाली.

महाराष्ट्र बाटलीबंद मद्य (अनुज्ञप्ती देणे, नुतनीकरण करणे किंवा अनुज्ञप्ती चालू ठेवणे यासाठीचा कालावधी आणि शुल्क) नियम, १९९६ मधील तरतुदींनुसार उक्त नियमांच्या नियम ४ खंड (१) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क विविध अनुज्ञप्तींकरीता प्रत्येक वर्षी अनुज्ञप्ती शुल्काचे दर प्रमाणित करतात. अनुज्ञप्ती शुल्क हे ज्या शहरात, नगरात अथवा गावात ज्या भागात दारुचे दुकान असेल तेथील लोकसंख्येच्या टप्प्यावर आधारीत असते. हे दर ठरावीक काळाने २००५-०६ ते २००८-०९ या वर्षांकरिता सुधारित केले होते. देय रकमा देण्यात कसूर केल्यास, देय रकमांवर नियत दिनांकापासून दरमहा दोन टक्के दराने व्याज देय होते.

अहमदनगर, नागपूर आणि सांगली जिल्ह्यातील अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क यांच्या कार्यालयांतील अभिलेख्यांची एप्रिल, २००७ ते नोव्हेंबर, २००८ दरम्यान तपासणी केली असता असे निदर्शनास आले की, २००५-०६ ते २००८-०९ मधील कालावधींकरिता नुतनीकरण केलेल्या २० अनुज्ञप्तीधारकांकडून लोकसंख्येच्या टप्प्याकरिता चुकीचा दर लावल्याने, लोकसंख्येचा टप्पा २००१ च्या गणनेनुसार अद्ययावत न केल्याने, चुकीचा दर लावल्याने एकूण रु. १८.६२ लाख अनुज्ञप्ती शुल्काची कमी वसुली झाली.

ही प्रकरणे निदर्शनास आणून दिल्यानंतर, अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, अहमदनगर आणि नागपूर यांनी १७ अनुज्ञप्तीधाराकांच्या बाबतीतील रु. १८.१५ लाख अंतर्भूत असलेले आक्षेप मान्य केले. अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, नागपूर यांनी आठ अनुज्ञप्तीधारकांकडून रु. १०.०१ लाख, रू. ९,४८३ व्याजासह वसूल केले आणि अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, सांगली यांनी हे प्रकरण अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क यांचेकडे निर्देशित केले जाईल असे सांगितले आणि मार्च, २००८ ते फेब्रुवारी, २००९ दरम्यान एका अनुज्ञप्तीधारकाकडून रु. ०.१२ लाख वसूल केले.

सदर बाब मे, २००७ ते एप्रिल, २००९ दरम्यान विभागास आणि शासनास कळविण्यांत आली. त्यांचे उत्तर प्राप्त झाले नाही (नोव्हेंबर, २००९).

४.२. ज्ञापन :

महालेखापालांचे अभिप्राय :

लेखा परीक्षा अहवाल सन २००८-०९ परिच्छेद क्रमांक ५.३.३ मधील आक्षेपित रक्कम रु. १८.६२ लाख पूर्णपणे वसुल करण्यात आलेली आहे. यामुळे अभिप्राय नाहीत.

विभागाचे अभिप्राय :

परिच्छेद क्रमांक ५.३.३ मधील आक्षेपीत रक्कम रु. १८.६२ लाख पूर्णपणे वसुल करण्यात आलेली आहे, ही बाब प्रधान महालेखापाल, मुंबई यांनी प्रमाणित केली आहे.

४.३. साक्ष :

समितीने दिनांक ७ जानेवारी, २०१४ रोजी उक्त परिच्छेदासंदर्भात विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी राज्य उत्पादन शुल्काद्वारे जमा होणाऱ्या करासंदर्भात राज्याची माहिती देताना विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, राज्य उत्पादन शुल्काद्वारे मागील वर्षी ९४६० कोटी रुपये कर जमा झाला होता. या वर्षी १०५०० कोटी रुपयांचे उद्दिष्ट विभागाने ठेवले आहे. त्यापैकी आतापर्यंत ७००० कोटी रुपये जमा झाले असून ही रक्कम एकूण उद्दिष्टाच्या ७० टक्के आहे.

गत वर्षी औरंगाबाद जिल्ह्यातून २२०० कोटी रुपये उत्पादन शुल्कापोटी जमा झाले होते. या वर्षी २५०० ते २६०० कोटी रुपये उत्पादन शुल्क जमा होईल, अशी विभागाची अपेक्षा आहे.

यासंदर्भात राज्यात सर्वात जास्त उत्पादन शुल्क औरंगाबाद जिल्ह्यातून प्राप्त होत असून एकूण राज्याच्या २५ टक्के उत्पादन शुल्क मिळवून देणारा औरंगाबाद जिल्हा असल्याची माहिती समितीने निदर्शनास आणून दिली.

४.४. अहमदनगर, नागपूर आणि सांगली जिल्ह्यातील अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क यांच्या कार्यालयाने सन २००५-२००६ ते सन २००८-२००९ मधील कालावधीकरिता नुतनीकरण केलेल्या २० अनुज्ञप्तीधारकांकडून लोकसंख्येच्या टप्प्याकरिता चुकीचा दर लावल्याने लोकसंख्येचा टप्पा सन २००१ च्या गणनेनुसार अद्ययावत न केल्याने एकूण १८.६२ लाख अनुज्ञप्ती शुल्काची कमी वसुली झाली. या संदर्भात विभागीय प्रतिनिधींनी खुलासा करतांना सांगितले की, अहमदनगर आणि नागपूरच्या लोकसंख्येच्या आधारे नागपूर जिल्ह्यात ८ अनुज्ञप्ती व अहमदनगर जिल्ह्यात एफएल-३ च्या ९ अनुज्ञप्ती आहेत. यामध्ये कमी वसुली झाली आहे, ही वस्तुस्थिती आहे. यासंदर्भातील कारण असे आहे की, सन २००६ मध्ये जनगणनेची आकडेवारी सी.डी.फॉर्ममध्ये प्राप्त झाली होती. जोपर्यंत नवीन जनगणनेची अधिकृत आकडेवारी प्राप्त होत नाही, तोपर्यंत मागील जनगणनेच्या आकडेवारीनुसार कर वसुली केली जाते. सन २००६ मध्ये सी.डी.फॉर्ममध्ये आकडेवारी प्राप्त झाल्यानंतर ती माहिती पेपर फॉर्ममध्ये कन्व्हर्ट करण्यात आली व त्यानुसार संबंधित अधिकाऱ्यांना कम्युनिकेट करण्यात आले. कम्युनिकेट केलेल्या आकडेवारीची परवाना नुतनीकरणाच्या वेळी नोंद घेतली जाते. नागपूर जिल्ह्यात ८ अनुज्ञप्ती व अहमदनगर जिल्ह्यात एफएल-३ च्या ९ अनुज्ञप्ती प्रकरणात अशी नोंद घेण्याचे राहून गेले आहे. हा एक लेखनातील दोष आहे. हा दोष महालेखापरीक्षक यांच्या व विभागाच्या लक्षात आल्यानंतर पुढील वर्षी पूर्ण रकमेची वसुली करण्यात येणार आहे.

४.५. यासंदर्भात महालेखाकारांनी सूचित केले की, पोप्यूलेशन के बेसिस पर स्लैब फिक्स हैं एवं रेट फिक्स हैं परन्तु उस हिसाब से काम न होने के कारण रेट में वेरिएशन हो गया है. इस संबंध में ऑब्जेक्शन रेज किया गया है. पोप्यूलेशन के बेसिस पर जो स्लैब फिक्स हैं उसके अनुसार रेट लगाने की बात आयुक्त महोदय ने एग्री की है. विभाग इसको वेरीफाय करें और जो रकम वसूल होना बाकी है वह विभाग वसूल करें.

संपूर्ण राज्याच्या बाबतीत व्हेरिफाय केले आहे. सन २००६ मध्ये फिगर आल्यानंतर कम्युनिकेट केलेले आहे. अन्य जिल्ह्यांच्या बाबतीतील मुद्दे समितीमध्ये आले होते. त्या प्रकरणातील संपूर्ण वसुली झाली आहे. तसेच सध्या जो कर आकारला जात आहे, तो सन २००१ च्या जनगणनेनुसार कर आकारला जात आहे असे विभागीय प्रतिनिधींनी समितीला सांगितले.

४.६. सन २०११ मध्ये जनगणना झाली असून आता दोन वर्षे होऊन गेली आहेत. या जनगणनेची सर्व अधिकृत आकडेवारी इंटरनेटवर प्रसिद्ध करण्यात आली आहे. असे असताना सन २००१ च्या जनगणनेनुसार कराची आकारणी का केली जात आहे, यामुळे शासनाचे महसुली नुकसान होत आहे. नवीन आकडेवारीच्या आधारावर कर वसुली करीत असताना मागील दोन वर्षातील करातील फरकाची रक्कम संबंधितांकडून वसूल केली जाईल का ? अशी पृच्छा समितीने केली असता, विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, जनगणना कार्यालयाकडून अधिकृत आकडेवारी शासनाकडे दिली जाते, शासनाकडून ती स्वीकारली जाते व त्यानंतर ती विविध विभागांना कळविली जाते. ही कार्यवाही जोपर्यंत होत नाही, तोपर्यंत विभागाला या आकडेवारीनुसार कर आकारणी करता येत नाही. शासनाने ही आकडेवारी स्वीकारल्यानंतर आणि विभागाला कळविल्यानंतर नवीन लोकसंख्येच्या आकडेवारीच्या आधारावर कर वसुली केली जाईल. नवीन आकडेवारी लागू झाल्यापासून नवीन कर रचनेनुसार वसुली केली जाईल. दरवेळी तीन ते चार वर्षाचा गॅप असतो. तथापि, जनगणनेची आकडेवारी उशिरा प्राप्त होत असल्यामुळे असंगती (अनॉमली) निर्माण होते. अद्याप, रजिस्ट्रार जनरल ॲण्ड सेंन्सस कमिशनर ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांच्याकडून फायनल फिगर प्राप्त व्हावयाच्या आहेत. नेटवर प्रोव्हिजनल फिगर दिलेल्या आहेत. तथापि, आपण सूचना केल्यानुसार ही बाब विभागाकडून तपासून रिकव्हरी केली जाईल.

४.७. सन २०११ मध्ये जनगणना झालेली आहे व आता सन २०१४ सुरू आहे. या दोन-तीन वर्षाच्या कालावधीत जुन्या दराने कर वसुली केली जात आहे. त्यामुळे या दोन-तीन वर्षातील नवीन व जुन्या दरातील तफावतीची रक्कम संबंधितांकडून वसूल केली जाईल का असे समितीने पुन्हा विचारले असता, विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, जनगणना कार्यालयाने ऑफिशिअली राज्य शासनाला आकडेवारी दिल्यानंतर शासनाकडून ज्या तारखेला विभागाला कम्युनिकेट केले जाईल, त्या तारखेपासून नवीन दरानुसार कर आकारणी केली जाईल.

विभागाला विशेष पत्राव्दारा कळविण्याची काय आवश्यकता आहे ? ही सर्व माहिती नेटवर उपलब्ध असून त्यानुसार कार्यवाही का करण्यात येत नाही असे समितीने विचारले असता, आतापर्यंतची कार्यपद्धती समितीला सांगितली आहे. तथापि, सूचना केल्यानुसार ही बाब तपासून घेण्यात येईल आणि तसे असेल तर रिकव्हरी करण्यात येईल असे विभागीय प्रतिनिधींनी समितीला सांगितले. पुढे समितीने अशी विचारणा केली की, अनुज्ञप्ती शुल्कासंदर्भात बॉम्बे फॉरेन लिकर रुल्समध्ये काय तरतूदी आहेत. यानुषंगाने सदरहू नियमातील तरतुदीमध्ये सुधारणा का करण्यात आली नाही ? अनुज्ञप्ती शुल्क हे लोकसंख्येच्या स्लॅबप्रमाणे घेतले जाते. परमिट रुम, कंट्री लिकर रुमची अनुज्ञप्ती शुल्क हे देखील लोकसंख्येच्या स्लॅब व घनतेप्रमाणे आकारले जाते. कमी लोकसंख्येची घनता असलेल्या ठिकाणाहून कमी अनुज्ञप्ती शुल्क आकारले जाते अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीला दिली.

४.८. अभिप्राय व शिफारशी :-

अहमदनगर, नागपूर आणि सांगली जिल्ह्यातील अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क यांच्या कार्यालयाने सन २००५-२००६ ते सन २००८-२००९ मधील कालावधीकरिता नुतनीकरण केलेल्या २० अनुज्ञप्तीधारकांकडून लोकसंख्येच्या टप्प्याकरिता चुकीचा दर लावल्याने लोकसंख्येचा टप्पा सन २००१ च्या गणनेनुसार अद्ययावत न केल्याने एकूण १८.६२ लाख अनुज्ञप्ती शुल्काची कमी वसुली झाली.

या प्रकरणात सन २००६ मध्ये सी.डी.फॉर्ममध्ये आकडेवारी प्राप्त झाल्यानंतर ती माहिती पेपर फॉर्ममध्ये कन्व्हर्ट करण्यात आली व त्यानुसार संबंधित अधिकाऱ्यांना कम्युनिकेट करण्यात आले. यापैकी नागपूर जिल्ह्यात ८ अनुज्ञप्ती व अहमदनगर जिल्ह्यात एफएल-३ च्या ९ अनुज्ञप्ती प्रकरणात चुकीचा दर लावला गेल्याचे विभागाने मान्य केले आहे. ही कार्यालयीन चुक असल्याचे विभागाने कारण सांगितले असले तरी हे कारण संयुक्तिक वाटत नाही. कारण याची कार्यपद्धती अशी आहे की, **जोपर्यंत नवीन जनगणनेची अधिकृत आकडेवारी प्राप्त होत नाही, तोपर्यंत मागील जनगणनेच्या आकडेवारीनुसार कर वसुली केली जाते अशी स्पष्ट कार्यपद्धती असताना नागपूर व अहमदनगर जिल्ह्यातील राज्य उत्पादन शुल्क अधिकाऱ्यांनी चुकीचा दर लावून शासनाचे नुकसान केले आहे. त्यामुळे या प्रकरणी संबंधितांवर कारवाई करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

४.९. जनगणनेच्या आकडेवारीच्या आधारावर जिल्ह्यातील लोकसंख्येनुसार उत्पादन शुल्क आकारले जात असते. सध्या जो कर आकारला जात आहे तो सन २००१ च्या जनगणनेनुसार आकारला जात आहे.

सन २०११ मध्ये जनगणना झाली असून आता दोन वर्षे होऊन गेली आहेत. या जनगणनेची सर्व अधिकृत आकडेवारी इंटरनेटवर प्रसिद्ध करण्यात आली आहे. असे असताना सन २००१ च्या जनगणनेनुसार कराची आकारणी केली जात आहे, यामुळे शासनाचे महसुली नुकसान होत आहे.

जनगणना कार्यालयाकडून अधिकृत आकडेवारी शासनाकडे दिली जाते, शासनाकडून ती स्वीकारली जाते व त्यानंतर ती विविध विभागांना कळविली जाते. ही कार्यवाही जोपर्यंत होत नाही, तोपर्यंत विभागाला या आकडेवारीनुसार कर आकारणी करता येत नाही. दरवेळी तीन ते चार वर्षाचा गॅप असतो. तथापि, जनगणनेची आकडेवारी उशिरा प्राप्त होत असल्यामुळे असंगती (अनॉमली) निर्माण होते. अद्याप, रजिस्ट्रार जनरल ॲण्ड सेंन्सस कमिशनर ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांच्याकडून फायनल फिगर प्राप्त व्हावयाच्या आहेत. नेटवर प्रोव्हिजनल फिगर दिलेल्या आहेत. **राज्य उत्पादन शुल्क वसुली संदर्भात शासनाने निश्चित धोरण आखणे आवश्यक आहे. आधुनिक युगात पूर्वीच्या कार्यपद्धतीमध्ये बदल करणे आवश्यक असल्याने शासनाने राज्य उत्पादन शुल्क वसूलीच्या कार्यपद्धतीमध्ये तातडीने बदल करून आवश्यक ती उपाययोजना करावी अशी समितीची शिफारस आहे.**

परिशिष्ट-अ

परिशिष्ट-ब

मंगळवार, दिनांक ७ जानेवारी २०१४
लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक ७ जानेवारी २०१४ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२-०० वाजता सुरू होऊन दुपारी १-१० वाजता स्थगित झाली :—

समिती प्रमुख :

(१) श्री. गिरीश बापट, वि.स.स.

सदस्य :

(२) श्री. मधुकर ऊर्फ अण्णा चव्हाण, वि.स.स.,
(३) श्री. सुनिल केदार, वि.स.स.,
(४) श्री. विनायक निम्हण, वि.स.स.,
(५) श्री. बदामराव पंडित, वि.स.स.,
(६) प्रा. राम शिंदे, वि.स.स.,
(७) श्री. गिरीष महाजन, वि.स.स.,
(८) श्री. आर.एम. वाणी, वि.स.स.,
(९) श्री. नितीन सरदेसाई, वि.स.स.,
(१०) प्रा. सुरेश नवले, वि.प.स.,
(११) श्री. विनायक मेटे, वि.प.स.,
(१२) श्री. पांडुरंग फुंडकर, वि.स.स.,
(१३) श्री. चंद्रकांत मोकाटे, वि.स.स.,
(१४) श्री. विवेक (भाऊ) पंडित, वि.स.स.,

निमंत्रित :

(१५) श्री. मनिष जैन, वि.प.स.,

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्री. सु. सा. गायकवाड, वित्तीय सल्लागार.
(२) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव.
(३) श्री. ऋतुराज कुडतरकर, अवर सचिव.
(४) श्री. दि. पुं. येवला, अवर सचिव (समिती).

निमंत्रित :

महालेखाकार यांचे कार्यालय :

(१) श्रीमती माला सिन्हा, प्रधान महालेखाकार, मुंबई,
(२) श्री. उदय शिंदे, उप महालेखाकार, लेखापरीक्षक-२, नागपूर.

साक्षीदार :

गृह (परिवहन) व गृह (राज्य उत्पादन शुल्क) विभाग

(१) श्री. शैलेश कुमार शर्मा, प्रधान सचिव
(२) श्री. मोरे, परिवहन आयुक्त
(३) श्री. संजय मुखर्जी, आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००८-२००९ या वर्षाचा महसूली जमा अहवालातील परिच्छेद क्र.५.३.१, ५.३.२ व ५.३.३ संदर्भात सचिव, गृह (परिवहन) व गृह (राज्य उत्पादन शुल्क) विभाग यांची साक्ष घेतली.

बुधवार, दिनांक ८ जानेवारी २०१४
लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक ८ जानेवारी २०१४ रोजी विधान भवन, मुंबई येथे सकाळी ११-३० वाजता सुरू होऊन दुपारी १-२० वाजता स्थगित झाली :—

समिती प्रमुख :

(१) श्री. गिरीश बापट, वि.स.स.

सदस्य :

(२) श्री. मधुकर ऊर्फ अण्णा चव्हाण, वि.स.स.,

(३) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.,

(४) श्री. विनायक निम्हण, वि.स.स.,

(५) श्री. लक्ष्मण जगताप, वि.स.स.,

(६) प्रा. राम शिंदे, वि.स.स.,

(७) श्री. आर.एम. वाणी, वि.स.स.,

(८) श्री. चंद्रकांत मोकाटे, वि.स.स.,

(९) श्री. जयप्रकाश छाजेड, वि.प.स.,

(१०) प्रा. सुरेश नवले, वि.प.स.,

(११) श्री. विनायक मेटे, वि.प.स.,

(१२) श्री. पांडुरंग फुंडकर, वि.स.स.,

निमंत्रित :

(१३) श्री. मनिष जैन, वि.प.स.,

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्री. यु. के. चव्हाण, अतिरिक्त सचिव.

(२) श्री. सु.सा. गायकवाड, वित्तीय सल्लागार.

(३) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव.

निमंत्रित :

महालेखाकार यांचे कार्यालय, नागपूर

श्री. उदय शिंदे, उप महालेखाकार, लेखापरीक्षक-२, नागपूर,

नोंदणी महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे

श्री. एस. चोकलिंगम, नोंदणी महानिरीक्षक.

साक्षीदार :

महसूल व वन विभाग

(१) श्री. स्वाधीन क्षत्रीय, अपर मुख्य सचिव (महसूल)

(२) श्री. प्रविण परदेशी, प्रधान सचिव (वने)

(३) श्री. मिलिंद म्हैसकर, सचिव (मदत व पुनर्वसन)

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००८-२००९ या वर्षाचा महसूली जमा अहवालातील परिच्छेद क्र. ३.३.१, ३.३.३, ३.३.५ व ४.४ संदर्भात सचिव, महसूल विभाग यांची साक्ष घेतली.

गुरुवार, दिनांक १६ जानेवारी २०१४
लोकलेखा समिती

समितीची बैठक गुरुवार, दिनांक १६ जानेवारी २०१४ रोजी विधान भवन, मुंबई येथे सकाळी ११-३० वाजता सुरू होऊन दुपारी १२-४५ वाजता स्थगित झाली :—

समिती प्रमुख :

(१) श्री. गिरीश बापट, वि.स.स.

सदस्य :

(२) श्री. मधुकर ऊर्फ अण्णा चव्हाण, वि.स.स.,

(३) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.,

(४) प्रा. राम शिंदे, वि.स.स.,

(५) प्रा. सुरेश नवले, वि.प.स.,

(६) श्री. विनायक मेटे, वि.प.स.,

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्री. यु. के. चव्हाण, अतिरिक्त सचिव.

(२) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव.

(३) श्री. दि. पु. येवला, अवर सचिव (समिती).

निमंत्रित :

महालेखाकार यांचे कार्यालय :

(१) कु. शिला जोग, महालेखाकार
महालेखाकार कार्यालय (ले.प.)-२, नागपूर,

(२) डॉ. विशाल देसाई, उप-महालेखाकार
प्रधान महालेखाकार कार्यालय (ले.प.)-१, मुंबई.

विक्रीकर आयुक्तालय, मुंबई

श्री. नितीन करीर, आयुक्त.

जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर

श्री. संजीव कुमार, जिल्हाधिकारी.

साक्षीदार :

वित्त विभाग

(१) श्री. राजीव अग्रवाल, सचिव (वित्त)

(२) श्री. छत्रपती शिवाजी, सचिव (वित्तीय सुधारणा).

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००८-२००९ या वर्षाचा महसूली जमा अहवालातील परिच्छेद क्र. २.५ व २.६.९ संदर्भात सचिव, वित्त विभाग यांची साक्ष घेतली.

मंगळवार, दिनांक ३० जून २०१५
लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक ३० जून २०१५ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२-३० वाजता सुरू होऊन दुपारी २-०० वाजता स्थगित झाली :—

समिती प्रमुख :

(१) श्री. भास्कर जाधव, वि.स.स. तथा कार्यकारी समिती प्रमुख

सदस्य :

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.,

(३) श्री. संजय सावकारे, वि.स.स.,

(४) श्री. नानाजी शामकुळे, वि.स.स.,

(५) श्री. हरिभाऊ जावळे, वि.स.स.,

(६) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.,

(७) श्री. योगेश सागर, वि.स.स.,

(८) डॉ. अनिल बोंडे, वि.स.स.,

(९) श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स.,

(१०) श्री. संजय केळकर, वि.स.स.,

(११) श्री. वैभव नाईक, वि.स.स.,

(१२) श्री. सुरेश गोरे, वि.स.स.,

(१३) श्री. जयंत पाटील, वि.स.स.,

(१४) श्री. जयंत प्र. पाटील, वि.प.स.,

(१५) श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स.,

(१६) श्री. माणिकराव ठाकरे, वि.प.स.,

(१७) श्री. संजय दत्त, वि.प.स.,

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्री. यु. के. चव्हाण, सचिव.

(२) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव.

(३) श्री. सो. न. सानप, अवर सचिव.

समितीने दुसरा प्रारूप अहवाल विचारात घेतला व काही सुधारणा सुचविल्या.

मंगळवार, दिनांक २१ जुलै २०१५

लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक २१ जुलै, २०१५ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी ३-०० वाजता सुरू होऊन ४-०० वाजता स्थगित झाली :—

समिती प्रमुख :

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

सदस्य :

(२) श्री. नानाजी शामकुळे, वि.स.स.,

(३) श्रीमती माधुरी मिसाळ, वि.स.स.,

(४) श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स.,

(५) श्री. संजय केळकर, वि.स.स.,

(६) श्री. शंभुराज देसाई, वि.स.स.,

(७) श्री. सत्यजीत पाटील-सरुडकर, वि.स.स.,

(८) श्री. वैभव नाईक, वि.स.स.,

(९) श्री. सुरेश गोरे, वि.स.स.,

(१०) श्री. भास्कर जाधव, वि.स.स.,

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्री. सो. न. सानप, अवर सचिव.

समितीने सुचविलेल्या सुधारणासह दुसरा प्रारूप अहवाल संमत करण्यात आला.